म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ३०७

# काचेचें कवच

रा. भि. जोशी

REFBK-0007149
REFBK-0007149

…शन, मुंबई १४.

१०५५८
र. न. ..............

स. न. ..............
स्थळ प्रत

माझे ग्रंथ भांडा

REFBK-0007149

# कांचेचें कवच

रा. भि. जोशी

किंमत दोन रुपये

अभिनव प्रकाशन, मुंबई १४.

स्थळ प्रत

जून १९४९

प्रकाशक : वामन विष्णु भट, अभिनव प्रकाशन,
२२/३ अहमद सेलर बिल्डिंग, नायगांव, मुंबई १४.

मुद्रक : वासुदेव विष्णु भट, "फेमस प्रिंटर्स"
१२ त्रिभुवन रोड, मुंबई ४.

माझ्या कथांचा हा पहिला संग्रह प्रसिद्ध होत असतांना ज्यांनीं मला कथा लेखनाच्या कामीं आरंभी उत्तेजन दिलें त्यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण होणें साहजिक आहे. त्यांत पहिल्या प्रथम श्री. गं. दे. खानोलकर यांचा उल्लेख करायला हवा. 'प्रतिभे' चे संपादक असतांना, माझ्या अर्धकच्च्या गोष्टींना 'प्रतिभें'त स्थान देऊन त्यांनींच मला लिहितें केलें.

पुढें मी ज्या कथा लिहिल्या त्यापैकीं बऱ्याच श्री. प्रभाकर पाध्ये "धनुर्धारी" चे आणि कांहीं दिवस "यशवंत" चे संपादक असतांना त्यांच्या प्रोत्साहनामुळें आणि त्यांच्यासाठींच लिहिल्या. त्यांचें आणि हा संग्रह आतां प्रसिद्ध होत आहे त्याचेंहि सर्व श्रेय त्यांनाच आहे. माझ्या एकंदर लेखन-कार्यांतच त्यांचें मला जें साहाय्य झालें आहे त्याचा औपचारिक शब्दांत उच्चार करणें आमच्या गेल्या पंधरा वर्षांच्या स्नेहाला शोभणार नाहीं, आणि त्यांना किंवा मलाहि तें प्रशस्त वाटणार नाहीं.

पुस्तक प्रकाशनाचा मार्ग एकंदरींत खडबडीतच. त्यावरचा माझा प्रवास सरळ आणि सुखावह केल्याबद्दल 'अभिनव प्रकाशन'चे श्री. वामनराव भट यांचा मी ऋणी आहे.

माझ्या कथासंग्रहाच्या प्रकाशनाच्या कामीं श्री. अनंत काणेकर यांनीं पहिल्यापासून मला जें आस्थापूर्वक साहाय्य केलें त्याबद्दल त्यांचाहि मी आभारी आहे.

चित्रकार श्री. गोडसे यांनीं आपल्या इतर कामांच्या गर्दीतून वेळ काढून वेष्टनाचें काम निकडीनें करून दिलें नसतें तर हा संग्रह यावेळीं प्रसिद्ध झाला असता कीं नाहीं याची मला शंकाच आहे. त्यांनीं दाखविलेल्या या आपुलकीबद्दल मी त्यांचाहि ऋणी आहें.

मुंबई, १०-५-४९. रा. भि. जोशी

अनुक्रम


- उध्वस्त स्मारकें
- उसळती लाट
- नगरीचें चित्र
- राजम्
- क्रिकेट, क्रिकेट !
- ओढ
- निरुद्देश प्रवास
- गोनी
- सज्जावरून
- किरमिजी ओंठ
- नवी नवरी
- कांचेचें कवच

# उध्वस्त स्मारकें : १

विचार केला म्हणजे प्रश्न पडतो; मनामध्यें खोल दडलेल्या दुःखद आठवणी मनुष्य पुन्हां पुन्हां ओढून वर आणतो, आणि खालीं–वर इकडून-तिकडून त्यांना न्याहाळण्यांत घटका घटका गुंग होतो, तो कां कांहीं कळत नाहीं.

डोहाच्या अंधारांत दृष्टिआड वावरणाऱ्या माशांना आमिष घालून उजेडांत आणण्यांत आणि त्यांच्याकडे पाहण्यांत माणसाला गंमत वाटते तसाच तर हा प्रकार नाहीं ?

जिथून त्याला ठोकर मिळाली होती तिकडेच तो निघाला होता. त्याला जर कुणी विचारलें असतें कीं, ‘ तूं तिकडे कां जातो आहेस ? ’ तर तो गडबडला असता आणि तसाच चालूं लागला असता. आतां त्याला कुणी विचारलें नाहीं ही गोष्ट वेगळी. तो आपला भ्रमिष्टासारखा चालला होता पांच पावलांवर नजर रोखून. गेल्या दहाबारा वर्षांत त्या मोहल्ल्याचा सगळा मुखडा बदलून गेला होता हें देखील त्याच्या लक्षांत आलें नाहीं. पूर्वीं ज्या रस्त्यांत ढोपरभर धूळ असे तिथें आतां वाळू चर्चर वाजत होती. बाजूचा नाला बुजवल्यामुळें रस्ता रुंद झाला होता. सुभानखांच्या देवडीवर पंधरा चाऊस असत तिथें एकच होता. हैबतरावांच्या आवाराला नवीन फाटक पाडलें होतें. कुठें जुनीं झाल्यामुळें तर कुठें आरायश–बल्याच्या निमित्तानें घरांना खिंडारें पडून त्यांचीं अंतरंगें वाऱ्या–पावसाच्या माऱ्यांत उघडीं पडलीं होतीं. आणि या तिन्हीसांजच्या वेळीं ज्या दाराखिडक्यांतून

तेलाच्या दिव्यांच्या तांबूस पिवळट प्रकाशाचे चौकोन दिसायचे त्या दारा-खिडक्यांच्या ठिकाणीं अंधाराचीं ठिगळें दिसत होतीं.

अवघडशास्त्र्यांच्या घराच्या अलीकडे तिप्पण्णाच्या घराला वळसा घालून तो नेमका त्रिभुवन स्वामींच्या मठाच्या दारांत येऊन उभा राहिला. आवाराच्या भिंतीवरून पलीकडे राजेंद्ररावांच्या वाड्याकडे-जिथें त्याच्या माणुसकीच्या चिंधड्या उडाल्या त्या ठिकाणाकडे-त्याची सहजच नजर गेली. वाडा कुठें होता पण तिथें ? गाडीचें चाक जाऊन उभेंच्या उभें कापलेल्या एकाद्या वारूळाचीं भोकें-बिळें उघडीं पडलेलीं दिसावीं तशीं कांहीं छिन्नविच्छिन्न दालनें, आडव्या उभ्या तुळया आणि खांब दिसले त्याला. अंधार अगदीं सरसावत होता. समोर वरच्या मजल्याची एक भिंत निमुळती होत गेली होती. तिच्यांतल्या दाराची झडपें जाऊन भगदाड तेवढें राहिलें होतें चौकोनी. आणि उदास डोळ्यांतून विषण्ण अंत:करण दिसावें तशी त्या चौकोनांतून आकाशाची धुरकट-करडी पोकळी दिसत होती.

ती भिंत कोणत्या खोलीची हें लक्षांत येऊन तो थोडासा चरकला. आणि एक उसासा टाकून मठाच्या आवारांत शिरला. सामसूमच होतें. पूर्वीसारखे लोक जमत नसावेत गुरुवारीं! अंगणांतून जातांना त्याच्या पायाखालीं पाचोळा केवढ्यांदा सळसळला! सभामंडपांत दहापांच माणसें गोळा झालेलीं होतीं. गाभाऱ्याच्या दाराशीं, दिव्याच्या कोनाड्याखालीं अंधा-रांत जाऊन तो बसला. गाभाऱ्यांतून सभामंडपांत येणाऱ्या उजेडांत एका खांबाला टेकून बसलेली ती त्याला दिसली. ती तिथें असेल असें त्याला वाटलें नव्हतें. खरें म्हणजे त्यानें विचारच केला नव्हता.

तीच जागा, बसण्याची तीच ढब--डावी मांडी उभी, उजवी आडवी--तिच्या रूपाचा रेखीवपणा, हुकमीपणा, करारीपणा तसाच होता.

पण डोळ्यांत शुष्कपणा आला होता, त्यांच्या कडा काळवंडल्या होत्या; गाल सैल झाले होते !

सांधलीशी वाटलेली शिवण तुटून जखम परत उघडी पडावी तसें त्याला झालें. खोल दडलेला संताप, उद्वेग आणि स्वत:बद्दलचा तिरस्कार यांची त्याच्या मनांत जोराची उसळी येऊन गेली. तो तिला दिसत नव्हता पण तिच्यावर मात्र त्याची नजर खिळली होती.

आंतून झांगट आणि घंटा ऐकू येऊं लागल्या. थोड्या वेळानें आरती बाहेर आली. पुजारी पहिल्यानें तिच्याकडे गेला. नंतर इतरांकडे. परततांना त्याच्याकडे लक्ष गेलें. त्यानें त्याच्याही पुढें आरती धरली. डोळ्यावर उजेड पडलेला जाणवून तो थरकला. त्यानें आरती घेण्यासाठीं तोंड वर केलें. तिथें कुणीतरी अंधारांत बसलें आहे हें तिला दिसत होतें. पण कोण तें ओळखत नव्हतें. त्याच्या तोंडावर आरतीचा उजेड पडल्याबरोबर ती दचकली.

दोघांची दृष्टादृष्ट झाली, तिच्या चेहऱ्यावर ओळख पटल्याची चलविचल झालीसें त्याला वाटलें. मागल्या सर्व गोष्टी त्याच्या मनांत उभ्या राहिल्या. आपला असा कडेलोट करून तिनें काय साधलें ? सूडाचे समाधान ? पण तें तरी लाभलें असेल काय ? ती कदाचित् आपल्याला बोलवून घेईल अशी शंका येऊन तो ताबडतोब उठला. त्याला तिच्याशीं बोलायला नको होतें. तो देवळाच्या मागच्या बाजूला, एका कोपऱ्यांत, जिथें तेलुगु पंतुलूची शाळा भरत असे तिथें गेला. तिथलें छप्पर ढांसळलें होतें आणि वाघळांची उग्र घाण येत होती. तो बाहेर पडून चाटेला लागला.

* * *

बारा वर्षापूर्वी, अशाच एका गुरुवारीं, याच मठांत, ती आज बसली होती तशीच, तिथेंच, बसली होती. आरती झाल्यावर तो गाभाऱ्याबाहेर

पडला. आणि पहिल्यानें त्यानें तिच्याकडे आरती नेली. तिनें आपल्या सोबतिणीला विचारलें, "वेंकाम्मा, आज हा कोण नवा ?"

"क्रिष्टाचार्यन् मगा. शीनू-श्रीनिवासा नम् बगीच्याग पूजा माडतानऽ"

तिचा कांहीं विचार झालासा दिसला. थोड्या वेळानें ती आपल्या भावजयीला म्हणते, "पद्मा, आपले जयाचारे म्हातारे झालेत नाहीं ! आणखी बीमार पडतेत. त्यान्ला गांवाला धाडून देऊंत. शिनू करल पुजा–पुराण आपल्या वाड्यांत. काय ?"

पद्माला ठाऊक होतें कीं तुळशीनें आपल्याला विचारलें तें उगीच–दाक्षिण्य म्हणून. तिच्या मनांत गोष्ट आली कीं ती व्हायचीच. तेव्हां तिनें आपली उंच मान किंचित् कलती करुन, आणि लांब पापण्यांनीं झांकलेले डोळे फिरवून संमति दाखविली.

शिनू वाड्यांत आला.

त्या प्रचंड वाड्यामध्यें घरचीं माणसें काय तीं तीन. दोनच खरीं. तुळशी आणि पद्मा. पद्मेचा नवरा हणमंतराव हा तिसरें माणूस. पण तो फक्त जेवणापुरता काय तो घरांत यायचा. आतां कधीं ही, कधीं ती, अशा कुणी बायका असत येऊन जाऊन. पण त्यांचा मुक्काम मुशाफरीचा.

सत्तावीस अठ्ठावीस वर्षांची असेल तुळशी त्यावेळीं. सांवळी झालेली असल्यामुळें तिला एक प्रकारचा विरूपपणा आला होता. पण मूर्ति सांवळी रेखींव, कांति रसरशीत, रुबाब हुकमी, बाणा करारी, आणि वाणी कांहींशी करडी. तिचा घरांत सगळीकडे दबदबा होता. उप्पिनहळ्ळीला कुंजीवाल्याकडे दिली होती तिला. पण लग्न होऊन वर्ष दीड वर्षांत घरीं आली ती. इन्फ्लुएंझांत आईबाप गेले, भाऊ मोठा, पण घरांत लक्ष नाहीं. त्यामुळें आंतल्या वाड्याची मालकीण खरी तीच होती. ती मनांत आणील तें होत असे.

पद्मा अगदीं तिच्या उलट. गरिबाची मुलगी, दिसायला चांगली म्हणून केलेली. वयानें अठरा-वीस. उंच, सडपातळ, नाजुक पारिजातासारखी, फिकट गोरी, केस सोनेरी तपकिरी, डोळे तसेच पण काळसर जास्त. पाहण्यांत आतुर उदासीनता. बसणें–बोलणें–चालणें मखमली. मनांतल्या विकारांची चाहूल डोळ्यांच्या हालचालींतून आणि चेहऱ्याच्या लालींतून काय लागेल ती. तिचा नवरा होता पण तो जेवायच्या वेळेखेरीज दृष्टीस पडत नसे. एरव्हीं काय करीत असे याची तिला कल्पना नसे. पुष्कळ गोष्टी सांगत लोक त्याच्याबद्दल. पण खऱ्या आणि खोट्या निवडायच्या कशा ? कुणी म्हणत, तिच्या आईबद्दल त्यानें कांहीं ऐकलें होतें म्हणून तो तिच्याशीं संबंध ठेवीत नसे. कुणी म्हणत, शेजारच्या गल्लींतल्या अशरफी नांवाच्या कंचनीवर तो आशक होता म्हणून घरांत येत नसे. कुणी असेंहि म्हणत कीं तो पुरुषच नव्हता म्हणून त्याला बायकोकडे यायला संकोच वाटे. तिच्या परिस्थितीमुळें आणि तुळशीचें सावट पडल्यामुळें ती कुचंबलेली–दडपलेली असे एवढें खरें.

अशा परिस्थितींत शिनूचा तिथें प्रवेश झाला.

कपाळावरच्या अंगाऱ्याच्या रेघेसारखी मिशीची रेघ नुकतीच त्याच्या ओठांवर उमटूं लागली होती. पोटावर, छातीवर आणि गोलगोल दंडावर गोपीचंदनाचे नाम आणि मुद्रा ठोकून वावरणारी त्याची मूर्ति मोठी डौलदार दिसे.

तुळशीनें त्याला पुजारी म्हणून वाड्यांत आणलें आणि त्याची सोय गैरसोय, हवें नको पाहण्याचें आपल्याकडेच घेतलें. एखाद्या पाळीव जनावराप्रमाणें ती त्याला गोंजारी, त्याचें कौतुक करी. बेतावेतानें मस्करीही करी. पण दुसऱ्यानें तसें केलेलें मात्र तिला खपत नसे. जणूं काय त्याच्यावर सगळी सत्ता तिचीच.

वाड्यांत येण्यापूर्वी शिनूला बायकांचा सहवास असा नव्हताच. त्यामुळें त्या दोघींमध्यें त्याला आरंभीं अगदीं गुदमरल्यासारखें वाटे. बाहेर जावें तर गांवांत कुणाच्या ओळखी नाहींत जवळपास. शिवाय कांहींना कांहीं निमित्तानें त्याला वाड्यांतच रहावें लागेल असें तुळशी करी. कधीं ' दासर पदगळू ' काढून पदें म्हणायला लाव, कधीं गोष्टी, आख्यायिका सांगायला लाव. कांहीं ना बाहीं चालूच असे. बरदास्त बरी रहाते याचा त्यालाहि थोडासा आनंद वाटे. त्या वेळेला त्याचें वयहि असें चमत्कारिक होतें कीं, ज्यावेळीं स्त्रियां-बद्दलच्या भावना आल्हादक पण अपरिचित असतात. सुंदर सापाबद्दल कसें वाटतें ? कुतूहल आणि भीति ! मनाची झेंप पुढें, पण पाऊल मागें !

पहिल्या पहिल्यानें त्याला तुळशीच्या बऱ्याचशा खुब्यांचा अर्थ कळत नसे. पण पुढें कळूं लागला तेव्हां तिचें तें कबजा घेणारें कौतुक त्याच्या अंगावर शहारे आणूं लागलें. नुसती निरंजनांत फुलवात घालायसाठीं देवघरांत आली, तरी ती त्याच्याकडे रोखून पहात रहायची मांजरीसारखी. पद्माही पाही, नाहीं असें नाहीं. पण तिचें पाहणें त्याला नकोसें होत नसे. किती हलकें ! कळलें न कळलें. वाऱ्याच्या झुळकीवर दिव्याची ज्योत हेलकावावी तसें.

तो एकटाच असला म्हणजे त्याचें मन किती निरनिराळ्या प्रकारांनीं धांवे ! तुळशीचा चेहरा खरोखर पुतळ्यासारखा रेखींव. पण—

त्याला वाचायला तिथें पुस्तकें होतीं तीन. 'दासर पदगळू,' भागवत आणि भारत. अर्थातच त्याला भारत आणि भागवत जास्त आवडे. गोपींचें कात्यायनीव्रत, अर्जुनाची प्रायश्चित्तासाठीं केलेली यात्रा, चित्रांगदेची भेट, रैवतक पर्वतावर सुभद्रेचें दर्शन. आणि सगळ्यांत त्याचा आवडता प्रसंग म्हणजे ऊर्वशी अर्जुनाला ब्रह्मचर्य सोडायचा आग्रह करते तो. तो तो

पुन्हां पुन्हां वाचायचा. आणि अशा प्रसंगांवर विचार करतांना चित्रांगदा–सुभद्रा–ऊर्वशी या सगळ्या त्याला नकळत पद्मेच्या रूपांत दिसत.

पुढें पुढें त्याला तुळशीची लगट इतकी नकोशी झाली कीं, तो कांहींहीं हवें असलें तरी पद्मेला सांगे, आणि ती येऊं जाऊं लागली कीं तिच्याकडे पहात राही. तिलाही त्याचें काम करायला हौस वाटे. पण त्यामुळें तुळशीचा मात्र तडफडाट होई.

*　　　*　　　*

एकदां सकाळच्या वेळीं तो पूजेसाठीं गंध उगाळीत बसला होता. पद्मा पेटलेलें निरंजन घेऊन आंत येत होती. विंचरण्याला न जुमानतां वलयें करून राहिलेल्या तिच्या केसांवर झरोक्यांतून येणारे किरण पडले. आणि तिच्या डोक्याभोंवतीं प्रकाशाच्या सोनेरी तंतूंचें जाळें गुंफल्यासारखें दिसूं लागलें. हाताचा आडोसा केलेल्या निरंजनाचा सोनेरी उजेड हनुवटीकडून वर तिच्या तोंडाकडे पसरला होता. मनुष्य किति निराळें दिसतें अशा उजेडांत ! त्यानें डोळे वर करून तिच्याकडे पाहिलें. तीही त्याच्याकडेच पहात होती. तिचे ओंठ हंसल्यासारखे उघडले. तिच्या डोळ्यांत ज्योतींचीं प्रसन्न प्रतिबिंबें उमटली होतीं त्यावर त्याची दृष्टि खिळली होती. बाजूच्या दारांत उभ्या असलेल्या तुळशीनें आपल्या नजरेच्या चिमट्यांत त्यांना पकडलें. त्यांच्या हें लक्षांत आलें नाहीं पण तिनें खुणगांठ बांधली कीं, त्यांचें कांहींतरी अबोल संधान असावें.

आणखी एकदां असेंच झालें. तो भागवतांतल्या कथा वाचून दाखवीत बसला होता ओसरीवर. पद्मा त्याच्यासमोर चौकाकडल्या खांबाशीं बसली होती. कृष्णाचीं गाऱ्हाणीं आणलीं होतीं गोपींनीं, त्यांतला कोणतासा प्रसंग ऐकतांना तिचा चेहरा गुलाबाच्या

पाकळीसारखा लाल झालेला दिसला तुळशीला. पण पद्मा पाहात होती शिनूकडे. तिला न्हाणाच्या वेळीं जिथें मखरांत बसवलें होतें तिथेंच तो बसला होता. त्याच्या डाव्या-उजव्या खांद्यांकडे भिंतीवर हातांच्या पंजांनीं केलेल्या तांबड्या खुणा होत्या. त्या तिच्याच हातांच्या, त्यावेळीं केलेल्या होत्या. आणि दर दसऱ्याच्या वेळीं दिलेल्या चुन्याच्या सहासात थरांमधून सुद्धां स्पष्ट दिसत होत्या. तेव्हां एकदां फलशोभनाच्या रात्रीं तिची आणि तिच्या नवऱ्याची जी एकांतांत गांठ पडली, ती पहिली आणि शेवटची. या आठवणी तिच्या मनांत येतांच ती जी खांबापासून पुढें लवली होती ती एकदम मागें मान टाकून कलंडली.

*　　　*　　　*

त्यानंतर तुळशी त्या दोघांवर पहारा ठेवल्यासारखी वागूं लागली, आणि शिनू एकटा असला कीं त्याच्याशीं लगट वाढवूं लागली.

एकदां तीं दोघें दुपारच्या वेळीं ओसरीवर एकटींच होतीं. तो जानव्यासाठीं चातीवर सूत काढीत होता. ती जवळच वाती करीत होती. कुणी कुणाशीं बोलत नव्हतें. पण ती सारखी मधून मधून त्याच्याकडे पाही. मधेंच ती त्याच्या डोक्याकडल्या कोनाड्यांतून कांहीं तरी घ्यायला म्हणून त्याच्याजवळ सरकली. आणि तिनें कोनाड्याकडे हात सरसावला. तिचा उजवा दंड त्याच्या खांद्याला लागला. तो मागें सरकत म्हणाला,—

"तुळसाक्का, हें काय? काय करतां?"

"काय झालें? मला कापूस हवा आहे?"

"मग मला कां सांगत नाहीं? मी उठून दिला असता कीं. असं अंगाला...."

"मग काय झालं?—"

तो चिडून उठला आणि हातांतलें साहित्य ठेवण्यासाठीं देवघरांत गेला. तो बाहेर परतणार त्याच्या आधींच ती आंत आली, आणि त्याच्या अगदीं जवळ जाऊन म्हणाली, "शानू—"

तो तिला डावलून बाहेर जायला पाहूं लागला. तिनें त्याला एका हातानें विळखा घातला, आणि दुसऱ्या हातानं त्याचा हात आपल्या छातीशीं नेला. तो कासावीस होत होता.

"काय झालं त्यांत ? तूं काय परका आहेस का ? बघ." त्याचा हात आणखी दाबीत ती म्हणाली.

तिचा स्तन घट्ट भिजवलेल्या कणकेच्या गोळ्यासारखा लागत होता. तिच्या तरतरीत नाकाच्या आटोपसर नाकपुड्या फुगीर झाल्या होत्या. थरथरणाऱ्या ओंठावर घामाचीं टिंबें उठलीं होतीं सगळ्या चेहऱ्यावर तांबुसपणा आला होता. अंग कढत झालें होतें. तिच्या डोक्यावरचा पदर ढळला. करटुल्याच्या कांट्यासारखे उभे असलेले केंस त्याच्या दृष्टीस पडले. आणि त्याची नजर ती विधवा आहे हें दाखवणाऱ्या कपाळावरच्या अंगाऱ्याच्या रेघेवर खिळली. तिनें धरून ठेवलेला आपला हात झटकन काढून घेत तो एकदम म्हणाला—

"तुळसाक्का, मला समजत नाहीं तुम्हीं हें काय मांडलं आहे ! तुम्ही मला इथें आणलं आणि तुम्हीच—"

"तुला समजत नाहीं मी काय करतें ? ही धडधडणारी छाती लागत नाहीं हाताला तुझ्या ? तूं पुरुष आहेस कीं—?"

"तुम्ही विधवा. मी तुमच्या लहान भावासारखा, मुलासारखा. छीः छीः असलं कर्म माझ्या हातून करवूं नका."

" विधवा झालें म्हणून काय मुर्दा झालें मी ?" ती थोडी मागें होऊन म्हणाली, " असलं कर्म करणार नाहींस काय तूं ? मी विधवा म्हणून नको, आणि ती— ती सवाष्ण म्हणून पाहिजे. ती शेवंती आणि मी कोरांटी ! म्हणूनच तिच्याकडे टकटक पाहतोस आणि सारखा मागें मागें घोंटाळतोस तो. मला डोळे नाहींत वाटलं काय तुला ? काय माझ्यांत कमी आहे ?"

ती पुन्हां जवळ झाली.

" काय बोलतां तुळसाक्का ? त्या बिचाऱ्या धुतल्या तांदळासारख्या स्वच्छ आहेत .."

" तर ! तांदळासारखी स्वच्छ ! मुर्दासारखी निर्जीव ! तिच्यांत काय हें आहे म्हणून मला झिडकारतोस ? अं ?"

आणि ती त्याला अडवूं लागली.

" पण हें चालवलंय काय तुम्ही ! चला, व्हा बाजूला. मला ही नोकरी नको न् हेंहि नको !"

त्यानें तिला बळेंच बाजूला केलें. तो दाराबाहेर पडणार तोंच मागून तिचे शब्द तीरासारखे सणाणत आले, " बराय् ! पहातेंच तुझा साधुपणा अन् कसा तूं जातोस तें. विधवा–विधवा काय ! "

* * *

तिची सारखी तगमग चालली होती. पण काय करावें तें तिला सुचेना. सगळें वातावरण ताणल्यासारखें झालें होतें अगदीं. प्रत्येकाची हालचाल अवघडलेली. कांहीं तरी झालें आहे असें पद्मेला वाटे पण काय तें समजेना.

तुळसी कांहीं दिवस आजारी पडली. त्यामुळें ताण ओसरून व्यवहार जरा सुरळीत होऊं लागले.

तुळसी बरी होऊन हिंडू फिरूं लागली तेव्हां तिचें धोरण अगदीं बदललें होतें. ती शिनूच्या वाटेलाहि जात नसे. त्याला कांहीं लागलें सवरलें तर पद्माला पाठवी. वर दिसायला तरी ती अगदीं अलग असे.

शिनूला अगदीं नोकरी सोडून जावेसें वाटूं लागलें होतें तुळशीमुळें. पण तिला इतकी बदललेली पाहून त्याचा बेत थंडावला. पुन्हां त्याचें तरुण मन स्वप्नांत रंगू लागलें.

*　　　　*　　　　*

वसंत पंचमीचा दिवस होता. जेवणें होऊन तिसऱ्या प्रहराची वेळ झाली होती. आज दिवाणखान्यांत अशरफीचें गाणें होतें. चिकाचे पडदे लावलेल्या सज्जांत तुळशी बसली होती. खालीं दिवाणखान्यांत मोजके लोक होते. जेवणासाठीं काढलेलीं चांदीचीं भांडीं कोठारांत ठेवून पद्माहि गाण्याला येऊन बसायची होती. मजूरणी वगैरे लांब मागच्या फाटकाशीं कामें करीत होत्या.

कोठाराचें कुलुप काढून पद्मा आंत शिरली. तिच्या मागोमाग भांड्यांचें ओझें घेऊन शिनू गेला.

"तुमचं आणि वन्सचं कांहीं तरी झाल्यासारखं दिसतं." ती पेटारा उघडीत उघडीत पाठमोरीच म्हणाली.

तो कांहीं बोलला नाहीं. त्याचें लक्ष तिच्या मानेवरच्या सोनेरी केसांच्या वर्तुळाकडे होतें.

तिनें केंस कानांमागून घेतले होते. किती सुंदर कान होते तिचे! आटोपसर, डौलदार, गुलाबी.

ती चटकन वळली.

"तुम्ही बोलत कां नाहीं ? त्यांनीं तुमच्या मुसक्या बांधल्या कीं काय ?" ती हंसत म्हणाली.

ती लागोपाठ इतकें आजच बोलली त्याच्याशीं. तो थोडासा गोंधळला. त्याच्या मनांत चलविचल झाली. थोडा थांबून म्हणाला,

"मला त्यांची भीति वाटते."

"कां ?"

"मी सांगेन. पण तुम्हांला खरं वाटेल न वाटेल."

"पण सांगा तर."

त्यानें सांगितलें. ती भांडीं ठेवायला लागली आणि जराशा वेळानें त्याच्याकडे अर्धवट वळून पहात म्हणाली,

"तुमच्या मनांत बायकांचे विचार नाहीं येत कधीं ?"

तिच्या कानांतलीं माणकांचीं कुडीं, कपाळावरचें लाल उभें कुंकूं, पोवळ्यासारखे ओंठ, त्यांतून हलकेच दिसणारे मोत्यासारखे दांत—

तो पहात राहिला—

"काय ?"

तो जागा झाला—

"येतात कीं, कसे नाहीं येणार ? मी तरी पुरुषच आहें."

"कुणाचे ?"

तो अडखळला, "कुणाचे ? तें कसं सांगूं ?"

"काय हरकत आहे ? इथें कोण आहे ? मी कुणाला सांगेन असं वाटतं ?"

"तसं नाहीं. पण—"

" काय पण ?"

" नाहीं. जाऊं द्या. चला आतां आटपूं या."

" नाहीं. इतकं कां हें करतां ?"

" नाहीं. तें बरं नाहीं. माझ्या सारख्याला शोभत नाहीं. चला. मला भीति वाटते."

" कुणाची भीति वाटते ? माझी ? मी काय तुम्हांला दुष्टपणानें विचारतें असं वाटतं ?"

" नाहीं. नाहीं. त्यांची—तुळसाक्कांची. त्या घुशीसारख्या लुकलुक पाहात असतील कुठून तरी, आणि येतील फुस्स करून."

" त्या बसल्याहेत गाण्याला." ती दाराकडे जात म्हणाली.

" तुम्हांलाहि जायचं आहे ना ?"

" हो—"

ती एक पाऊल उंबऱ्यावर ठेवून इकडे तिकडे पहात म्हणाली, आणि आंत येत हळूंच तिनें न वाजवतां दार लावून घेतलें.

" सांगा."

" तुम्हीं रागावणार नसलां तर."

" नाहीं, सांगा. सांगा ना."

तो दबकत दबकत, चांचरत म्हणाला,—"तुमच्याबद्दल."

ती स्तब्ध झाली. तिचा श्वास वेगावला. असें कांहीं तो सांगेल आणि त्यानें सांगावें याची तिला अगदीं अपेक्षा नव्हती असें नाहीं; पण तें प्रत्यक्ष ऐकल्यावर मात्र तिचा गोंधळ उडाला. आपल्याबद्दल विचार करणारा एकादा तरी पुरुष आहे या जाणीवेनें तिचें अंतःकरण फुलून गेलें. एक दीर्घ

श्वास घेऊन डोळे संबंध उघडून तिनें त्याच्याकडे पाहिलें. पण लगेच, एवढें सुख आपल्याला लाभावं असें आपलं भाग्य असेल हें तिला खरं वाटेना. त्याच्याजवळ जात, किंचित् जड आणि कातर स्वरानें ता म्हणाली—

"खरं सांगतां ?"

"खरं."

"अगदीं ?"

"अगदीं."

"गळ्याशपथ ?"

"गळ्याशपथ."

"माझ्या गळ्याला हात लावून सांगा."

ती त्याच्या पुढ्यांत, अगदीं चिकटून, चवड्यावर उभी राहिली. आधारासाठीं दोन्ही हात त्याच्या खांद्यावर ठेवले. ओंठांच्या पाकळ्या उघडून तोंड वर उचललें—

बाहेरून लकेर ऐकूं आली,
"रूबरू तेरे जहाँ में लाख हैं,
पर कोई तुझसा नजर आता नहीं."

त्यानें डाव्या हातानें तिला पाठीकडून आधार दिला, आणि उजव्या हाताचीं दोन बोटें तिच्या गळ्याच्या खळगींत ठेवीत म्हटलें,

"गळ्याशपथ."

आपल्याला लाभलेल्या या गूढ सुखाची चाहूल कुण्णाकुण्णाला—कौलरांतून आलेल्या कवडाशालासुद्धां—लागूं नये म्हणून तिनें आपल्या काळसर तपकिरी डोळ्यांवर लांब केसांच्या पापण्यांचें पांघरूण ओढून घेतलें होतें.

पळभरच ती तशी होती—

खाडकन खोलीचें दार कडाडलें.

"तुझ्या इस्टेटीला वारस नाहीं म्हणून झुरतोस ना ? ही सती सावित्री वारसाची सोय करून घेत आहे. पहा आपल्या डोळ्यांनीं. आणि हे साधुपुरुष शुक्राचार्य."

भांडीं ठेवून पद्मा अजून आली नाहीं हें पाहून अनुमान बांधून, तुळशीनें, कधीं घरांत न येणाऱ्या भावाला यावेळीं आणलें होतें.

त्यानें त्या दोघांकडे पाहिलें. पद्मा हबकून पेटाऱ्यावर कलंडली होती. श्वासानें तिचें ऊर भात्यासारखें खालवर होत होतें. तिला आपल्या हृदयाच्या धडधडीखेरीज कशाचीही संवेदना नव्हती.

उभें राहवत नाहीं-आधाराला कांहीं नाहीं, अशा कोलमडणाऱ्या अवस्थेंत शिनू होता.

"तिला रवाना करा आपल्या आईकडे. आणि याला ठोकर मारून घालवून द्या फाटकाबाहेर."

हणमंतरावानें त्यांच्याकडे पाहात निकाल देऊन दिवाणखान्याची वाट धरली.

त्या रात्रीं तो तिथून कुठें गेला तें कुणालाहि कळलें नाहीं.

*　　　*　　　*

स्वतःबद्दल तिरस्कार, तुळशीबद्दल संताप, पद्मेबद्दल कींव, आणि एकंदर घटनेबद्दल मनस्ताप. शेंकडों वेळां त्या आठवणींनीं त्याच्या मनाची ओढाताण झाली असेल. या गोष्टीमुळें आपल्या स्वाभिमानाचा कणा कायमचा पिचला असें त्याला सारखें वाटे. कंबरडें मोडलें तरी मागल्या तंगड्या ओढीत रस्त्यावर एकादें कुत्रें फरपटत जातें तसें हें आठवणींचें ओझें ओढीत जगाच्या

बाजारांत फरपटण्यापेक्षां त्याच्याकडे कायमची पाठ फिरवणें बरें, असेंहि त्याच्या मनांत आल्यावांचून राहिलें नाहीं.

पण काळाच्या प्रवाहांत या आठवणींच्या धोंड्यांची धार आणि टोकें झिजत चाललीं हळू हळू. आणि या बोथट झालेल्या बोंचक आठवणींमधून मनाला आंतबाहेर फिरवतांना त्याला एक प्रकारच्या सुखद वेदना होत. अशाच कांहींशा मनःस्थितींत तो त्या स्मृतिविलीन घटनांच्या उध्वस्त स्मारकांकडे पुन्हां वळला होता.

तो कोसळलेला वाडा, ढांसळूं लागलेला मठ, सुकत चाललेली तुळशी, अंधारानें गिळलेलीं घरें, पद्मा?—

ज्या आठवणींनीं त्याला तिथें खेंचून आणलें होतें त्याच त्याला आतां पुन्हां तिथून दूर लोटीत होत्या.

## उसळती लाट : : २

‘आपल्याला एक मूल व्हायला हवं नाहीं का आतां ? तूं तर म्हणत असस कीं तुला मुलं खूप आवडतात ?’ बिछान्यांतल्या बिछान्यांत त्याला बिलगत ती म्हणाली.

‘होय ना, आवडतातच.’ तो म्हणाला.

‘मग आतां तीन वर्षं झालीं आपल्या लग्नाला—’

‘पण तुझंच तर म्हणणं असतं कीं–इतक्यांतच कांहीं नको आपल्याला. पैसे सांठले पाहिजेत खूपसे.’

‘मग मुलं झालीं म्हणजे पैसे नकोत वाटतं ? तरी माझं कांहीं लीली-सारखं नाहीं कीं, प्रत्येक मुलासाठीं महिना शंभर खर्च करायचे न् शंभर शिल्लक टाकायचे—’

‘तसं आपल्याला कसं करतां येईल ? लीलीच्या नवऱ्याला आहे महिना हजार रुपये पगार—’

‘मी कुठं म्हणतें पण तसं ? पण कांहीं तरी नकोत का ? इथं तर ढकलतंय् गाडं कसं तरी—आणखी किती दिवस—’

‘आपल्या हातची का गोष्ट आहे ? मी काम करींत नाहीं का ? केसिस येत नाहींत असंही नाहीं. या शेजारणीनं जर त्या डॉक्टरच्या जोरा-वर मॅटर्निटी होम काढलं नसतं तर आपलं ठीक चाललं होतं. अजूनय् चालेल—’

‘होय पण, एकदां वय गेलं म्हणजे—’

'मग मी काय करावं, तुझं म्हणणं ? तुला वाईट वाटतं का, माझ्याशीं लग्न केल्याचं ? आणि—आणि मूल आतां नको म्हणून लग्नाच्या नात्यानं वागून आनंदांत दिवस घालवतां येणार नाहींत असं नाहीं. पण मी म्हणतों तें तुला पटत नाहीं. मी नीट सांगतों कीं—'

'तें तुझं नेहमींचं असेल. मला तें तसलं कांहीं नको. त्यापेक्षां—'

असें अर्धवट बोलून तिनें कुशीवर वळून त्याच्याकडे पाठ फिरवली. त्यालाहि पुढें कांहीं बोलायचा उत्साह राहिला नाहीं. त्यानें तिला जवळ घ्यायसाठीं तिच्या अंगाभोवतीं हात घातला होता; तोही सैल पडला. आणि थोड्या वेळानें त्यानेंहि तोंड फिरवून घेतलें.

*     *     *

तो एम्. बी., बी. एस. झाला आणि मग रोहिणीला मुळींच धीर निघेना. आईबापांची संमति केव्हांच मिळणें शक्य नव्हतें. त्यामुळें केव्हांही लग्न करायचें तरी तें त्यांच्या इच्छेविरुद्धच करावें लागलें असतें. त्यानें एम्. बी., बी. एस. होईपर्यंत कसें तरी थांबायचें असें त्यांनीं ठरवलें होतें त्यामुळें त्यानें डिग्री घेतली आणि लगेच त्यांनीं लग्न केलें. धुणीं–भांडीं, स्वयंपाक--पाणी, सगळें घरीं हातांनीं करायला ती तयार होती. वाटेल ते हाल झाले तरी तिची हरकत नव्हती. पण त्याची प्रॅक्टिस जमेपर्यंत थांबायला ती तयार नव्हती.

कॉलेजांत तो चांगला विद्यार्थी म्हणून गाजला होता. घरचाही तो वाईट नव्हता. पण त्या लग्नामुळें त्याच्या आईवडिलांनीं त्याला जवळ जवळ टाकलें होतें. त्यामुळें त्यांचें सगळें भवितव्य त्याच्या प्रॅक्टिसवरच अवलंबून होतें. हळूहळू त्यांचा खर्च भागेल इतकी त्याची प्रॅक्टिस चालूही लागली. पण त्या एका मर्यादेपर्यंत आल्यावर उत्पन्नांत वाढ होईना.

परिस्थितीचा त्या दोघांवरही ताण पडूं लागला. पहिल्या उत्साहाच्या भरांत वाटेल ते हाल काढायला जरी रोहिणी तयार झाली होती, तरी संसाराच्या एकसुरी गाण्याला ती हळूं हळूं कंटाळूं लागली. प्रॅक्टिस ही प्रयत्न करून वाढणारी गोष्ट नसल्यामुळें तोही चिडचिडत असे. कंटाळलेल्या मनाला विरंगुळा म्हणून तिसरें कुणी घरांत नसल्यामुळें, तीं एकमेकांवर धुसफुसत–फुरंगटत. त्यामुळें प्रेम असूनसुद्धां त्यांच्यांत कोमटपणा येत चालला. आणि जवळ असून तीं दुरावत चाललीं. पैशाच्या अडचणीवरून ती त्याला बोले, तें टोंचून म्हणून नाहीं; पण आधींच कावलेल्या त्याच्या मनाला तिचें सहज बोलणेंदेखील नांगी मारल्यासारखें लागे.

परवां असेंच झालें. तो शेजारच्या एका गांवीं एका बाळंतपणाच्या केससाठीं जायला निघाला होता. त्याच्या कॉलेजमधल्या डॉक्टरच्या शिफारशीवरून आलेली ही केस होती. त्या बाईची नीट सुटका झाली असती तर चांगले पैसे मिळाले असते, म्हणून तो रोहिणीला सांगायला गेला उल्हासानें. तर तिनें आंबलेल्या आवाजांत म्हटलें,

‘असं नेहमीं आलं काम तर उपयोग? सटी–सामाशीं येऊन काय, आले पैसे न् गेले.’

त्यामुळें तो केसवर गेला तो खट्टू होऊनच. पण त्याच्या बरोबरच्या नर्सनें हें ओळखलें. तिला त्याच्या खट्टूपणाच्या कारणाचीही थोडीबहुत कल्पना होती. तिनें भराभरा पुढें होऊन त्याचें अर्धें काम कमी केलें.

सर्व नीटपणें पार पडलें. त्या बाईनें जर उगीच जोर केला नसता तर दोन टाके द्यावे लागले तेही द्यावे लागले नसते. पण काळजीचें कांहीं कारण नव्हतें. त्याला सकाळच्या गाडीनें परतायला हरकत नव्हती. नर्स मागें राह्यची होती.

तो त्याला दिलेल्या गेस्ट हाऊसमध्यें आला आणि एका आरामखुर्चीत लवंडला. त्यानें सिगरेट पेटवली. त्याच्या हाताला अजून लायसॉलचा थोडथोडा वास येत होता.

अर्धवट केसबद्दल, अर्धवट नर्सबद्दल, तिच्या कुशल तत्परतेबद्दल विचार करीत त्यानें एक दोन झुरके ओढले आणि सिगरेट हातांतच जळत राहिली.

घरून निघतांनाचा प्रसंग आणि त्याच्या अनुरोधाने सगळा जीवन-क्रम त्याच्यापुढें उभा राहिला. हल्लीं त्याचें मन रिकामें राहिलें, कीं त्यांत हेच विचार येत. परवांच्या रोहिणीच्या वागण्याचा, तिच्या त्या चमत्कारिक हट्टाचा त्याला राग आला. आणि तो जो नेहमीं तिला विचारायचा कीं, 'तुला माझ्याशीं लग्न केल्याचं वाईट वाटतं का ?' तो आज आपल्याच मनाला विचारूं लागला, 'आपण रोहिणीच्या घायकुत्या आग्रहाला बळी पडून प्रॅक्टिस जमायच्या आधीं लग्न केलं ही चूक तर नाहीं झाली ?'

असे विचार त्याच्या मनांत आले कीं, खुंट्याला बांधलेल्या गुरावर कुत्रीं धांवून जाऊन सतावूं लागलीं म्हणजे त्या गुराची जशी स्थिति होते तशी त्याच्या मनाची स्थिति होई. आणि तो नुसता तडफडत बसे.

*　　　*　　　*

त्याच्या बोटाला सिगारेटचा चटका बसला. त्यानें थोटूक पायाखालीं दाबून विझवून टाकलें. समोरच्या दारांतून गार झुळुक आली, त्यानें उद्विग्नता जरा कमी झाली.

दारांतून व्हरांड्याच्या वळचणीखालून आभाळ, स्वच्छ चांदण्यामुळें अगदीं धुवट निळें दिसत होतें. आंगणांतल्या माडांच्या झावळ्यांवर चांदणें पडून त्या तलवारीच्या पात्यासारख्या लकाकत होत्या. पिंपळाच्या दाट पालवींत तेंच चांदणें हिऱ्यांच्या झुंबरासारखें चकमकत होतें.

नर्सचें काम आटपलेंसें दिसलें. कारण व्हरांड्याच्या कठड्याला टेकून समोर समुद्राकडे पहात ती उभी होती. पलिकडल्या चांदण्यामुळें तिची आकृति Silhouette सारखी–कृष्णधूसर–दिसत होती. आणि तिच्या शुभ्र पोषाखाच्या चुण्या पडलेल्या कडा, चांदण्यामुळें, किनाऱ्यावर आपटणाऱ्या लाटेच्या फेंसाळ कडेसारख्या दिसत होत्या.

तो आपल्या जागेवरून उठून व्हरांड्याकडे गेला. समुद्राच्या काळ्या कुळकुळीत पाण्यावर पडलेलें चांदणें, काळ्या साटिनीवर रुपेरी जरीनें काढलेल्या चिनाई अजगरासारख्या चित्रविचित्र आकृति घेऊन नाचत होतें. त्यांच्यामधूनच चंदेरी रसाचा एखादा आडवा, लांबच लांब पाट, निःशब्द आवेगानें येऊन किनाऱ्यावर आपटे आणि तिथें फुटून त्याचा दुधाळ फेंस उडे.

तें स्वच्छ निळसर चांदणें मादक होतें. तरल तरंगावर झुलवणाऱ्या बीअरच्या घुटक्यासारखा त्याच्या मनावर त्याचा परिणाम झाला. कठड्याशीं उभें राहून जरा वेळ झाल्यावर त्यानें हांक मारली,

‘ मंजुळाबाई. ’

नर्स दचकून वळली. आतांपर्यंत डॉक्टरनें तिला तिच्या नांवानें केव्हांही हांक मारली नव्हती. आपलें नांव डॉक्टरना ठाऊक असेल कीं नाहीं याची देखील तिला शंका होती.

आज जवळ जवळ आठ वर्षें तीं एकमेकांना ओळखत होतीं. त्यानें मेडिकल कॉलेजांत नांव घातलें, त्याच सुमाराला केव्हां तरी तीही नर्सिंग शिकण्यासाठीं हॉस्पिटलमध्यें गेली होती. आधीं प्रोबेशनर, नंतर स्टाफ नर्स अशीं कामें करून तिनें हॉस्पिटल सोडलें, त्याच सुमाराला त्याचीही परीक्षा पार पडली.

हस्तिदंतासारखा फिकट गोरा रंग, सडपातळ बांधा, प्रसन्न पण गंभीर डोळे आणि बरोबर मध्यें पाडलेल्या भांगापासून किंचित कमानदार उचल घेऊन लहरीलहरींनीं कानांकडे वळलेले काळे कुळकुळीत केस, यामुळें हॉस्पिटलमध्यें सगळ्यांचें तिच्याकडे लक्ष वेधे. विद्यार्थी तर सारखे तिच्या भोंवतीं भोंवतीं घोंटाळत. पण त्याच्या बरोबरच्या सगळ्या विद्यार्थ्यांत कामापलीकडे तिच्याशीं न बोलणारा तोच होता. आणि त्यामुळेंच तो तिच्या लक्ष्यांत ठसला.

बाळंतपणाच्या केसिस् आणि सर्जरी यांत तो सगळ्यांत वरचढ असे. सफाईदार वेगानें ऑपरेशन करणारे त्याचे हात पाहतांना तिला कौतुक वाटे. आपल्या हळुवार हातांनीं ड्रेसिंग करायला तो वार्डमध्यें आला कीं, त्याच्या शेजारीं ट्रॉली घेऊन उभें राहून मदत करायला तिला उल्हास वाटे. पण तो जसा तिच्याशीं कामापलीकडे बोलत नसे; तसें तिच्याही वागण्यांत कुणाला धंदेवाईक तत्परतेपेक्षां जास्त कांहीं दिसत नसे.

त्यानें प्रॅक्टिस सुरू केली तेव्हां मदतीला तिलाच बोलावलें. आणि तीही आपल्याच कामाला आल्यासारखी आली. अजून जरी त्याची प्रॅक्टिस धडपडतच चालली होती तरी आज ना उद्यां प्रॅक्टिसचा जम बसेल ही दोघांनाहि उमेद होती.

तरी त्यानें इतक्या वर्षांत तिला तिच्या नांवानें हांक मारली नव्हती कधीं.

* * *

तो थोडा तिच्याजवळ आला. ती समुद्राकडे पाहात होती. तो तिच्याकडे. तिच्या नव्हाळींतला ताजेपणा आतां कमी होत चालला होता. त्यावर म्लानतेची छाया पडायला आरंभ झाला होता आणि रूक्षता डोकावूं पाहात होती. तरी पण तिचा रेखीवपणा अजून आकर्षक होता.

तो आपल्याकडे पाहातो आहे या जाणिवेनें ती अस्वस्थ झाली. कामाच्या निमित्तानें अगदीं जवळ, अंगाला अंग लावून सुद्धां, उभें राहण्याचे प्रसंग त्यांना अनेक वेळां आले होते. पण आजच्यासारखें अस्वस्थ तिला कधींच वाटलें नव्हतें. आणि आतां आंतल्या आंत जें वाटत होतें, तें तरी हवेंसें होतें, कीं नकोसें होतें, याचाही तिला उमज पडत नव्हता.

'मंजुळाबाई, तुमचे डोळे किती काळेभोर आहेत—'

तिनें अजाणतां डोळे उचलून एकदां त्याच्याकडे पाहिलें आणि परत दृष्टि खालीं वळवली.

'—माझ्या कधीं इतकं लक्षांत आलं नव्हतं. मला वाटतं मी तुमच्या नाजूक, लांबट, शिताफीनें झराझरा काम करणाऱ्या हातांकडेच पहात असें आतांपर्यंत.'

तिचे हात कठड्यावर टेकलेले होते. निमुळत्या बोटांच्या टोंकावरचीं पांढुरकीं नखें किंचित् थरथरलीं. बांकदार ओठ किंचित् विलगले. तिनें थोडीशी हालचाल केली.

तो जागच्या जागींच स्तब्ध होता. नंतर झटकन् पुढें होऊन त्यानें तिचे हात आपल्या हातांत घेतले, आणि तो तिच्या अगदीं शेजारीं आला.

'डॉक्टर,—' तिनें वळून आपली कातर दृष्टि त्याच्यावर रोखली.

पण त्यापूर्वींच त्यानें तिला आपल्या विळख्यांत घेतलें होतें.

क्षणभर–एकच क्षण–तिचें शरीर ताठल्यासारखें झालें. आणि मग त्याला दूर लोटण्यासाठीं म्हणून त्याच्या छातीवर ठेवलेले तिचे हात त्याच्या मानेभोंवतीं गेले, आणि त्याच्या मिठीच्या ओढीनें ती त्याच्याजवळ झाली.

तिच्या कपड्यांच्या चुण्यांमधून तिच्या अंगाची मऊ ऊब त्याला उत्तेजित करीत होती. तिच्या ओंठांचा थरथरता ऊष्मा त्याचें रक्त तापवीत होता.

अनेक वर्षं स्वत:पासून सुद्धां दडवून ठेवलेल्या गूढ इच्छेचें समाधान विजेच्या अकल्पितपणानें आणि धबधब्याच्या आवेगानें तिच्याकडे आलें.

त्या आनंदाच्या हांकेचा तो आघातच तिला साहवला नाहीं. आणि उसळ्या मारीत किनाऱ्याकडे धांवणारी समुद्राची लाट किनाऱ्याचा स्पर्श झाल्याबरोबर शतश: विदीर्ण होऊन ओसरूं लागते, तसा त्याच्या ओठांचा गरम स्पर्श झाल्याबरोबर, त्याच्या भरीव छातीच्या दृढतेचा दाब जाणवल्या-बरोबर, तिचा विळखा सैल पडूं लागला, तिचें अंग गळाल्यासारखें झालें, आणि त्याच्या वेंघेंतून ओघळूं लागलें.

तिच्या ओठांचा उष्मा थंडावल्याचें जाणवतांच त्याच्या अंगांतून एक शिरशिरी येऊन गेली आणि तो भानावर आला. ती अगदीं पडायच्या बेताला आली होती.

त्यानें स्वत:ला सांवरलें आणि तिला आपल्या अंगावर रेलती घेऊन बिछान्यावर नेऊन निजविलें, पांघरूण घातलें, क्षण दोन क्षण तिच्याकडे पाहिलें आणि तो परत व्हरांड्याच्या कठड्याशीं जाऊन उभा राहिला.

क्षितिजाच्या पलीकडून, चंदेरी रसाचे पाट, एकामागून एक नि:शब्द आवेगानें येत, आणि किनाऱ्याचा स्पर्श झाल्याबरोबर शतश: विदीर्ण होऊन दुधाळ फेसांत विरत.

तो तिकडे पहात होता. पण त्याचें लक्ष तिकडे नव्हतें. तें कुठेंच नव्हतें.

*     *     *

कितीतरी वेळ गेला. चंद्र मावळून जाऊन मघांच्या मादक चंदेरी रसाला आतां शिशाचा रंग आला होता. माडाच्या झावळ्यांवरची लकाकी आणि पिंपळाच्या पालवीवरची झगमग नाहींशी होऊन करड्या आभाळावर त्यांचीं काळीं चित्रें रेखाटलीं होतीं.

पहिल्या पहांटेची झुळुक आली, आणि झाडापानांतून सळसळ फडफड झाली. तो ग्लानि आल्यासारखा कठड्याच्या खांबाशीं कलंडून उभा होता, तो सांवरून ताठ झाला आणि आंत गेला. ती अजून निजलेली दिसत होती.

हळूंच टेबलापाशीं जाऊन त्यानें एक चिठी लिहिली—

" नर्स,

झाल्या गोष्टीनंतर माझ्याबरोबर काम करावें कीं नाहीं, असा तुमच्यापुढें प्रश्न पडणें साहजिक आहे. त्याचें उत्तर मी तुमच्यावर सोंपवतों. माझ्यापुरतें मी एवढें म्हणेन कीं, झाली ही गोष्ट झाली नाहीं असें समजून पूर्वीप्रमाणें काम चालू ठेवायला माझी तयारी आहे. या केसनंतर तुम्हीं परत दवाखान्यांत आलांत तर, तुमचीही तशीच तयारी आहे असें मी समजेन.

कसला काय द्यायचें, काय नाहीं तें तुम्हांला ठाऊक आहेच. मी परत गांवीं जातों आहें. "

आपण अगदीं चमत्कारिक वागलों त्यामुळें तर त्याला अस्वस्थ वाटत होतेंच. कारण जाणून बुजून दुसऱ्या बाईकडे जावें इतका कांहीं त्याला रोहिणीचा राग किंवा वैताग आला नव्हता. पण त्या अस्वस्थपणांत आणखी भर घालायला नर्सला आपल्या वागण्यामुळें काय वाटलें असेल हा विचार त्याच्या मनांत येई.

तो घराजवळ आला तेव्हां, आतां रोहिणी पुन्हां कशी काय वागते, हाही प्रश्न त्याच्या पुढें उभा राहिला आणि तो जास्तच अस्वस्थ झालेला असा घरीं पोंचला.

पण घरीं पोंचल्यावर त्याला रोहिणीचें वागणें बदललेलें दिसलें. रोहिणी स्वतः हंसून खेळून त्यालाही प्रसन्न वाटेल अशी वागत होती.

कारण तो केसवर गेल्यावर ती घरीं एकटी राहिली, आणि मग विचार करतांना तिला वाटूं लागलें कीं मुकुंदाचा दोष नसतांना आपण त्याच्यावर चिडतों, त्याला हिरमुसला करतों, त्यामुळें आपण एकमेकांना दुरावत चाललों आहोंत.

आणि तिनें मुकुंदाशीं तो परत आल्यावर कसें वागायचें हें ठरवून टाकलें. केसवरून परत आल्यावर तो जास्तच अस्वस्थ झालेला पाहून तर तिला आपल्या हट्टी वागण्याचा अधिकच राग आला. आणि तो चांगल्या फीच्या केसवर जायला निघाला असतांनासुद्धां आपण त्याला लागेलसें बोललों याचें तिला फार वाईट वाटलें.

त्या रात्रीं बिछान्यांत रोहिणी अगदीं त्याच्या पोटाशीं गेली. तिनें त्याच्या छातीशीं डोकें टेकलें आणि त्याच्या अंगावरून आपला हात टाकला.

तो तिला जवळ घेत म्हणाला,

'कां, आज लाडीगोडी चालली आहे फारशी ? मी पाहतोंय आल्यापासून.'

ती आणखी घुसमटत म्हणाली,

'माझ्यावर रागावला आहेस ना खूप ? तूं म्हणत असशील आपण उगीच हिच्याशीं लग्न केलं.'

'वेडी.' त्यानें तिला अधिक जवळ ओढीत म्हटलें, 'मी खरा खरा रागावेन असं तुला वाटतं कां ? पण तूं एखाद्या अडाणी बाईसारखा हेकटपणा करतेस, तेव्हां मग राग येतो.'

'बरं, येऊं दे.' असें म्हणून ती आणखी कुशींत शिरली.

दुसऱ्या दिवशीं नर्स आली. तिनें त्याला केसचा रिपोर्ट दिला.

एक क्षण कां होईना पण आपण उसळी घेऊन त्याच्या ओंठाला ओंठ दिले होते या आठवणीमुळें तिलाही थोडेसें लाजल्यासारखें, अवघडल्यासारखें, वाटत होतें.

तीं एकमेकांशीं अधिक बोललीं नाहींत, पण त्यांना कळून चुकलें, कीं उसळलेली लाट ओसरली होती. तिची खळबळ देखील राहिली नव्हती.

## मगरीचें चित्र : : ३

रस्त्याच्या बाजूला लाल पिंवळट मुरमाचे लांबोळके ढीग रचलेले असत, त्यांवरून चढ उतर करीत चालायची रोज त्याला मोठी मौज वाटायची, पण आज तो ते टाळून झपझप चालला होता. पंच मोहल्ल्यांत रस्त्याच्या कडेच्या मडग्यांतून मुसलमानांचीं कल्हईचीं दुकानें होती, त्यांत मोठमोठ्या डेगच्यांत उतरून, भिंतीच्या आधारानें उभे राहून लोक अंगें घुसळीत त्याची त्याला गंमत वाटायची, पण आज तिकडे त्याचें लक्ष नव्हतें. वाटेंत रेवडीवाल्यांच्या दुकानांसमोर एक एक दोन दोन माणसें, खांबाना ठोकलेल्या खिळ्यांवर साखरेचा पाक टाकून ओढीत, पुन्हां फेंकीत, पुन्हां ओढीत. लोक अगदीं घामट असत. आणि ते मधून मधून हात थुंकीनें ओले करीत त्याची त्याला किळस येई. पण ओढून ओढून पाकाला धुण्याच्या पिळ्यांचा जाडसर आकार येई. आणि त्यांचा निळा, गुलाबी, सोनेरी रंग रेशमाच्या लड्यांसारखा चमकूं लागे, त्याकडे त्याला पाहात रहावेसें वाटे. पण आज त्यानें त्यांच्याकडे पाहिलें नाहीं.

कारण आज घरीं काम जास्त पडल्यामुळें तो चिडलेला होता. त्यामुळें त्याला शाळेला निघायला उशीर झाला होता. बरोबरचीं मुलें आधींच पुढें निघून गेलीं होतीं. आणि शाळा तरी किती लांब होती. लाल दरवाज्यापासून चारमिनार पर्यंत जायचें ! तो झपाझप चालला होता, इकडे तिकडे न बघतां. आणि झपाझप चालतांना त्याला अगदीं धांपा लागल्यासारखें झालें होतें. तरी तो ओंठ घट्ट मिटून झपाझप चालतच होता. चिडून चिडून चालत होता.

त्यांतच गळ्यांतली पुस्तकांची पिशवी खांद्यावरून ओघळूं लागली. तेव्हां तर अस्सा राग आला त्याला! त्याला मोकळीं न्यायला आवडत पुस्तकें. वरच्या वर्गांतल्या मुलांच्या सारखीं. पण वडील त्याला कधीं नेऊं देत नसत. आणि त्यांनीं त्याला एक पिशवी शिवून दिली होती. सतरंजीच्या कापडाची. अगदीं घाणेरडी! त्याला राग आला वडलांचा. आणि उगीचच मास्तरांचाही. आणि मग शाळेचा आणि अभ्यासाचा, आणि भाषांतराचा. त्याला एकदम आठवण झाली: मास्तरांनी शब्द दिले होते करायला शुक्रवारीं. आज सोमवार. राहिले करायचे—पहिलाच तास भाषांतराचा.

शनिवारीं भूगोलाची परीक्षा होती म्हणून शुक्रवारीं केले नाहींत. मग दुसऱ्या दिवशीं आदितवार म्हणून शनिवारीं केले नाहींत. शिवाय शनिवारीं विटीदांडूची मॅच होती! काय मॅच जिंकली आहे! आणि खेळाचा थकवा किती आला होता! आठवणच झाली नाहीं शब्दांची!

रविवारीं सकाळीं यमिटलीचें औषध आणलें दवाखान्यांतून. दीड तास ताटकळावें लागलें तिथें. दुपारीं—

बागेला विटांची किनार केली. मिरच्याचीं रोपें त्या कोपऱ्यांतून काढून वाफ्यांत रांगेनें लावलीं. नवीन फुलवेलीच्या बिया रोवायच्या होत्या. तें ब्रह्मराक्षसाचें झाड वाटेंतून काढायला किती खणावें लागलें! हाताचीं सालडीं निघालीं अगदीं! फोड आले वालाच्या दाण्यासारखे! आणि नखांत माती! तरी बरें केशव, गंपू, दत्तू जोडीला होते म्हणून. केवढाले किडे निघाले ते जमिनींतून! बाबांच्या पायाच्या आंगठ्याएवढे जाड, दुमडलेले. आणि वसली घोटायच्या कवड्यांसारखे काळे-पांढरे, चितकबरे! एक एक उचलून टाकला कीं कावळे आलेच झडप घालून. काय नांव कुणाला ठाऊक त्यांचें!

आणि पुन्हां दादासाहेबांच्या बागेंतून फांद्या आणल्या विलायती झाडांच्या, कलमें करायला. कहवा पिऊन बिनभुंवयांच्या किलकिल्या डोळ्यांची गुडगुडी ओढीत देवडीवर बसलेल्या बहादुरअलीची...नजर चोरून पळवायच्या. काय धूम टोकली ! तरी मागून ओरडलाच बुड्ढा 'कौन है बे ?' करून. पण थांबतोय् कोण ? गंप्या लेकाचा खरचटला ठेंच लागून. पण बचावला—

शाळेची घंटा कानावर पडली. तसा तो तंद्रींतून जागा झाला. फाटकाशींच होता शाळेच्या. वर्गांत शिरला तों मास्तर नुकतेच आलेले दिसत होते. कारण उपरणें काढून खुर्चीच्या पाठीवर ठेवणें, घड्याळ गळ्यांतून काढून टेबलावर ठेवणें, ह्या नित्याचा कार्यक्रम अजून चालू होता.

त्याला पाहून ते लगेच म्हणाले, ' या, आलांत ? अरे, जागा द्या, जागा द्या त्यांना. '

त्यांचा तो हेटाळणीनें वासलेला जबडा ! रोजचा सराव झाला तरी त्याची भीति कमी झाली नव्हती. आणि त्यांनीं तसा जबडा वासला कीं नाकापासून हनुवटीपर्यंत दोन कंस पडत, डोळे आंवळले जात, आणिडोळ्यांच्या बाहेरच्या कोपऱ्यांकडे कोंबडीच्या पिलांच्या पावलांच्या खुणासारख्या सुरकुत्या पडत. तो जबडा, ते विरल दांत, ते डोळे, विशेष म्हणजे ते आंवळलेले, सुरकुतलेले भेदक डोळे. मगरीच्या सारखें दिसायचें सारें. क्रूर, निष्ठुर, काळजांतून भोंसकीत जाणारें.

त्याच्यावर सहसा असें बोलून घ्यायची पाळी येत नसे. तो खजील होऊन आपल्या जागेवर जाऊन बसला.

मास्तरांनीं आपली चंची टेबलावर ठेवली आणि ते छडी आणि भाषांतराचें पुस्तक घेऊन उठले.

मुलांनीं जागच्या जागीं सरकफरक केलें, आणि तीं सरसावून ताठ बसलीं.

त्याची जागा शेवटीं शेवटीं होती. त्यानें तेवढ्यांत मास्तरांची नजर चुकवून शेवटचे तीन चार शब्द पाहून ठेवले. मार टळावा ही इच्छा, पण कदाचित् टळणार नाहीं ही भीति, यामुळें प्रत्येकाची धाकधूक चालली होती.

'नांगर.' मास्तर ओरडले.

सगळींजणं दबकून पुन्हां ठाकठीक बसलीं. मास्तरांनीं पहिल्या मुलाकडे बोट केलं होतं.

'अं-प्-P-l-o-u-g-h प्लाउ, सर.'

'बस खालीं.'

'बुंद किंवा कत्रा ?'

नंबर दोन गप्प. मास्तर पुढं चालले.

'तूं—'

'तूं—'

'तूं—'

'सी–सी–C–o–f–e–e कॉफी,' एकजण बोलला.

'अॅऽऽ हॅ–हॅ–नेक्स्ट,' मास्तर म्हणाले.

'C–o–f–f–e–e कॉफी, सर.'

'मार थप्पड त्याला अन् जा वरती.'

दत्तूला थप्पड मारायची म्हणजे सोपें काम नव्हे ! डोंगराच्या कड्यासारखा त्याचा देह पाहून मोठ्या मोठ्यांची छाती दडपून जायची. एकदां तर त्यानें गणिताच्या मास्तरांची छडी धरून ठेवली, ती अखेर मास्तरांनाच सोडून द्यावी लागली होती, त्याच्या गालापर्यंत गण्याचा हात

देखील पोचत नव्हता. पण त्यानें उगीच टांचा उंचावून गालाला बोटं लावल्यासारखें केलें.

रप्पकन् छडी टेबलावर आपटली.

'जोरांत, काय भितोस काय त्याला ?'

गंप्यानें दत्तूकड केविलवाण्या नजरेनें पाहिलें. तो खालीं वांकला. गंप्यानें पुन्हां अवसान आणल्यासारखें करून आपली कामगिरी पार पाडली.

आतां मास्तर वर्गाच्या रंगणांत आले.

'बाळा दत्तोबा, कोणत्या दगडाला नवस केला होता तुझ्या आईनें म्हणून तिच्या पदरांत असला गुंड पडलास बाबा ?'

दत्तू बेदरकार बसून राहिला.

आणखी शब्दांची फैर झडली. आज मास्तर ओळीनें शब्द विचारीत नव्हते. वाटेल तिथून उचलीत आणि मुलांकडे भिरकावीत. आणि मागोमाग सपासप छड्या येत.

त्याच्या वरच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या मुलाची पाळी आली.

'मगर किंवा सुसर ?' मास्तर गरजले.

'T-o-r-t-o-i-s-e टॉरटॉइज.'

'चलाव्.'

'यू'—

'यू'—

त्याच्यावर पाळी आली. सगळा वर्ग डोळ्यांची कवाडें उघडून थरकत्या अधीरतेनें त्याच्याकडे पहात राहिला. त्यालाही मार बसेल का ? तो खेळांत तसा अभ्यासांत पण पुढें होता. त्याला कधीं मार बसत नसे.

त्याचें मन गांगरून भलतीकडेच चाललें होतें. मास्तर त्याच्या समोर उभे होते. त्यांचा चेहरा मगरीसारखा झाला होता. आंवळलेले-खाऊं

गिळं करणारे-बिनशब्दांनीं बोलणारे-क्रूर आनंदानें चमकणारे-डोळे, वासलेला जबडा, तंबाकूनें तांबडे—काळे झालेले विरळ दांत, डोक्यावरचे संजाबाचे केंस ब्रशासारखे ताठ, पुढें चकाकणारें टक्कल-त्याला विचारलेला शब्द आठवेना. उलट त्याला आठवलें-एकदां मास्तर त्याच्या वडलांकडे आले होते. मास्तरांची बायको नुकतीच मेली होती आणि त्यांनीं तिच्यावर कविता केली होती. ती वाचायला घेऊन आले होते ते. त्यांत एक ओळ होती—

'जेव्हां तूं वारलीस गे सुभगे.'

ती ओळ वाचून दाखवून मास्तर म्हणाले होते,

'काय चिंतोपंत ?' "स गे सुभगे", कसा-कसा-काय बरं ?--
"अनुप्रास" आहे नाहीं ?'

त्याला त्यावेळीं त्या ओळीचें हंसू आलें होतें. ती ओळ, ते 'स गे सुभगे' 'अनुप्रास'—हें त्याला आतां सगळें आठवलें. पण विचारलेला शब्द आठवेना. संजाब, टक्कल, कविता, तो वासलेला जबडा, ते डोळे— सुसर किंवा मगर—

'चलाव्-बघतोस काय ?—'

तो भानावर आला. मास्तरांच्या मागचा एक मुलगा त्याला तोंडें आणि हातवारे करून कांहीं तरी दाखवीत होता. वर एक मगरीचें चित्र होतें. बरोबर मास्तरांच्या डोक्यामागें. वासलेला जबडा, विरळ विरळ दांत, आंवळलेले डोळे. क्रूर हंसणारे. पण नांव दिसत नव्हतें. मास्तरांचें डोकें आड आलें होतें.

तें चित्र, आणि तो मास्तरांचा वासलेला जबडा. चित्र आणि जबडा —पण त्याला शब्द आठवेना.

तो हातवारे करणारा मुलगा नांवाचें स्पेलिंग सांगितल्यासारखीं तोंडें करीत होता.

हा म्हणाला,

'E–o—'

पुन्हां त्या मुलाकडे पाहून—

'C–r–o–c–o—'

'बोल, बोल पुढें—' मास्तरांचा धीर संपत आला होता.

'E–i–o–e.'

'कर हात पुढें.'

तो पुटपुटत होता.

'हात आण, e–i–o. काय गाढवा—'

सप–सप–सप–सप–सप उजव्या हातावर आणि तितक्याच डाव्या हातावर.

त्याला हुंदके फुटत होते, पण खालच्या ओंठांवर वरचे दांत रोंवून त्यानें ते दडपून टाकले होते. डोळ्यांत टिपें उभीं होतीं पण तीं खालीं पडूं नयेत म्हणून तो पापणी लववीत नव्हता. पापणी थरथरत होती. तो आंतल्याआंत जळत होता.

तशा छड्या त्यानें केव्हांही कशासाठींही खाल्ल्या नव्हत्या.

तो तसाच हात पसरून उभा होता.

घंटा झाली. पुढला तास हेडमास्तरांचा होता. मास्तर टेबलाकडे गेले. ते बाजूला झाल्याबरोबर त्याला मगरीच्या चित्राखालचें इंग्रजी नांव स्पष्ट दिसलें. तें त्यानें हज्जारदां वाचलेलें होतें.

त्यानें आपलें पुस्तक चोळामोळा करीत पिशवींत कोंबलें. दोन टपोरी टिपें ठिबकलीं आणि त्यानें कोटाची बाही फर्रकन् डोळ्यांवरून फिरवली.

## राजम्                                                  : ४

तिनें एकदां कुणाला तरी म्हणतांना ऐकलें होतें कीं, खूपशा लवंगा, गूळ, तीळ असें कांहीं खाल्लें म्हणजे आपल्याला हवें तसें होतें.

पण राजमूला खूपशा लवंगा तीळ मिळायचे कुठें ? घरांत काय मूठभर लवंगा होत्या त्या तिनें एकदां खाल्या. आई घरीं नसतांना दाणागोटा चोरून विकून पैसा दोन पैसे एकदोनदां मिळाले त्याच्याही लवंगा घेऊन खाल्ल्या तिनें. पण वेंकापल्लीसारख्या गांवीं एकट्या एका कोमट्याकडून वरचेवर लवंगा घेऊं लागली ती, तर तें बाहेर पडल्याखेरीज कसें रहाणार ? घरांतला दाणा कमी होत चालला तर तो आईच्या नजरेंतून तरी कसा सुटणार ? शिवाय ज्यांना तो विकायचा त्याच आईला सांगतील ही देखील धास्ती होती. त्यामुळें घशा-पोटाची आग होण्यापलीकडे त्या लवंगांच्या उपायाचा तिला कांहीं उपयोग झाला नाहीं.

पहिल्या पहिल्यानें जेव्हां बेतानेंच ओकाऱ्या येत, तेव्हां ती पहांटेच उठून शेतांत जाई. पण पुढें तिला बसतां-उठतां थकवा वाटूं लागला. दोन घांस पोटांत गेले कीं ' ओक् ' करून बाहेर यायला लागले, तेव्हां तिला लपवणें अशक्यच झालें.

तिची आई सावत्र होती आणि तिला मूलबाळ कांहीं नव्हतें. ती राजम्‌चा फार दुस्वास करी. राजम्‌ला नवऱ्यानें टाकलें होतें, त्यावर ती घालूनपाडून बोले. एकदां त्यांचें खूप भांडण झालें, आणि त्यानंतर त्यांचा कायमचा अबोला झाला.

राजमूला तिच्या सध्यांच्या स्थितींत आपल्या सावत्र आईची भीतीच वाटूं लागली. त्यामुळें त्या घरांत राहणें म्हणजे सांदींत सांपडून वर मुका मार बसावा तसें तिला झालें. जों जों दिवस जाई तों तों तिला जीव जड वाटे.

एक दिवस अगदीं गळून जाऊन अडगळीच्या खोलींत पटकुरावर पडली होती ती. बाप जेवायला बसला होता. तो आईला म्हणाला,

" राजम् नाहीं दिसत कुठें ? "

" तोंड असल पुढें यायला, तर दिसल. "

" म्हंजे ? "

" म्हंजे ? मी हंमेशा म्हणत होती कीं पोरीचं लक्षण बरं नाहीं. तिला नवऱ्याकडे धाडा. पण मी सावत्र आई ना ? असला छिनालपणा करायचा होता तर सासऱ्यां राहूनच नव्हता करायचा ? नाहीं तर ज्याच्यासंगं असलं काम केलं त्याचाच घरठाव करावा जाऊन ! इथं कशाला राहती आमच्या उरावर निखारा व्होऊन ? जल्माला आली, आईला गिळून बसली; लगीन झालं, सासूला खाल्ली. आतां घरीं ऱ्हाऊन आमच्या अब्रूला आग लावतीया. जीव कां न देय् विहीरींत, असलं जिणं जगण्यापरीस ? मीं बोललें म्हंजे सावत्रपण दिसतं. आतां गांव काय बोलतो ऐका, म्हंजे दिसतेल पोरीचे गुण ! म्हणे राजम् दिसत नाहीं. बरी दिसल ? "

बाप कांहीं बोलला नाहीं. राजम् चपापली, त्याचा स्वभाव अबोल पण रागीट होता. मनानें तो वाईट नव्हता, पण दुसऱ्या बायकोला दबून होता. राजमूची छाती धडधडायला लागली. वडील आतांच गरजत येतील कीं काय असें वाटून तिच्या तोंडचें पाणी पळालें. पण त्या दिवशीं तर कांहीं झालें नाहीं.

तसेच आणखी थोडे दिवस गेले. तिला दिवसेंदिवस जास्त अवघड वाटायला लागलें. शेजारणी पाजारणींना तोंड दाखवणें जड झालें. ती अगदीं बेचैन झाली.

एकदां आई शहरांत गेली होती. ती एकदोन दिवस यायची नव्हती. तेव्हां राजमूनें हिय्या करून ठरवलें कीं आज रामण्णाकडे जाऊन काय तो सोक्ष-मोक्ष करून घ्यायचा. त्याला हडसून खडसून विचारायचें. फसवून, फुसलावून, तुला मी माझ्याकडे ठेवीन, आपण बाहेरगांवीं जाऊं, अशी हिंमत देऊन त्यानें आपलें काम साधलें होतें. आतां ती त्याला " अशी स्थिति झाली, बाहेर कधीं जायचें ? " म्हणून विचारायला गेली तर तो अंगावाहेर टाकूं लागला होता. त्यामुळें तिला वेड लागायची वेळ आली.

दुपारीं सगळीकडे सामसूम झाल्यावर ती बालाजीच्या मंदिराकडे गेली. रामण्णा आपल्या एकतारीवर कांहींतरी गुणगुणत ओवरींत बसला होता. ती येऊन ओव्यारीं उभी राहिली. पण त्यानें कळलें न कळलेसें केलें. ती थोडा वेळ थांबली आणि म्हणाली,

" रामण्णा, माझें काय करणार तूं ? एकदां काय तें सांगून टाक. "

" काय म्हणतेस ? तुला सांगितलंय् मी, वैद्याकडून औषध देईन आणून शहरांतून म्हणजे सगळें ठीक होऊन जाईल. पुन्हां पुन्हां कशाला येतेस इथं ? "

" तूं आज तीन महिन्यापासून औषध आणून देतोहेस. इकडे मला दिवसा घराबाहेर निघायची सोय नाहीं. आणि घरांतही राहतां येत नाहीं. मी इथें येऊन राहतें. "

" इथं ? म्हणजे बरें. गांवांतले लोक मला जोडे मारून हांकलून देतील. "

" मग शहरांत चल. तिथें मी मोलमजूरी करीन, आपण काय वाटेल तें करूं. "

" तिथं काय काम वाढून टेवलंय आपल्यासाठीं? जरा दमानं घे. सगळं ठीक होईल."

" ठीक काय होईल? मला इकडे जीव द्यायची वेळ आली आहे. आणि म्हणे दमानें घे."

" मग जीव दे. माझ्या डोक्याशीं कशाला कटकट करतेस?"

तिला संताप आला.

" माणूस आहेस कीं मांग? जीव दे! माझी अशी स्थिती केलीस त्याची कांहीं लाज आहे कीं नाहीं? तूं बऱ्या बोलानें मला आपल्या जवळ कर, नाहींतर इथून शहरांत चल. नाहींतरी एवींतेवीं माझी अब्रू गेलीच आहे, मी गांवभर सगळ्यांना टाकेन सांगून कीं, तुझंच हें काम म्हणून."

" तूं कुणाला भीति दाखवतेस? मला? तूं गांवांत जाऊन सांगून तर पहा. कुत्रा तरी ऐकेल का? तूं असेच धंदे करीत असशील म्हणूनच तुला नवऱ्यानं टाकलं असं गांव बोलतं आहे. आतां तूं जाऊन माझं नांव घेतलंस तर कुणी खरं मानील का? तूं मला धमक्या देऊं नको. इतकं कशाला? तूं गांवांत जायच्या आधीं, तुला पाहिजे असलं तर देवळाच्या पायरीवर इथं उभा राहून मीच बोंब करतों कीं, 'हिला मीं देवळाच्या मागं पकडलं,' मग पाहतों गांव तुला खरं मानतों कीं मला."

" सात जन्म नरकांत लोळत पडशील. तोंडांत किडे पडतील तुझ्या. मांगा, चांडाळा." ती मोठ्यानें किंचाळली. आणि मग तिला राहवेना. ती ओक्साबोक्शीं रडूं लागली.

त्यानें आपल्या एकतारीवर तुणतुणायला सुरवात केली. तिचें रडणें आणि रागावणें थांबेना, तेव्हां तो म्हणाला,

" आतां इथून चालती होतेस, कीं मी गांव गोळा करूं ? "

चेंचलेल्या ठेंचलेल्या मनानें ती तिथून अखेर निघाली

त्या रात्रीं स्वयंपाक करून बापाला जेवायला तिनेंच घातलें. जेवण-बिवण झाल्यावर बापानें तिला विचारलें,

" राजम्, तुझी आई काय म्हणते हें तुझ्याबद्दल ? "

राजम् कांहीं बोलली नाहीं.

" बऱ्या बोलानें मला सगळं सांगा. नाहीं तर माझा स्वभाव तुला ठाऊक आहे. तुझं वय आहे. चूक झाली असेल. कोण बदमाष आहे तेवढें मला सांग, मी त्याला पाहून घेईन. "

एकदां तिला वाटलें, रामण्णाचें नांव सांगून टाकावें, पण दुपारीं बोलल्याप्रमाणें तो सापासारखा उलटला, आणि त्यानें दुसरेंच कांहीं सांगितलें तर तिच्यावर कोण विश्वास ठेवील ? उलट आपण ही अशी नवऱ्यावेगळी राहिलों, म्हणून आपल्यालाच लोक बोलतील, म्हणून ती पुन्हां गप्पच बसली.

तेव्हां बापानें तिला धमकावली.

" राजम्, आई म्हणते तें खरें आहे का ? "

तिनें एकदक हुंदके द्यायला सुरवात केली.

" कोण ? कुठं ? "

" शेतांत. "

" कोण ? "

" ठाऊक नाहीं. "

" ठाऊक नाहीं ? "

" अंधार होता. "

" आपल्या गांवचा होता का ? "

" नीट दिसत नव्हतं. "

" ओरडलीस कां नाहीं ? "

" तोंडांत बोळा दिला होता. "

" घरीं येऊन बोलली कां नाहींस ? "

" भीति वाटली तुमची. मला वाटलं तुम्ही माराल मला. "

" पण आतां हें काय करून बसलीस ? वेळींच कांहीं तरी केलं असतें. आतां कांहीं केलंस तर कारटे, तुला अन् आम्हांला जेल होईल जन्माची. कांहीं तरी याचा बंदोबस्त करायलाच हवा. "

बाप काय बंदोबस्त करणार आहे याची तिला कांहीं कल्पना होईना, कुठेंतरी नेऊन टाकणार आहे कीं, विष घालून मारणार आहे, करणार तरी काय ? त्यापेक्षां आपणच जीव द्यावा असा तिनें मनाशीं विचार ठरवला.

* * *

त्यानंतर कांहीं दिवसांनीं मध्यरात्रींच्या सुमाराला ती पाऊल न वाजवतां बाहेर पडली, आणि बालाजीच्या मंदिरामागच्या विहिरीकडे गेली. तिच्या उरांत धडधडत होतें. इथेंच त्या उलट्या काळजाच्या मांगानें तिला फुसलावलं होतं. तिला एकीकडे रडूं येत होतें. एकीकडे ती मनाचा धडा करीत होती. कांठाशीं पोचतांच ती मटकन् खालींच बसली. इतकी गळून गेली होती. कसेंतरी उठून ओंचा पदर आंवळला तिनें, आणि ती उभी राहिली आणि मन घट्ट करून कांठाशीं गेली. पण रिकाम्या मोटेंतून विहिरींत ठिबकणाऱ्या पाण्याचा 'डबुक्--डबुक्' आवाज, कपारींतल्या बेडकांचें " डरांव्-डरांव् " आणि रातकिड्यांचें " किर्र-किर्र " यांची त्या मध्यरात्रीच्या निःशब्दतेंत तिला भीतीच वाटली. विहिरींतून घुमत येणारे ते आवाज अधिकच गंभीर वाटले. तिचा जीव घाबरला. खोल काळ्याभोर विहिरींत आभाळाचा कवडसा हेलावत होता. आणि ती होती त्यापेक्षां अधिकच

खोल वाटली तिला. ओळखीची विहिर पण तिला अगदीं परकी वाटली. तिला उडी टाकायचा धीर होईना. तिच्या कानांत ते आवाज मोठे-मोठे-मोठे होत चालले. आणि अखेर ऐकूं येईनासे झाले.

ती परत भानावर आली तेव्हां कांठाशेजारी पडली होती. ती उठून परत घरीं गेली.

त्यानंतर तिनें घरांतून पळून शहरांत जायचा विचार केला. आणि पुन्हां एकदां रात्रीचीच बाहेर पडली. गांवाच्या बाहेर आली तशी कुत्रीं भुंकूं लागली. चहूं बाजूंनीं कोल्हेकुई कानांवर पडूं लागली. तिला वाटलें सगळा गांव आतां जागा होणार. म्हणून पावलें भराभर उचलीत ती पुढें चालली. पण अर्धा-एक कोस चालली असेल तेवढ्यांत तिला गळून गेल्या-सारखें वाटलें. आणि जरा पुढें गेली तों तिला गोपीगीरचा मठ दिसला. मठाच्या दाराबाहेर पिंपळाच्या पारावर नेहमीं एक बावा बसत असे. त्याला सगळा गांव, आणि सगळ्या गांवाला तो, ओळखीत असे. रस्ता अगदीं पाराला चाटून जात होता. बावाची धुनी पेटलेली होती, आणि बावा बसलेला होता. ती शें-दोनशें पावलांवर आली असेल तों पाराशेजारीं एक कुत्रा भुंकायला लागला. बावाही इकडे तिकडे पाहूं लागला. तिला वाटलें बावानें आपल्याला पाहिलें तर खास हटकील आणि मग धडगत राह्यची नाहीं.

ती पुन्हां तशीच घरीं परतली.

तिचा जीव द्यायचा आणि पळून जायचा प्रयत्न फसल्यांनंतर कांहीं दिवसांनीं तिच्या बापानें तिला शहरांतल्या एका आश्रमांत आणून टाकलें.

आश्रमांतल्या लाकांनीं राजमूला ठेवून घेतलें. तिथून तिनें एक दोनदां निसटायचा-जीव द्यायचा प्रयत्न केला पण तोही फसला. तिला

पुष्कळदां वाटे कीं, आपण गांवांतल्या विहिरींतच जीव दिला असता तर बरें झालें असतें.

तिचे दिवस भरत आले तेव्हां आश्रमांतल्या लोकांनीं तिला हॉस्पिटल-मध्यें आणून टाकलें.

तिथें आल्यावर ती दिवस मोजीत राहेली. तिच्या सारख्याच दिवस भरलेल्या इतर बायका तिथें होत्या. त्या तिची चौकशी करीत; कोण, कुठली, कितवें बाळंतपण, असे नाना प्रश्न विचारीत, त्यांचें तिला धड उत्तर देतां येत नसे. मग त्या बायका नवल करीत. आसपास कुजबुजत, तिच्याकडे चमत्कारिक नजरेनें पाहात. आणि मग राजमूला अगदीं ओशाळगत होई. तिला वाटे या दवाखान्यांतच आपल्याला मरण आलें तर बरें होईल. किती तरी बायका बाळंतपणांत मरतात.

ती बाळंतीण झाली आणे तिला ताप येऊं लागला.

ती बाळंतीण झाल्याला तिसरा दिवस होता. तिचें चिरमुललेलें, सुकडें मूल तिच्या कॉटच्या पायथ्याकडच्या पाळण्यांत कापसांत गुंडाळलेलें पडलें होतें. तिचा ताप कमी व्हायच्या ऐवजीं वाढत होता. डॉक्टरणी मधून मधून येऊन औषध टोचीत, नर्स येऊन औषध तिच्या घशांत लोटी. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. तिची स्थिति-आधिकच वाईट होत चालली.

आज तर तिची जीभही जड झाली होती. डॉक्टरणींनीं येणें कमी केलें होतें. रात्रीं आठाचा सुमार होता. दिवसपाळीची नर्स रात्रपाळीच्या नर्सला केसिस्‌ची माहिती देत होती. राजमूच्या कॉटजवळ आल्यावर ती थांबली. तिच्या बोलण्यावरून आणि हावभावावरून राजमूनें ओळखलें कीं आपली आशा यांनीं आतां सोडली आहे.

निजानीज होऊं लागली.

राजमूच्या जिवाची तगमग चालली होती. आपण आणि मूल जगलों वांचलों तर आपले काय हाल होतील—आणि आपण मरून मूल वांचलं तर ?—

दहा साडेदहा झाले असतील. नर्सची शेवटची फेरी झाली. आणखी एक डोझ पाजण्यासाठीं ती राजमूच्या कॉटशीं आली. तेव्हां राजमूनें तिला खुणेनें सांगितलें, "मी जातेंच आहें. मूल तेवढं द्या माझ्याकडे एकदां."

नर्स म्हणाली, "वेड्यासारखं करूं नको. तूं बरी होशील."

राजमूनें बोलण्याचा प्रयत्न केला. पण जीभ चालेना. तिनें खुणेनेंच सांगितलें कीं, "सगळं मला माहित आहे. तुम्ही मूल माझ्याकडे द्या."

नर्सनें विचार केला, एर्वीतेवीं बाईची रात्रीचीसुद्धां आशा नाहीं. तिची शेवटची इच्छा कां पुरी न करावी ? म्हणून तिनें मूल तिच्याकडे देऊन तिच्या कानांत म्हटलें, "अगदीं थोडा वेळ घे." आणि ती दुसरीकडे निघून गेली.

मूल जवळ घेऊन राजमूनें पदराखालीं घातलें आणि त्याला घट्ट आंवळून ती कुशीवर वळली. पुन्हां थोड्या वेळानें मूल परत घ्यायला नर्स आली तेव्हां तीं दोघें निचेष्ट पडलेलीं होतीं.

# क्रिकेट, क्रिकेट ! : : ५

हल्लीं आमच्या गांवीं मुलें गल्लोगल्लीं क्रिकेट खेळतात. पण त्यावेळीं आम्हांला क्रिकेट म्हणजे श्रीमंतांचाच खेळ वाटायचा. तशांत आमची शाळा वऱ्हाडांतली, खेडेगांवची. गरीबच होती. आमच्या शेजारची ख्रिस्ती शाळाही मोठीशी श्रीमंत होती असें नाहीं. उलट तिथलीं तीं काळीं काळीं डोक्याला बचकभर तेल लावलेलीं मुलें कधीं आमच्याजवळ आलीं तर आम्हांला शिसारीच येई. आमचीं लंगोटी लावलेलीं मुलेंच आम्हांला बरीं वाटत. आणि त्यांची ती नांवें ? अंतोन, पेद्रु, जोझफ ! शीः !

पण एका बावतींत आम्हांला त्यांचा फार हेवा वाटावयाचा. त्यांना रोज क्रिकेट खेळायला मिळे. अन् आम्हीं ? आमचीं क्रिकेटची ओळख नेल्सनच्या तिसऱ्या इंडियन रीडरापुरती. फार तर त्या ख्रिस्ती शाळेचा खेळ पहावा. एरवीं आपले दिवस बदलतील तसे भोंवरा, गोट्या, नाहींतर विटी-दांडू ! बसा वखट–लेंड–मूंड करीत. क्रिकेट किती मजेदार खेळ ! विकेट-कीपरनें असे पाय फकाटायचे, गुडघे जरा वांकवायचे, आणि त्यांवर कोंपरे टेंकून हाताची ओंजळ करून उभें रहायचें, आणि आला चेंडू कीं पकड ! आणि बॅट्समननें एकेक टोला ऐसा लगवायचा कीं, चालला चेंडू सशा-सारखा ताड्ताड् उडत जमीनी–सरसा !

तीं मुलें क्रिकेटचा संच घेऊन आमच्याकडे पाहात चाललीं कीं, आम्हांला तोंड लपवावेंसें वाटे ! कधीं त्यांचा खेळ पाहात आम्हीं उभे राहिलों आणि त्यांनीं म्हटलें, ‘ काय बामना, इटिदांडू खेळत नाहीं काय आज ? ’ म्हणजे आम्हांला आमच्या शाळेचा असा राग यायचा !

आम्हीं मग एकदां मुलांची सभा भरविली. सभा म्हणजे पांच-पंचवीस मुलें एकत्र जमलों. त्यांना मात्र फी न देतां सुद्धां क्रिकेट मिळतो आणि आम्हीं फी देतों तरी क्रिकेट नाहीं ? वा ! सगळ्यांनीं जायचेंच हेडमास्तरांकडे आणि हट्टच धरायचा कीं, आम्हांला क्रिकेट पाहिजे.

हेडमास्तरांकडे गेलों तेव्हां त्यांनीं पहिल्यानें धुडकावूनच लावलें आम्हांला. जेव्हां पाठच पुरवली अगदीं तेव्हां म्हणाले,

'अरे क्रिकेट विलायती खेळ. त्यांत पुन्हां खर्चाचा ! खर्च करायचा कोणी ? तुम्हीं करतां ?'

'मग त्यांना कसा मिळतो फुकट ?'

'त्यांना मिळतात विलायतेंतून पैसे. तुम्हांला मिळताहेत ?'

'पण ग्रँट मिळते ती ?'

'ग्रँट ? बरींच शिंगं फुटलींत तुम्हांला ? ग्रँट काय क्रिकेटसाठीं मिळते होय ? तुम्हांला पाहिजेच असला क्रिकेट तर तुम्हीं वर्गणी करा. शाळेजवळ नाहींत इतके पैसे.'

आम्ही जरा विचार करून म्हटलें,

'बरं, देऊं आम्ही पैसे. मात्र सगळे नाहीं. थोडे शाळेनें दिले पाहिजेत.' आम्हीं सुचविलें.

'बरं, बरं बघूं—आणूं !'

तेवढ्यानेंच आम्हीं हर्षाच्या अंतराळांत उडालों. कितीतरी दिवस शाळेंत क्रिकेटशिवाय दुसरी बात नाहीं. 'आतां या म्हणावं अंतोनला न् जोझपला झोडपून काढूं. ऐट दाखवताहेत मोठी क्रिकेटची !'

* * *

एका सोमवारीं दहा साडे-दहा वाजतां मुलें ओरडलीं, "क्रिकेट आला नवा क्रिकेट." सगळी शाळा फाटकाशीं गोळा झाली. खरेंच, पुढें

हेडमास्तर गंभीर चेहरा केलेले, आणि त्यांच्या मागोमाग ती कागदांत गुंडाळलेली बॅट, ते स्टम्पस्, तो तांबडा तांबडा चेंडू !–त्यानें लाल लाल झालेले हात पाह्यला किती मजा वाटेल !–हे सगळे आले. आमचीं मनें दावीं तोडून हुंदडूं लागलीं.

त्या दिवसभर मास्तर बिचारे शिकवीत होते. पण आमच्या डोळ्यांसमोर चेंडू नाचत होता, बॅट फिरत होती आणि स्टम्पस् उडत होते–आम्हीं मनांतल्या मनांत टोल्यावर टोले लगावले, धांवा केल्या. कॅचेस् घेतले आणि सोडलेही. ख्रिश्चन् शाळेशीं मॅच घेऊन त्यांना डिफीट सुद्धां दिला–आमच्या मैदानावर त्यावेळीं हिरवें गवत नव्हतें चित्रांतल्यासारखें, पण चेंडू तर होता लाल लाल ?

त्या दिवशीं तासांच्या घंटा किती उशिरा–उशीरानें वाजल्या ! शेवटची घंटा काय ती खरी, तिच्यासाठीं आम्हीं अधीर होतों.

अखेर ती घंटा झाली. आम्हीं पुस्तकें टाकून धूम ठोकली ती सरळ हेडमास्तरांच्या खोलींत.

'सर—'

'आलाय् आऽलांऽय् तो पहा—कांचेच्या कपाटांत.'

'द्या आम्हांला–आतां सुटी झाली—' कपाटाकडे जात कांहीं मुलें म्हणालीं.

'दमानं, सेट तुमचाच आहे. तुमच्यासाठींच आहे. आतां पुढल्या आठवड्यांत शाळेची तपासणी व्हायची आहे. तेव्हां पहिला खेळ आपण साहेबांपुढें खेळूं. कदाचित ते सुद्धां खेळतील. He loves sports. तुम्हांला नाहीं वाटत असं ?'

'पण सर—'

'आतां पण काय ?'

' आम्हीं आतां खेळायला घेतला तर काय झालं ? ते मग पाहतील आम्हांला खेळतांना. '

—' त्यांच्या समोर खेळूंच कीं... '

—' आणि आतांपासून प्रॅक्टिस केली तर---'

' नाहीं........नवीन सेट त्यांच्यासमोर काढायचा. गांवांतल्या लोकांनाही बोलवूं. No, No, झालं ? तुम्हीं सेट मागितलात मी आणला. आतां आठ दिवस म्हणजे कांहीं युगें लोटत नाहीत. '

' पण सर आम्हीं पैसे '—

' Go '—

*　　　*　　　*

पण ते आठ दिवस म्हणजे युगेंच लोटलीं आम्हांला. आणि त्या नंतर तरी साहेबांनीं यावें ! पण नाहीं. त्यानंतर बातमी आली कीं, इन्स्पेक्टर आणखी आठ दिवस येत नाहींत.

ते आठ दिवस गेले. आणखी आठ गेले. आणखी आठ. आणखी आणि आणखीही—

त्या भरांत आम्हीं इन्स्पेक्टरांवर आणि मास्तरांवर मनांतल्या मनांत आणि आपसांत जो राग काढला तो उघड सांगण्यासारखा नाहीं. पावसाची वाट पाहून पाहून तो पडणार नाहींसा झाला म्हणजे शेतकऱ्याच्या मनाची स्थिति होते तीच आमच्या मनाची झाली.

आणि बीं करपून गेल्यावर पावसाची सर यावी तसे दोन महिन्या-नंतर ' साहेब ' आले.

भिंतींना सफेदी, फळ्यांना ' ब्लॅक जपान ' आणि खुर्च्या टेबलांना रोगणें लावून साहेबांच्या स्वागताची तयारी केली गेली. तीन महिन्यांचें होमवर्क एकदम तपासणें, मागल्या तारखा घालून नवीन होमवर्क देणें,

कविता पाठ करून घेणें, संवाद नाणीं बसवणें, यांची धांदल उडवून मास्तर स्वत:ला धन्य समजत होते; आणि ' झॅ, झॅ, ' करून बैलांकडून बळजबरीनें गाडी ओढवून घ्यावी तसें आमच्याकडून कांहीं–बाहीं करून घेत होते.

तपासणी संपली. शाळा सुटली. साहेबांची ' सरबराई ' झाली. आज अखेर खेळ नक्की मिळणार या आशेनें आमचीं खचलेलीं मनें हुरळून उठलीं होतीं. खाऊच्या आशेनें स्वंयपाकघराच्या दाराशीं घोटाळणाऱ्या मुलांप्रमाणें आम्हीं ऑफिसच्या दाराशीं सारखे घोंटाळत होतों.

साहेब उठून उपरणें उचलणार तों हेडमास्तरांनीं त्यांना क्रिकेटचा संच दाखवला—

' हॅः हॅः हें आपण पाहिलं नाहीं. यंदा आम्हीं मुलांच्यासाठीं क्रिकेटचा संच आणला आहे. आमचीं मुलं फार हौशी आहेत. Oh! They like sports awfully. अगदीं मागं लागलीं होतीं. नवीन कांहीं खेळ पाहिजे. मीं कमिटीला म्हटलं, ' मुलं आहेत तर शाळा आहे. आपण पैशाला मागं पुढं पाहूं नये. '

मास्तरांनीं चष्मा काढून तोंड मिशा वगैरे उपरण्यानें पुसल्या आणि चष्मा पुन्हां कानांवर चढवला.

' खरं आहे. खरं आहे. Times are changing. क्रिकेट आणला आहे काय ? Good. क्रिकेट म्हणजे 'King of games'. नागपूरच्या अजब बंगल्यांतल्या एखाद्या अजब वस्तूकडे पाहावें तसें लांबून कपाटांतल्या सेट्चें कौतुक करीत इन्स्पेक्टर म्हणाले, आणि लगेच आपल्या छपरी मिशा डाव्या अंगठ्यानें आणि तर्जनीनें दुभागीत त्यांनीं आपल्या पसंतीचा कटाक्ष चष्म्याच्यावरून पुन्हा एकदां सेट्वर आणि हेडमास्तरांच्या चेहऱ्यावर टाकला.

' मी जातों आतां. रात्रीं गाडी पकडून सकाळला बडनेऱ्याला पोंचलं पाहिजे—नाहीं, मीं थांबत नाहीं आतां. मला त्या ह्यांच्याकडे जेवायला जायचं आहे–आणि–नको नको. तुम्हीं आहांतच, खेळू द्या मुलांना. '

ते फाटकाबाहेर गेले आणि आम्हीं एकदम मास्तरांना घेरून म्हटलें, ' सर—आतां तरी...'

सामान खांकोटींत दडपून आम्हीं मैदानाकडे धूम ठोकली. स्टम्पस् रोंवले, बेल्स ठेवल्या, गडी उभे केले, खेळाला सुरवात झाली.

पहिला ओव्हर झाला, या म्हणावं ' सेण्ट ॲण्टनी' च्या मुलांना.

आमचे चेंडू चुकत होते. बॅट हवेंतच फिरत होती मनांतल्या मनांत जितका चांगला क्रिकेट खेळलों होतों तितका कांहीं जमेना. त्याचा ह्याचा कुठेंच ताळमेळ बसेना. पण क्रिकेट मिळाला याचाच आनंद आम्हांला पुरून उरला होता.

आज हें काय नवल झालें म्हणून पहायला शेजारचीं ख्रिस्ती मुलें टोळ्यांनीं जमा झाली. तीं आमच्या खेळण्याला हंसत होतीं.

पण त्यांचीच ऐट नको, आमच्या जवळही क्रिकेट आहे हें दाखवण्यांतच आम्हीं रंगून गेलों होतों. ते आले म्हणून आम्हीं दुप्पट ऐट आणून खेळूं लागलों.

दुसरा ओव्हर झाला–तिसरा–लगात्र फटकारा—

फाड्–पिच्—

हें काय झालं ? बॅटच्या पात्याची एक झिलपी उडाली.

' काय भटजी ? बॅट खेळत नाय् काय ? ' तीं मुलें ओरडलीं.

आम्ही जरा खट्टूच झालों. नवा क्रिकेट आणि असें कसें व्हावें ! आम्हीं पुन्हां खेळूं लागलों.

त्याच्यापुढच्या ओव्हरला बॅटची मूठ हातांत राहिली आणि पातें एका फील्डरच्या अंगावर धांवलें.

आम्ही जिथल्या तिथें मिनिट अर्धं मिनिट सुन्न एकमेकांकडे पाहात राहिलों.

"हुर्रे !!! क्रिकिट खेळा, क्रिकिट ! ओ भटो, आपला इटीदांडूच वरा ! त्योच खेळा !"

आम्ही शरमेनें खालीं पाहात मुकाट्यानें त्या किडलेल्या बॅटचे हातीं लागतील ते तुकडे गोळा केले, स्टम्प्स उपटून काढले, हातमोजे आणि पायाची ढापणें ओरचाडून ओढलीं आणि परत निघालों. आणि जातांना रागाच्या निराशेच्या, वैतागाच्या भरांत एक स्टम्प् गुढ्घ्या तोडला.

'हुर्रे !!' आमच्या फजितीनें आमचा पाठलाग केला.

त्या क्रिकेटच्या अस्थि नेऊन आम्हीं हेड मास्तरांपुढं ठेवल्या.

'हें काय ?' ते म्हणाले.

काय तें दिसतच होतें.

'एका खेळांत सेट्चा निकाल लावलात ? क्रिकेट खेळायचा म्हणजे काय लांकडं फोडणं वाटलं होय तुम्हांला ? एवढं माहीत नाहीं तर हटलां होतांत कां इतके क्रिकेटसाठीं ?'

'कसला सेट् आणला सर ? एका फटक्यांत बॅट पिचली अन् स्टम्प् मोडला.' आम्ही बॅट्ला स्टम्पची बळेंच जोड देत म्हटलें.

'ही वऱ्हाडची हवाच अशी. जरा चार दिवस कपाटांत ठेवलें तर हें. लगेच उधई लागली वाटतं. काय जमीन आहे इथली. ! Rotten !' ते वस्तूंची उचलठेव करीत पुटपुटले.

एका महिन्यानंतर इन्स्पेक्शनचा शेरा आला त्यांत म्हटलें होतें, 'शाळेंत खेळण्याची व्यवस्था आजतागाईत असून मुलांसाठीं क्रिकेटचा नवा संचही नुकताच आणला आहे. हेडमास्तर उत्साही आहेत.'

## ओढ ! : ६

मला ती सगळी हकीकत माहीत आहे. आम्हीं त्यावेळीं फत्तेचंदाच्या वाड्यांत हत्तीखान्याशेजारीं राहत होतों. आणि आमच्या घराच्या मागच्या बाजूला एका बोळाच्या तोंडाशीं त्यांचें घर होतें. कौलारू छप्पर, मातीच्या भिंती, एक दरवाजा, एक झरोका. मारुतीच्या देवळावरून गलें, मोठ्या रस्त्यानें, तर लांब पडे. पण आमच्या घराच्या मागच्या बाजूनं बाहेर पडलें आणि बडा नाला ओलांडला कीं त्यांचं घर समोर येई. आमची मोलकरीणहि तिकडेच राहात असे.

आज आपण बाजारांत तें दृश्य पाहिलें तेव्हां तुम्हांला नवल वाटलें.

'पांग्या, अरे माय नव्हं कां मी तुझी ? तुला मी इतके दिवस धुंडीत व्हत्ये, अन् तूं मला वळखीनास ' असें म्हणून त्या पांगळ्याच्या गाडीवर ती अगदीं वांकली, तेव्हां आपलें सगळें बळ एकवटून त्यानें तिला जोरानें मागें ढकललें, आणि म्हटलें,

'माय,–कोन् माझी माय ? माझी माय् म्येली. तूं कोनी येडी–गीडी तर न्हाईस ?'

त्यावर तिनें केवढें अकांडतांडव केलें ! अखेर लोकांनीं तिला बाजूला सारलें आणि पांगळ्याच्या सोबत्यानें त्याचा तो देवदारी खोक्याचा गाडा, 'खडड्–खडम् ' करीत पुढें चालवला.

तुम्हांला त्या दोघांचेंहि वागणें चमत्कारिक वाटलें, पण ती खरंच त्याची आईच होती !

*  *  *

आतां आम्हीं त्या भागांत राहात नाहीं. आणि मी परवां गेलों होतों तेव्हां त्यांचें तें घरहि शहर सुधराईकडे गेल्यामुळें बेवारशी झाल्यासारखें उजाड पडलें होतें.

आम्हीं तिकडे राहात होतों तेव्हां तींहि माणसें त्या जागेंत रहात होतीं. ती जहागीरदार हणमंतरावांकडे सडा-सारवण, धुणीं-भांडीं करी. तिचा नवरा रात्रीं दारू पिऊन येऊन तिला मारी. आपण घरांचें रंगकाम करतों असें तो सांगे. आम्हीं तरी कधीं त्याच्या हाता-पायांना रंग-चुना लागलेला पाहिला नाहीं. पण चारदोन रात्रींनीं त्यांचें भांडण आमच्या घरा-समोरच्या पोलिस नाक्यावर यायचें, पोलिसांनीं त्याला धाक धमक्या देऊन तास-दोन तास बसवून ठेवायचें, आणि त्याची शिंदीची धुंदी जरा उतरली म्हणजे त्याला सोडायचें हें मात्र आम्हीं नेहमीं पाहात असूं.

तिचें वय कांहीं फार नव्हतें. पण तो जरा वयस्कच होता. दर वर्ष-सव्वा वर्षीनें तिला मूल व्हायचें, बारा-पंधरा दिवसांनीं ती कामाला जायला लागायची. पुन्हां चार दोन महिने गेलें नाहींत तो तिचें पोट पुढें! जें मूल व्हायचें तें दीड दोन वर्षांचें मरायचें. त्यामुळें डोळे पिवळसर, गाल ओढलेले, आणि सदा थकली भागलेली अशी दिसायची ती.

पांचसहा मुलांतून तिचा एकच एक मुलगा जगला—दुसरा कीं तिसरा—आणि तोहि पांगळा, कंबरेखालीं गेलेला. लहान असतांना ती त्याला कामावर बरोबर घेऊन जायची. पण पुढें तो मोठा झाल्यावर आम्हीं कितीतरी वेळां त्याला, घराच्या पडवींत उदास बसलेला किंवा खुरडत खुरडत नाल्यावर जाऊन वाहत्या पाण्याकडे, आणि त्यांतून "मच्-मच्" करीत हिंडणाऱ्या बदकांकडे, तासन् तास पाहात बसलेला पाहिलें आहे. तो एकटा असला म्हणजे असाच कुठेंतरी एकाग्र होऊन बसायचा. कोणी जातां

येतांना बोललें तर बोलायचा. वयाच्या मानानें त्याचें बोलणें बोबडें, आणि ओढल्या ओढल्या सारखें येई. त्यामुळें बरोबरचीं मुलें त्याला घाबरत. पण त्याला चालतां धांवतां येत नाहीं हें ठाऊक असल्यामुळें तीं त्याची चेष्टाही करीत. त्याला दगड धोंडे मारीत. तो धड उडवून मोठमोठ्यानें ओरडायला लागला कीं त्यांना जणूं मोठी मौज वाटे.

त्यामुळें पुढें तो खरोखरच कावल्यासारखा–पिसाळल्यासारखा करूं लागला. कुणी जवळ आलें तर प्रेमानें येत आहे कीं त्रास द्यायला हें त्याला कळायचें नाहीं, त्यामुळें तो एकदम आरडून ओरडून अंगावर आल्या-सारखा करायचा.

एक आईला पाहिलें म्हणजे मात्र त्याला खराखुरा, पोटांत मावेनासा, आनंद होई. बापानें कधीं त्याच्याकडे लक्षच दिलें नाहीं. आणि दिलेंच तर दडपण्या-मारण्यापुरतें. आईवर त्याचा जीव कीं प्राण! तीहि इतकी गळली–गांजलेली, पण त्याचें आपल्याकडून सगळें करी. तिच्या पुढ्यांत त्याची खोड काढायची कुणाची छाती होत नसे. नवऱ्यानें देखील जर रागाच्या किंवा नशेच्या भरांत पांगळ्याला मारहाण केली तर ती वाघिणीसारखी त्याच्यावर धांवायची. आणि तो जर आपल्या बायकोला मारूं–बिरूं लागला, तर पांगळ्या ओर–ओरडून सगळी गल्ली जागी करी आणि हातीं लागेल तें बापावर फेंकून मारी.

एक दिवस त्याचा बाप जास्तच दारू प्याला आणि बाहेर कांहीं भांडण करून घरीं आला. बायकोला कांहीं कारणानें कामावरून यायला उशीर लागला. तेवढ्यांचेंच निमित्त करून त्यानें तिला खूप मारलें. कधीं नव्हतं इतकी ती विव्हळून रडूं लागली. तेव्हां पांगळ्यानें जवळच चटणी वांटायचा गोटा होता तो उचलून बापावर नेम धरून फेंकला. तो थोडक्यानें

चुकला. तोच दगड घेऊन पांगळ्याच्या डोक्यांत घालायला बाप निघाला. त्यासरशीं तिनें उठून त्याला ढकललें, तों पायरीच्या दगडावर त्याचें डोकें आपटून फुटलें आणि त्यांतून रक्त वाहायला लागलें.

पोलीस आले. पंचनामा झाला. त्याला दवाखान्यांत नेला. डोकें फुटल्यामुळें, कीं आंत आणखी कांहीं विकार झाल्यामुळें कोण जाणें, तो तिथें दोन दिवसांनीं मेला. तिच्यावर खटला होणार असें लोकं बोलत होतीं. पण आजूबाजूच्या लोकांनीं सगळी हकीकत सांगितल्यामुळें ती बचावली.

त्यावेळीं पांगळ्या दहा–बारा वर्षांचा असेल.

नवरा मेल्यावरही ती तिथेंच राहात होती. तिचें रोजचें रहाट–गाडगें पुढें चालू झालें.

तिची प्रकृति हळुहळू सुधारूं लागली. काळी असली तरी ती ताजी दिसूं लागली. सुकत आलेल्या वेलीला शिंपलें म्हणजे ती जशी परत टवटवीत होऊन फुलूं लागते, तसा तिच्याहि तोंडावर ताजेपणा आणि चालण्यांत दमदारपणा आला. डोळे सतेज झाले. गाल भरून आले. सैल आणि गळलेली चोळी घट्ट आणि भरलेली दिसूं लागली.

पांगळ्याचें तो पूर्वींपेक्षांहि अधिक उत्साहानें करूं लागली.

वर्ष–दोन वर्षें गेलीं.

एक दिवस तिच्याकडे कोणसा जवान मनुष्य आलेला दिसला. खांदे–बिंदे रुंद, अंगानें भरलेला, काळा तुकतुकीत, जहागीरदाराकडेच कामाला होता म्हणे तो.

हळुहळू त्याचें येणें वाढत चाललें. तो आला म्हणजे ती पांगळ्याला बदकें पाह्यला नाल्यावर, किंवा मागच्या बाजूला कबरस्तानच्या मैदानांत कांहीं तरी निमित्त काढून पाठवूं लागली.

हलुहळू तिच्याकडून पांगळ्याची आबाळ होऊं लागली. ती त्याच्यावर एवढ्या तेवढ्यावरून चिडूं लागली.

पहिल्या पहिल्यानें तो माणूस पांगळ्याकडे फारसें लक्ष देत नसे. पुढें पुढें पांगळ्याचा बाप जसा त्याला मारून--धमकावून दाबी तसेंच तोहि करूं लागला. पण पांगळ्याची आई त्या नव्या माणसाला गप्प करण्याऐवजीं उलट पांगळ्यावर रागावे. त्यामुळें पांगळ्याला त्याचा जास्तच राग येई आणि आईचाही.

आजूबाजूच्या लोकांनीं तिला पुष्कळ समजावून सांगितलें कीं हें बरें नाहीं. आधीं तिनें उडवाउडव केली. नंतर ती त्यांच्यावरच रागावूं लागली. ती जिथें नोकरीला होती तिथेंही तिच्याबद्दल आणि त्या माणसाबद्दल कुजबूज होऊं लागली होती. आणि त्यांना नोकरीवरून काढून टाकायचें घाटत होतें असें आमच्या मोलकरणीनें आमच्याकडे सांगितलें.

एक दिवस पांगळा मैदानावरून तिन्ही सांजचा परत आला. आई यायची वेळ झालेली नव्हती. पण घराचें दार लागलेलें आणि आंतून उजेड येत असलेला त्याला दिसला. आई आपल्या आधींच आलेली पाहून तो दाराशीं जाऊन ओरडूं लागला. बराच वेळ दार उघडलेंच नाहीं. मग तिनें उघडलें, पण ती चिडलेली दिसत होती. तिच्या मागोमाग तो माणूस आला. तो रागावून त्याच्या अंगावर धांवला. पांगळ्यानें जवळच पडलेला धोंडा त्याच्यावर फेंकण्यासाठीं उचलला. तोंच त्याच्या आईनें त्याच्या हातांतून दगड हिसकावून घेऊन त्याला एक सणसणीत चपराक लगावली.

बाप असतांनाहि ती त्याला कधीं कधीं मारीत असे. पण बापाचा कड घेऊन तिनें त्याला कधींच मारलें नव्हतें. तिनेंच आज त्या परक्या माणसाचा कड घेऊन मारलें. त्याला तें अगदीं चमत्कारिक वाटलें. तो

तिला बिलगायला गेला. तसें तिनें त्याला लांब ढकललें. त्यामुळें तो पडवीच्या खांबावर जाऊन आपटला.

त्या रात्रीं तो रूसून न जेवतां तसाच बाहेरच निजला. पहांटे जागा झाला तों तो माणूस निघून गेलेला होता. पांगळ्या आईजवळ गेला, पण त्याला बाजूला सारून ती आपल्या कामाला लागली. तो नाल्यावर गेला. आणि वाहत्या पाण्याकडे, त्यांत 'मच् मच्' करीत फिरणाऱ्या बदकांकडे, पाहात बसला.

आदल्या रात्रीं खूप पाऊस पडला होता. त्यामुळें त्या दिवशीं नाल्याला पूर आला होता. गढूळ, घाणेरडा, पिंगट. दर पावसाळ्यांत एखाद वेळ तरी नाल्याला पाणी यायचेंच. पाणी जोरांत वाहतांना पहात बसायची पांगळ्याला फार गंमत वाटायची. त्यांत किती भोंवरें व्हायचे बारके बारके, लाटा उठायच्या, फेंस यायचा, खळखळ व्हायची, पोटांत दडलेल्या एखाद्या खडकावर आपटून एखाद्या ठिकाणीं पाणी उसळून परत फिरायचें, पण प्रवाह आपला सारखाच पुढ चाललेला. पाणी एवढें कुठून येतें कळायचें नाहीं. कुठें जातें माहिती नाहीं. आणि कितीहि वाहून गेलें तरी संपतांना दिसायचें नाहीं. तो तासचे तास त्याकडे पाहात बसायचा. आजही तसेंच झालें.

प्रवाहाकडे पाहात असतांना त्याच्या मनांत प्रश्न येत होते. आपली आई आतांशा अशी कां करते ? तो माणूस कोण ? त्याचा कड घेऊन ती आपल्यावर कां रागावते ? ती असं कधीं करात नव्हती मग आतांच कां ? त्याला कांहीं सुचेना. पाणी खळखळत धांवत चाललें होतें. त्याच्या मनांतही तसेंच कांहीं तरी भिरभिरत होतें.

धांवत्या पाण्याकडे पाहून पाहून त्याचें डोकें गरगरूं लागलें.

तो बराच वेळ नाल्याच्या कांठावर बसून परत घराकडे गेला.

त्याला दार उघडेंच दिसलें, पण त्याची आई घरांत नव्हती. त्याला वाटलें, गेली असेल इकडे तिकडे.

संध्याकाळ झाली. ती आली नाहीं.

तिन्ही सांजा झाल्या.

रात्र पडली.

तिची नेहमींची कामावरून यायची वेळ टळून गेली.

ती आली नाहीं.

त्याला बेचैन वाटूं लागलें.

तो रडला–ओरडला. खुरडत शेजाऱ्यांच्या घरीं गेला.

कुणीं त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

कुणीं आपसांत कुजबुजलें.

एकानें त्याला भाकरी दिली.

पहाट झाली.

उन्हें पडलीं.

पण त्याची आई आली नाहीं.

ती आलीच नाहीं.

त्याला कुणी शेजारी पाजारी खायला प्यायला देत. रिकाम्या वेळीं तो नाल्याच्या कांठावर जाऊन बदकें "मच् मच्" करीत पाण्यांतून हिंडत तें पाहात बसे.

आज आपण बाजारांत त्यांना पाहिलें. मीहि त्याला इतके वर्षानंतर आजच पुन्हां पाहिलें. इतकीं वर्षे ती त्याची आई कुठें होती? आणि आजच ती त्याला कां आणि कशी भेटली? मला कांहीं ठाऊक नाहीं.

"हा समारंभ तुम्हीं मला निरोप देण्यासाठीं घडवून आणला आहे. आणि मी आतां कांहींतरी बोलावं अशी तुमची अपेक्षा दिसतेय्—पण काय बोलायचं ? मनाची अशी कांहीं स्थिति झाली आहे–पुष्कळ बोलायचं आहे असं वाटतं आणि बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं असंही वाटतं—

"शिवाय मी आतां इथून अशा ठिकाणीं जातों आहे कीं, तिथें मला इथले कोणतेही बंध बांधून ठेवणार नाहींत. माझ्या मागं मी आपल्या आठवणींच्या खुणा ठेवून जातों आहे कीं नाहीं, कीं माझा मागमूसही राहणार नाहीं, याचीहि फिकीर मला राहिलेली नाहीं."

तो थांबला. खोल आणि स्पष्ट रेषांमुळें कोरून काढल्यासारखा दिसणारा त्याचा चेहरा थोडासा ओढला गेला. त्याची उदास दृष्टि अंतर्मुख झाली. सगळ्यांच्या नजरा त्याच्याकडे लागलेल्या होत्या.

तो काय बोलणार यासंबंधीं प्रत्येक जण आपापल्या मनाशीं तर्क करीत होता. आज पांच वर्षे त्यानें संस्थेंत काम केलें होतें. त्याची कामाची आणि वागण्याची पद्धत अशी असे कीं, अधिकारी आणि सहकारी या दोघांनाही तो सारखाच हवासा वाटे. त्यामुळें एकाएकीं तो असा राजीनामा देईल असें कुणालाच वाटलें नव्हतें. त्यानें राजीनामा कां दिला याचें प्रत्येकाला गूढ पडलें होतें. एक गोष्ट मात्र त्यांच्या लक्षांत आली होती. त्याच्या सगळ्या वागण्यांत एक प्रकारचीं उदास, विमनस्क छटा मधून मधून दिसत असे.

त्यानें राजीनामा दिला तेव्हां कुणाला वाटलें, तो अधिक पगाराच्या नोकरीवर जात असेल; त्याची उदास, विरक्त वृत्ति आठवून कुणाला शंका आली, तो कुठें निरुद्देश प्रवासाला तर जाणार नसेल ! त्यानें स्वतः कुणालाच कांहीं सांगितलें नव्हतें. कुणी कांहीं विचारलें तर तो उत्तर द्यायची टाळाटाळ करी. किंवा म्हणे, ‘ कांहीं विचार-विचार नाहीं. जातों झालं.’

त्याचे ओंठ किंचित हलल्यासारखे झाले. तो गंभीर होऊन बोलूं लागला.

“ मी निरोप घेतों आहें. तुमचाच नाहीं, सगळ्या जीवनाचा, जगाचाच, निरोप घेतों आहें असं कांहींतरी मला वाटतंय्. माझ्या मनांत कांहीं एक प्रकारची खळबळ उडाली आहे, आणि कांहीं आठवणींनीं जड, असह्य जडही वाटतं आहे. असो—

“ मला यावेळीं माझ्या आयुष्यांतला एक प्रसंग आटवतो आहे. तुम्हांला घाई नसली तर-पुन्हां कांहीं—”

सगळीं जणें गप्प होतीं. कुणी हललें सुद्धां नाहीं.

तो पुढें बोलूं लागला—

“ त्या गोष्टीला आतां पंधरा-एक वर्षं झालीं असतील. हिंवाळ्यांतल्या ‘ चालीसा ’ चे दिवस होते. रात्रीं दहा-साडेदहाची वेळ होती. धुकं दाट पडलं होतं. इतकं कीं धुळीच्या-धुराच्या लोटासारखं खिडक्यावाटे आंत घुसतांना दिसत होतं. रस्त्यापलाकडलीं झाडं त्या पलीकडली शहराची सफील, आणि आभाळ हीं सगळीं नाहींशीं होऊन अनंत अवकाशच नुसता पसरलेला दिसत होता. जणूं सगळं जग एकाएकीं कुठें नाहींसं होऊन आमचं हॉस्पिटलच काय तें मागं राहिलं होतं. त्या अदृश्य झालेल्या जगाला जोडणारं असं, आमच्या मागंपुढं इकडंतिकडं कुठं कांहीं सुद्धां दिसत नव्हतं. रस्त्याच्या पलिकडल्या कडेचे दिवे, सांवरीच्या

बोंडांतल्या म्हाताऱ्यांसारखे मऊ मऊ-आहेत नाहींतसे-अंतराळांत कुठं तरी, अगदीं दूर कीं अगदीं जवळ तेंसुद्धां कळत नव्हतं असे-स्थिरावले होते. आणि तिथून जणूं काय आमची गंमत पाहात होते. कां तेही अगतिक झाले होते कुणास ठाऊक!

" आमचा सर्जिकल वॉर्ड होता. सगळ्यांची निजानीज झाली होती. दिवे सगळे मालवले होते. खांबा खांबाला लागून ओळीनें पलंग लावलेले होते. त्यांवर कुणाचे फ्रॅक्चर झालेले पाय वर टांगलेले होते, कुणाला Fowler's position दिलेली होती. कुणाच्या पलंगाशेजारीं सलाइन लोशनचं भांड टांगलेलं होतं. एकाच्या उशाशीं औषधांची ट्रॉली आणि ऑक्सिजनचं सिलिंडर ठेवलेलं होतं.

"त्या सगळ्यांच्या आडव्या-उभ्या-तिरप्या-धूसरशा आकृति त्या आंधळ्या प्रकाशांत कशातरी भेसूर, जणूं काय दुसऱ्याच एखाद्या जगांतल्या असल्यासारख्या, दिसत होत्या.

"आम्ही चौघेपांच जण वॉर्डाच्या एका टोकाला बसलों होतों. आम्हांला दुसऱ्या दिवशीं डिस्चार्ज मिळणार होता. त्यामुळं आमच्यांत एक प्रकारची सहभावना निर्माण झाली होती. चार-दोन महिन्यांच्या हॉस्पिटलमधल्या सहवासामुळं कांहीं लागेबांधेही उत्पन्न झाले होतेच. म्हणून आम्हीं रात्रीं एकमेकांच्या निरोपाच्या, सुखःदुखाच्या गोष्टी बोलण्यासाठीं जमलों होतों. सगळे तीस-पस्तीशीच्या वयांतले, जगाचे हिंवाळे उन्हाळे पाहिलेले होते. एक नबी मोहम्मद काय तो सगळ्यांत लहान, १६-१७ वर्षांचा, होता. पण आम्हां इतर सर्वांपेक्षां जास्त दिवस हॉस्पिटलांत राहिलेला होता—

" खरं म्हणजे सगळीकडे नीजानीज झाल्यावर कुणी पेशण्टनें बोलत बसायचं नसतं. पण आम्हीं नर्सच्या टेबलावरची घंटा, फुलदाणी, पेपरवेट वगैरे पॉलिश करायचं कबूल करून ही सवलत मिळविली होती.

"हॉस्पिटलमधून डिस्चार्ज मिळणार म्हणून कुणाला आनंद वाटणार नाहीं ? आयोडीन, आयडोफॉर्म, कॅरबॉलिक वगैरेसारख्या औषधांचा संमिश्र दर्प. कण्हणं, विव्हळणं, तडफडणं यामुळं अस्वस्थ आणि कोंदट झालेलं तें रोगट वातावरण ! जीव कसा उबून, गुदमरून जातो ! त्यांतून सुटका होणार म्हणून हायसं वाटत होतं.

"आम्हीं कांहीं वेळ नुसतेच बसून होतों. पॉलिश करायच्या त्या वस्तु आमच्या पुढ्यांत तशाच पडल्या होत्या. क्वचित् कुणाचं घोरणं, आणि घड्याळाची अखंड टिक्-टिक्, टिक्–टिक् सोडली तर दुसरं कांहीं ऐकूं येत नव्हतं.

"तेवढ्यांत नबी म्हणाला, 'आतां उद्यां आपण इथून जाणार. पुन्हां कुणाची कुठं भेट होईल कुणाला ठाऊक ! हे लालाजी मेरठला जाऊन परत आपल्या दुकानांत बसून लसूण आणि केशर सारख्याच तत्परतेनें तोलूं लागतील. हे ठाकूरसाहेब परत रोहतकला जाऊन शेती–बागायती करीत राहतील. हे मुन्शीजी पुन्हां कचेरीबाहेर अर्जी–नविशी करूं लागतील. तुम्ही आपल्या मास्टरींत मश्गूल होऊन जाल. हा गेंदा आपली झल्ली खांद्यावर घेऊन फत्तेपुरीच्या नाक्यावर उभा राहून गिऱ्हाइकांची वाट पाहील.'—

"त्यावर गेंदा म्हणाला, 'अपना तो भई हस्पताल छोडने जी नही चाहता.'

"'ये कैसा ?' आम्ही सगळेजण एकदम म्हणालों, 'ये भी कोई रहनेकी जगे है ?'

"'बाबूजी, आपली गोष्ट वेगळी आहे.' गेंदा बोलत होता. 'आम्हांला कधीं रुपया दोन रुपये मिळतात, कधीं दोनचार आणेही नजरेस पडत नाहींत. मिळेल ती फीकी–सूकी रोटी खाऊन आम्ही गुजारा करतों. इथं

जें आम्हांला खायला मिळतं तें एरव्हीं सणासुदीलासुद्धां आम्हांला दिसत नाहीं. जितके दिवस इथं आम्हांला राह्यला मिळेल तितकंच सही.'

" नबी स्वतःबद्दल गप्प होता. मी म्हटलें, ' भय्या नबी. तुम्ही कांहीं बोलत नाहीं.'

" ' काय बोलूं ? इथं आलेला प्रत्येकजण महिना–दोन महिने–तीन महिन्यांनीं डिस्चार्ज होतों. मी आलों तेव्हां मलाही तसंच वाटत होतं. हें पाहिलंत ना ? इथं, बसायच्या जागीं, एक छोटंसं चिंचोक्याएवढं गळूं झालं होतं, तबीब–जर्राह् सगळे झाले. पण तें वाढतच चाललं. म्हणून कापून घ्यायला इथं आलों. औट–डोअरमध्यें कापलं, जरा बरं वाटलं. पण वाहातच राहिलं. मग मला त्यांनीं इन–पेशण्ट केलं. वडील मला सोडून जाऊं लागले, तेव्हां मला अगदीं कसं घशांत दाटल्यासारखं झालं. पण वाटलं महिना दोन महिन्यांत बरा होईन, आणि जाईन. महिना झाला, दोन महिने झाले—चार—आठ – दहा – बारा–आज पंधरा महिने झाले, इथंच रखडतो आहें. गळूं हाडाला पोंचलं. दोनदां तें बरं व्हावं म्हणून डॉक्टरनं हाड तासलं. एकदां दुसरीकडच्या हाडाची चीप काढून तिचं व्रणाच्या जागीं कलम बांधलं. पण तें जगेचना. व्रण वाहातच राहिला. अजून वाहातोच आहे—

" ' आणि आतां उद्यां इथून जायचं. कुठं जायचं ? या बाहेर कशा दाही दिशा नष्ट–अदृश्य झाल्या आहेत. तसं माझं आहे, तुम्ही आपल्या घरून आलां आहां, आपल्या घरीं परत जाल.'—

"इतक्यांत एक वटवाघूळ एका खिडकीवाटे आंत आलं, आणि चौफेर धडपड, फडफड करूं लागलं.

" ' माझं हें असं आहे. मी कुठूनतरी इथं आलों आहे हें खरं. पण इथून जाणार कुठं, करणार काय, तें मात्र कळत नाहीं. मी इथं आल्यावर

सहा–सात महिन्यांनीं माझा बाप मेल्याचं कुणातरी येऊन सांगितलं. त्यावेळीं मला काय वाटलं तें कसं सांगू ! आतां ना आई ना बाप, भाऊ ना बहीण, काका ना मामा असा मी राहिलों आहें'—

" 'उद्या जायचं तर कुठं जायचं ? टांगा किंवा डोली बोलावली तर त्याला किराया द्यायला एक कवडीहि नाहीं. आणि डोलीवाल्याला मी कुठं म्हणून उतरवायला सांगू ?...एक जागा दिसते आहे. घरदार नसलेले तिथंच जातात. तिथंच, जुम्मामशिदीच्या पायरीवर मीहि जाऊन बसेन. तिथं एखाद्या कबाबीच्या दुकानांत बैठं काम मिळेल. निदान मशिदींत जाणारे–येणारे पै-पैसा खैरात तर देतीलच.—पण ही वाहती जखम घेऊन जन्म काढायचा'—

" या प्रसंगाची मला आज आठवण होते आहे. "

सगळेजण गप्प होते.

" माझी स्थिति त्या नबी मोहम्मदसारखीच झाली आहे. पण माझी जखम मनाची आहे.

" आम्ही तीन भावंडं होतों. आम्ही म्हणजे मी, माझा पाठचा भाऊ आणि एकच बहीण. बहीण सव्वा वर्षांची होती, तेव्हां आईबाप वारले. आणि आम्ही पोरकीं झालों. मी असेन पंधरा–सोळा वर्षांचा. अर्ज्या लिहून आणि शिकवण्या करून मी आपलं शिक्षण करीत होतों. भावाचंही करीत होतो. मोठा हुशार होता. वाटलं, मला फार शिकतां आलं नाहीं तर नाहीं, त्याचं शिक्षण करीन. तो नांव काढील. आणि काढलं असतं. पण ऐन विशीच्या वयाला टाय्फॉइडनें त्याचा बळी घेतला.

" मी बहिणीकडे पाहून दिवस काढूं लागलों. मी तिचा आधार होण्याऐवजीं तीच माझा आधार झाली होती. तिच्याचसाठीं मी जगत

होतों. जगणार होतों. नाहींतर मला जगून काय करायचं होतं ? तिला मी आपल्या डोळ्यांतल्या बाहुलीसारखा जपत असें. कशी गोजिरवाणी होती ! किती शहाणी होती ! पण पाडाला आलेलं फळ पिकुटायला लागावं तसं झालं. १४–१५ वर्षांची असतांना ती आजारी पडली. आजार लांबत चालला. दोन महिने, तीन महिने, चार महिने झाले. तिच्या डोळ्यांतली निरंजनं मंदावत चाललीं. तिच्या शुश्रूषेंत किती दिवस आणि रात्री घाल-वल्या त्याला गणती नाहीं.

" पण जणूं काय जें निसटूनच जाणार होतं तें मी धरून ठेवूं पाहात होतों. आणि एक दिवस निरंजन विझलं.

" एकदम मला सगळीकडे उजाड झाल्यासारखं वाटलं. मी म्हटलं, आयुष्याला कांहीं अर्थ आहे का ? कां आपण बेत करीत असतों ? अंत-राळांत गंधर्वनगरी पाहात असतों ? क्षितिजाच्या कडेवर एखादा तारा कल्पून त्याच्या रोखानें कशाला जाऊं पाहतों ? हा एक प्रवास आहे झालं ! कुठूनतरी प्रवास सुरू होतो. वाटेंत आपल्याला चार सोबती भेटतात. कांहीं वेळ हातांत हात घेऊन किंवा आपल्याला हात देऊन साथ करतात. आणि एकामागून एक सोडून जातात. कधीं आपण त्यांना प्रवास करीत ठेवून सोडून जातों. आपण कुठं जात आहों कुणालाच माहित नसतं. कशासाठीं चाललों आहों त्याचा अंदाज नसतो. पण आपण आपले चालत असतों. चालावंच लागतं. थांबणं आपल्या हातीं नसतं म्हणून चालत राह्यचं. कळीची मोटर असते ना ? चावी संपेपर्यंत चालायचं. संपली कीं कुठं तरी कसं तरी थांबायचं—

" तसं माझं झालं. माझे दोन जीवबंध तुटले, त्यांच्या जखमा वाहात राहिल्या-त्या बरोबर वागवीत मी चालत राहिलों आतां मी

इथून दुसरीकडे चाललोंय् ? कशाला ? इथं राहून तरी आयुष्याला कांहीं अर्थ आहे कां ? कुठं तरी कांहीं अर्थ आहे कां ? म्हणून जातोंय—

"आणखी एक मनांत येतं. तेंहि सांगायला हरकत नाहीं. मी प्रेम केलं. सर्वस्वानं केलं. जीवन–प्रवाहाशीं झुंजत असतांना त्या प्रेमानंच मला धीर आणि बळ दिलं. पण त्यावेळीं सहवास लाभला नाहीं. आणि लाभण्यासारखी वेळ आली तेव्हां माझं प्रेमाचं अधिष्ठान माझं राहिलं नव्हतं. किंबहुना तें केव्हांच खरोखर माझं नव्हतं, असं मला आढळून आलं. मी एकटाच प्रेम करीत होतों, आणि ती तिची केवळ वागण्याची लकब होती. याची जाणीव मला हृदयभेदक झाली. त्यामुळें जडूं पाहणारा तिसराही बंध तुटला जगाशीं मला जोडणारं कांहींच शिल्लक राहिलं नाहीं.

"तुम्ही मला निरोप द्यायला आलां आहां. मीही निरोप घेतोंय्. निरोपच. कुठंही गेलों तरी आतां मला मागले लागेबांधे कांहीं राहिले नाहींत ही जाणीव सतत राहील. मग निरोपच नाहीं तर काय ? सगळ्यांचाच निरोप."

तो थांबला. त्याला पुढें बोलवेना. एकदम जड झाल्यासारखा तो खुर्चीत बसला. तिथें जमलेल्या लोकांची अंतःकरणंहि तशींच जड झालीं.

निरोप–समारंभाला लोक जमले तेव्हां लख्ख ऊन होतें. पिवळ्या धमक उन्हाच्या चौकोनांनीं खोलीच्या फरशीला सोन्याचा उजाळा दिला होता.

तें ऊन केव्हां गेलें कुणाला कळलें नाहीं. काळवंडलेला प्रकाश आतां चोरपावलांनीं खिडक्यांवाटे बाहेर पडूं पहात होता. सगळें वातावरण कसें शिशासारखें जड झालें होतें. एक प्रकारची विषण्ण गंभीरता दाटली होती. विजेच्या दिव्याचा कर्कश प्रकाश पाडून ती दूर करण्याचा कुणालाही धीर झाला नाहीं.

## गोपी : : ८

मोतमाउलीची जत्रा भरली होती. टेकडीच्या चढणीवरून तुफान गर्दीचे प्रवाह उलट सुलट चाललेले होते. हजारों माणसांची नुसती रीघ लागलेली होती. त्यांतून रेटींत, दडपीत, वाट काढीत गोपिका पुढंपुढं चालली होती. मागल्या पुढच्या लोकांचे धक्के लागत त्यांची तिला तमा नव्हती. तमासगिरांची लहानमोठीं टोळकीं मध्येंच अडथळ्यासारखीं उभीं असत, त्यांची तिला क्षिति नव्हती. घामट लोकांच्या अंगाची ओकारी आणणारी घाण, दारू पिऊन धुंद झालेल्यांच्या श्वासोच्छासाचा दर्प, सेण्ट आणि पावडरींचे उग्र आणि रुक्ष भपकारे यांची तिला दाद नव्हती. रहाटपाळणे आणि चक्रें चालवणारे, किंवा खेळ-तमाशे करणारे यांच्या आरोळ्या, टिनाच्या कर्ण्यांतून येणारे कर्णकर्कश आवाज, किरकिरीं फिरत होतीं त्यांचें क्वाँवक्वाँव किंवा ताशे–गाड्यांचा कडकडाट, रबरीफुग्यांच्या पुंग्यांचे आणि ताड-पानांच्या पिपाण्यांचे एकसुरी पोंगे, यांपैकीं कांहींही तिच्या कानांना ऐकूं येत नव्हतें. मिठाईचीं, कापडाचीं, बोहऱ्यांचीं-बुरुडांचीं, कांचेचीं-बांगड्यांचीं रंगी–बेरंगी आरास केलेलीं दुकानें, किंवा चित्रविचित्र तऱ्हेदार पोषाख केलेले स्त्री–पुरुषांचे जागोजाग थबकलेले थवे तिच्या दृष्टीस पडत नव्हते. ती एकसारखी पुढें पुढें चालली होती. तिचें सगळें लक्ष मोतमाउलीकडे लागलेलें होतें. आपण केव्हां एकदां वर पोचतों आणि आपला नवस पुरा करतों असें तिला झालें होतें. जणूं काय घटकाभराचा उशीर झाला तर मुहुर्त टळेल, किंवा

मोतमाउली जागची उठून जाईल आणि आपल्याला नवस फेडतां येणार नाहीं, अशी तिला चिंताच वाटत होती.

तिच्याबरोबर तिच्या शेजारच्या रखमा, भिंवरा, यशवदा, धुरपदी वगैरे चारपांच बायका होत्या. त्या सगळ्या जत्रा पाह्यला आल्या होत्या. हें पहा, तें पहा, या दुकानाशीं थांब, त्या दुकानाशीं घोंटाळ याच्याशीं दोन शब्द बोल, त्याच्याशीं थट्टामस्करी कर असें त्यांचें पावलोंपावलीं चाले. त्यामुळें गोपिकेला अगदीं धीर निघेनासा व्हायचा, ती चडफडायची आणि एकटीच पुढें चालूं लागायची. मग बाकीच्या कुरबुरत, तक्रार करीत, धांवत पळत तिला गांठायच्या.

अशाच त्या एका बांगड्यांच्या दुकानापाशीं उभ्या होत्या. रखमा ही बांगडी घालून पहा, ती बांगडी काढून टाक असें करीत होती. गोपिकेची आपल्या डाव्या कडेवर बसलेल्या नंदूला सांवरीत, चुळबुळ चालली होती. ती म्हणाली, "चला ग बायांनों आतां. परतून येतांना घ्या काय घ्यायचं तें."

इतक्यांत धुरपदी पलिकडल्या बाजूला पाहात म्हणाली, "अग ए, भिंवरे, गोपे, तो बघ पांडू. पारीबी हाय संगती जनूं."

हे शब्द कानावर पडल्याबरोबर गोपिकेची चलबिचल झाली. ती मान उंचावून इकडे तिकडे पाहूं लागली.

धुरपदी म्हणाली,

"गेला. तो तिकडं, त्या कापडाच्या दुकानापाशीं उभा होता. गेला आतां गर्दींत. नजरें नाय पडत."

"जाऊं दे गेला तर. जाईनाका कुठं बी." असें म्हणून गोपिका पुन्हां इतर बायकांच्या बरोबर चढणीला लागली. तिची पूर्वींची एकतानता आतां

भंग पावली होती. पांडू जत्रेंत आहे–त्या तिच्याबरोबर आहे–ही गोष्ट तिच्या मनाला खुपूं लागली.

अखेर चढ संपला आणि त्या टेकडीच्या माथ्यावर येऊन पोंचल्या. देवळाच्या आवारांत हारीनें दुकानें लागलीं होतीं. मेणाच्या लहानमोठ्या बाहुल्या आणि मेणबत्त्या, मेणाचे लहानमोठे हात-पाय, नाक-कान, तोंड, दांत, जीभ, डोळे, स्तन वगैरे सर्व अवयव मांडून ठेवलेले होते. ज्यानें जो नवस केला असेल तो ती वस्तु घेई. प्रत्येक दुकानांतलीं माणसें "बाई बाळ घ्या, आई बाहुलें घ्या" करून ज्याच्या त्याच्या मागें लागत. एका दुकानापाशीं थांबून गोपिकेनें एक रुपयाचें एक बाहुलें घेतलें, चार आण्याच्या मेणबत्त्या घेतल्या, शेजारच्या एका दुकानांतून चार आण्यांची फुलें घेतलीं आणि ती देवळांत जायला निघाली.

टेकडीच्या सबंध माथ्यावर नाजुकसा सोनेरी उजाळा आला होता. सूर्य मावळतीकडे झेंप घेत होता. समुद्राच्या काळ्या-निळ्या जलपृष्ठावर सोनसळ्यांचा तरल नाच चालला होता. तो पाहण्यासाठीं रखमा, भिवरी, धुरपदी थांबल्या पण त्या देखाव्याकडे पाठ फिरवून गोपिका देवळाकडे वळली. चारी वाटांनीं लोकांची गच्च गर्दी आंत घुसत होती. त्यांतच तीही शिरली.

समोर गाभाऱ्यांत उंचावर मोतमाउलीची मूर्ति, कडेवर बाळ येशूला घेऊन उभी होती. तिच्या अंगावर जरीकाठी बुट्टेदार आकाशी रंगाचें वस्त्र होतें. डोक्याला सोन्याचा किरीट होता. सभोंवार सोनेरी प्रभा फांकलेली होती. वरतीं चांदव्यांत चांदण्या चमकत होत्या. अरुण–प्रभेनें रंगलेल्या ढगांतून पऱ्या पंखांवर तरंगत होत्या. त्या रम्य, स्निग्ध, तेजोमय दृश्यावर गोपिकेची नजर खिळून राहिली. तिचें हृदय कृतज्ञतेनें उचंबळून येऊन डोळ्यांवाटे ओसंडू लागलें. नंदू दोन वर्षांचा झाला. माउलीनें हा दिवस दाखवला. तिचे हात आणि डोकें नकळत लवलें.

आंत जमलेल्या गर्दीत हिंदु, मुसलमान, पारशी, खिस्ती, काळे, गोरे, ब्राह्मण, कुणबी, गरीव, श्रीमंत, सर्व जातीचे लोक होते. त्यांतून हळुहळू वाट काढीत गोपिका कठड्यापर्यंत पोंचली. कठड्याच्या आंत गेल्यावर तिनें नंदूला कडेवरून उतरून पुढ्यांत घेतलें. पायऱ्यापाशीं नेऊन त्याला डोकें टेंकायला लावलें, तिनेंही डोकें टेंकलें, आणि बाहुलें, मेणबत्त्या, फुलें ओट्यावर ठेवलीं. ती तिथल्या माणसानें तशींच उचलून टोपलींत टाकलीं. गोपिकेच्या मनाला एक निसटता धक्का चाटून गेला. तिला वाटलें होतें, बाहुलें आणि फुलें देवीच्या पायांवर वाहतील, मेणबत्त्या पेटवून ठेवतील, मगच नवस पुरा होईल. तसें झालें नाहीं. तिला शंका आली, ह्यामुळें नवस फेडण्यांत कांहीं उणें तर नाहीं राहणार! ती मनांतल्या मनांत म्हणाली, " आई मोत-माउली, माझ्या बाळाला उदंड आयुष्य दे. माझं काय चुकलं-वांकलं असेल तर पोटांत घाल."

पुन्हां नमस्कार करून ती कठड्याशीं येऊन उभी राहिली.

तिला आज धन्य वाटत होतें. आज दोन वर्षें ती ज्या दिवसाची उत्कंठेनें प्रतीक्षा करीत होती, ज्या दिवसावर तिचा जीव टांगून राहिला होता, तो आज उगवला. तिचीं मुलें जगत नव्हतीं. " नंदूला दोन वर्षें पुरीं झालीं म्हणजे जत्रेंत मी तुला बाहुलं वाहीन." असा ती मोतमाउलीला नवस बोलली होती. मोतमाउली नवसाला पावली होती. तिच्या वैराण आयुष्यांत जिव्हाळा लाभला होता. आज तिनें नंदूला तेल लावून न्हाऊं घातलें होतें. त्याला गोड करून खायला घातलें होतें. कमरेला गोफ, अंगांत नवा कोट सदरा, डोकीला जरीची टोपी, कपाळाला अबीराचा पट्टा असा त्याला सजवून तिनें मोतमाऊलीच्या पायावर घालायला आणला होता. तिचा गळा अगदीं दाटून आला.

आजच्या या सुखांत एकच शल्य होतें. पांडू नव्हता. पंधरा तीन वारापूर्वी एक दिवस सकाळीं तो नेहमीसारखी शिदोरी बांधून घेऊन कामावर गेला आणि संध्याकाळीं परत आलाच नाहीं. तेव्हांपासून ती विमनस्क झाली होती. आपल्यावरून त्याचें मन उतरत चाललें आहे हें तिला दिसत होतें. पण तो घर सोडील असें तिला वाटलें नव्हतें. नंदूसाठीं तरी तो राहील अशी तिची भावना होती. ती भावना फोल ठरली. इतकेंच नाहीं तर तो जत्रेंत आला होता, त्या दुसऱ्या बाईबरोबर आला होता, या गोष्टीमुळें तर ती अधिकच व्यग्र झाली होती.

तिनें डोळ्यांत उभीं राहिलेली आंसवें टिपलीं. पदराच्या टोंकानें तोंड पुसलें. आणि नंदूच्या तोंडावरून एकदां हात फिरवून त्याला कडेवर घेऊन ती बाहेर पडली.

तिला आपले पांडूबरोबरचे सगळे दिवस आठवले. हा पांडू आज जसा पारूच्या नादीं लागला होता तसाच तो दहा वर्षांपूर्वी गोपिकेभोंवतीं रुंजी घालीत होता.

अठरा–वीस वर्षांची जवानीच्या बहराची तिची उमर होती. ती जेव्हां कासोटा कसून विटांची पाटी डोक्यावर घेऊन ठसकेबाज पावलें टाकीत जा–ये करायची तेव्हां आसपासचे लोक आपापलीं हातांतलीं कामें तशींच ठेवून, तिची उभार छाती, गरगरीत दंड--मांड्या आणि रसरशीत अंगकांति यांच्याकडे टकटकां पाहत राह्यचे. त्यांतच पांडू सुतारही होता.

एक दिवस असाच तो तिच्याकडे पाहत असतांना त्याच्या बरोबरचा एक मनुष्य म्हणाला, ‘काय पांडोबा लई पाह्यतायसे? कां, हाय कां नाय्? पण नशीब कसं बघा, ही अशी तरणीताठी, नवरा सुकटकाठी. सदा अंथरूण धरून बसलेला.’

पांडू नुसता हंसला. गोपिकेनें त्याच्याकडे पाहिलें.

त्यानंतर एका संध्याकाळीं ती आपल्या सासूबरोबर घरीं न जातां पांडूबरोबर निघून गेली.

*　　　*　　　*

एक प्रकारच्या धुंदींत त्यांचे दिवस चालले होते. दिवसां कष्ट करावे, रात्रीं चैन करावी. काम नसेल तेव्हां खेळ-तमाशे, सिनेमा-नाटकें, जत्रा-उरूस हीं बघायला जावें. त्याला कसलेही पाश नव्हते. तिनें सगळे पाश तोडून टाकले होते.

एकदां पांडू तिला गमतीनें म्हणाला,

" गोपे, तूं आतां कामावर नको जात जाऊं."

" कां ?"

" अग, कुणी तरी नेईल तुला. "

" कांहीं तरीच बोलतां. मी दुसऱ्यासंगं जाईन व्हय् ? "

" काय त्याचा नेम ?"

" होऽऽ—" ती हेल काढून म्हणाली, "विचारा आपल्याच मनाला."

त्यानें तिच्या गालावर हळूंच टिचकी मारली एक.

महिना, दोन महिने, सहा महिने, एक वर्ष त्यांच्या नकळत पऱ्यांच्या पावलांनीं निघून गेलें.

तिला दिवस राहिले. त्यांच्या सळसळत्या प्रीतीचा पहिला अंकुर होता तो. प्रीतीच्या मंदिरावर मातृत्वाचा कळस चढणार होता. तिच्या सुखाला उधान आलें होतें

आपण आपल्या नवऱ्याला टाकून आलों याची गोपिकेला कधीं खंत वाटलीच नव्हती. अननुभूत अशी गोड अस्वस्थता तिच्या रोमरोमांत भरली होती.

वेळेवर मुलगा झाला. अगदीं गुटगुटीत गोऱ्या. पांडूसारखेच ठसठसीत नाकडोळे, भरलेले ओंठ. त्याला कुठें ठेवूं आणि कुठें नको असें त्यांना झालें. त्यांनीं त्याचें जें कांहीं कोडकौतुक केलें त्याला सुमार नाहीं. त्याच्यासाठीं त्यांनीं किती वेगवेगळ्या प्रकारची अंगडीं टोपडीं केलीं. चाळ वाळे, मनगट्या खुळखुळे, गोफ–ताईत, काय म्हणून त्यांनीं त्याच्यासाठीं केलें नाहीं !

परंतु मुलगा आठदहा महिन्यांचा झाला आणि त्यांच्या सुखाला उतरती लागली. एक दिवस तो आजारी पडला आणि चारआठ दिवसांच्या तापानंतर निवाला.

गोपिकेचा सगळा संसार सुना झाला. घराचा पाया एकाएकीं खचावा तसें तिला झालें. लखलखीत दीप पडून पाठोपाठ दिगंतर काळवंडून जावें तसें सारें जग तिला अंधारलें. जेवणखाण, कामधाम, कांहीं तिला सुचेना. पांडूनें तिची परोपरीनें समजूत घातली. म्हणाला,

" गोपे, वेडे. एवढ्यानें काय अशी खचून जातेस ? जरा हसती–खेळती हो. पुन्हां सारं ठीक होईल."

पण ती कधीं उल्हसली नाहीं.

दिवसगत झाली तसें दुःख बुजत चाललें. पुन्हां ती संसारांत रमली. पहिली खुमारी परत आली नाहीं. पण कडवटपणा कमी होत चालला.

तिला पुन्हां दिवस राहिले. पुन्हां बाळंतपण झालें. पुन्हां मुलाचें कौतुक झालें. वर्ष सवावर्ष गेलें आणि तोहि मुलगा आजारी पडून पहिल्याच्या मागोमाग गेला.

त्यानंतर तशींच आणखी दोन बाळंतपणें झालीं. आणि तींहि मुलें गेलीं.

तिच्या अंगचा रसरशीतपणा सगळा नाहींसा झाला. दंडमांड्या सैल पडल्या. काळासावळी काया पिकुटून सुकत चालली. सुख आणि दुःख दोन्ही तिला सारखींच झालीं. तिच्या शरीराला कीं मनाला कसली वासना म्हणून राहिली नाहीं फुलोरा झडला, पालवी गळाली, नुसत्या फांटया राहिल्या. तेज मावळलें, हंसू हरपलें, आणि जीव जडावला.

पांडूनें तिला खुलवायचा प्रयत्न केला. पण कोमेजून सिटलेलें कमळ पाकळ्या ताणून फुलवण्याचा प्रयत्न होता तो. त्यानें तिला जवळ घ्यावें, कुरवाळावें, परंतु तिच्या अंगाला ऊब म्हणून येऊं नये.

हळुहळू त्याचेंहि मन तिच्यापासून दुरावू लागलें. अधून मधून तो रात्रीचा बाहेर राहू लागला. क्वचित् निशापाणीहि करी. एकदां ती त्याला याबद्दल बोलली, तेव्हां तो म्हणाला,

"मग, माझा मी मालक आहे. मी वाटेल तें करीन. तूं धुण्याच्या पिळ्यासारखी पडून राहतेस—तर मी काय करूं?"

तेव्हांपासून तिचें मन अधिकच विटलें. तिला एखादे वेळीं वाटे, आपण उगीच या बखेड्यांत राहिलों आहों. चालतें व्हावें एक दिवस. पुन्हां वाटे, एकदां नवऱ्याचें घर सोडलें तें सोडलें. हें सोडून कुठें जायचें?

असाच एकदां रात्रीं तो अगदीं टेच होऊन घरीं आला आणि तिच्या अंगाशीं झोंबूं लागला.

ती म्हणाली, "माझ्या वाटे जाऊं नका. माझ्या जिवाला बरं नाहीं—"

तसा तो आणखी लगटला आणि म्हणाला,

"गोपे, हें बरं नाहीं—"

"माझ्या जिवाला बरं नाहीं म्हणते ना. मी आतां धुण्याचा पिळा झालें. जा कोण ताजी तरणी असल तिच्याकडं."

तो बेभान झाला होता, म्हणाला, "रांडे, फार झाले नखरे तुझे. आतां नाहीं मी ऐकायचा." असें म्हणून त्यानें तिला कवेंत धरलें.

त्याबरोबर तिनें त्याला थोबाडींत भडकावून दूर ढकललें, आणि ती म्हणाली,

"तोंड आटपून बोल. रांड कुणाला म्हणतोस—? रांडा असतील दुसऱ्या—"

"तुला, आपल्या नवऱ्याला सोडून आलीस तूं. रांड नाहीं तर काय. मिजास करतेय्—"

त्यानें तिला आंवळून धरून खालीं पाडलें, आणि म्हणाला,

"बोंबल आतां, कर काय करतेस ती."

त्यानंतर तिला पुन्हां दिवस गेले. यावेळीं ती इस्पितळांत गेली. तिथें ती आसपासच्या बायांजवळ आपल्या मागच्या बाळंतपणाच्या गोष्टी सांगून म्हणायची, "मला मुलाची आशा नाहीं. चार झालीं होती याच्याआधीं. वर्षभराच्या मागं पुढं गमवायचीं. काय नशिबांत आहे कुणास ठाऊक.'

तिथें आलेल्या एका पोक्त ख्रिस्ती बाईनें तिला सांगितलें,

'बाई, आतांपावतर पुष्कळ नवस केले असतील तूं. आतां आमच्या वांद्ऱ्याच्या मोतमाउलीला कर. माउली सगळ्यांना पावते.'

गोपिकेनें नवस केला.

नंदू वर्षाचा होईपर्यंत तिला सारखें धाक्धुक् वाटत होतें. त्याला पडसें खोकला झाला तरी तिचा जीव कासावीस होई. त्याचें अंग जरासें

तापलें तर तिच्या जिवाची तगमग होई. डोळ्यांतल्या बाहुलीसारखी ती त्याला जपे. त्याला जेव्हां एक वर्ष पुरें झालें तेव्हां तिच्या जरा जिवांत जीव आला. आणि दोन वर्षांचा झाला तेव्हां तिच्या जिवाला खरा विसांवा मिळाला. वाटलें, माउली आपल्याला खरोखर पावली. केव्हां जत्रा भरते आणि केव्हां आपण नवस फेडतों असें तिला झालें. तो दिवस आज आला होता.

नंदूच्या वेळीं तिला दिवस राहिले तेव्हांपासून पांडूचें घरीं येणें कमीकमीच व्हायला लागलें होतें. पुढें ती बाळंतपणांतून उठली. तरीही त्यानें तिची फारशी विचारपूस केली नाहीं. तो दुरावत चालला होता. आणि अखेर घरच सोडून गेला.

या बाळंतपणांत ती पहिल्या पेक्षांही क्षीण होऊन गेली होती. स्वत:ला संभाळून नंदूला जपतांना तिला पुरेवाट होत असे.

पण तो तिच्या जीवनाचें निधान होता. त्याला सांभाळावें, जपावें, वाढवावें, हें तिच्या जीवनाचें आतां सर्वस्व झालें होतें. त्याचें कौतुक करावें त्याच्यावर लटकेंच रुसावें, तो रडकुंडीला आला म्हणजे पटकन् उचलून पटापट त्याचे मुके घ्यावे यांत तिचें आनंदसर्वस्व सांठलें होतें. त्याच्यावर तिच्या साऱ्या आशा ओळंबलेल्या होत्या. संसारांत दुसरी कसली इच्छा तिला राहिली नव्हती. माझा नंदू मोठा होईल, बाप्या होईल, त्याला मी शहाणा करीन. तो माझे पांग फेडील अशी तिची स्वप्नें होती. त्यांत ती रंगून गेली.

* * *

नवस फेडल्याला चारसहा महिने होऊन गेले. घरें बांधण्याच्या कामावर जायचें गोपिकेनें केव्हांच सोडून दिलें होतें. ती धुण्याभांड्यांचीं घरकामें करी. एक दिवस संध्याकाळीं ती शेजारणीकडे मुलाला ठेवून

नेहमीप्रमाणें कामावर गेली. परत आल्यावर पाहाते तर मुलाला ताप आलेला.

दोनतीन दिवसांनीं ताप गेला पण तेव्हांपासून मुलाची प्रकृति मात्र खालावूं लागली. तो हळुहळूं निस्तेज दिसूं लागला. तिनें पुन्हां नवस केले. घरगुती औषधें केलीं. गळ्यांत लसूण आणि बिब्बे बांधले. शेजारणींनीं कुणी सुचवलें, ' पारूनें नाहीं तर दुसऱ्या कुणीं करणी केली असेल. तूं उलटा कोंबडा दे म्हणजे त्याच्यावर उलटेल.' त्याप्रमाणें गोपिकेनें पांच रुपये पदरचे मोडून उलटा कोंबडाही दिला. पण उतार म्हणून पडेना. पोरगा सारखा पिवळा पडत चालला.

एक दिवस तिनें पाहिलें तों पोराचें पोट फुगलेलं दिसलें. तिनें शेकलें चोळलें, चाटण दिलें. पण कांहीं कमी होईना. दिवसेंदिवस अधिकाधिकच फुगत चाललें. आंतलें हिरव्या शिरांचें जाळें बाहेर आलें. दहाबारा दिवसांत पोट इतकें ताणलें कीं, तेल लावलेल्या तुंब्यासारखें तुकतुकीत दिसूं लागलें. डोळे पिवळे जर्द झाले. त्याला नीट श्वास घेतां येईना. नीट लघवी होईना. तो अगदीं मरगळून निर्जीव होऊन गेला.

कुणी जाणत्यानें सांगितलें,

" मुलाला ऊंस खायला द्या म्हणजे कावीळ बरी होईल आणि लघवी होऊन पोट पण हलकें होईल. "

जो तो आपल्या अकलेप्रमाणें चांगलें करण्याकरतांच सांगे. तीही आपल्याकडून होईल तें करी. परंतु रोगाचें प्रमाण तिळमात्र उतरेना. गोपिकेचा जीव अगदीं गोंधळून गेला होता.

या सगळ्या अवधींत पांडू फिरकलाहि नाहीं. कुणी म्हणे, " आम्ही त्याला कुर्ल्याच्या बाजारांत पाहिला. " " कुणी म्हणे, आम्हांला कल्याणला घरकामावर दिसला होता. "

आणखी एकानें सांगितलें,

" मला तो स्टेशनवर भेटला काल. त्याला मी बोललों, ' नंदूच्या जिवाला बरं नाहीं. ' पर तो कांहीं बोलला नाहीं. "

" बरं. नाहीं बोलला तर नाहीं. " एवढेंच बोलून ती गप्प बसली.

होतां होतां एक दिवस नंदूची प्रकृति फारच बिघडली. तो मधून आंचके द्यायचा आणि मग निपचित पडायचा. तेव्हां गोपिका घाबरली. शेजाऱ्यांनीं जाऊन गांवांतून डॉक्टरला बोलावून आणलें. त्यांनीं नंदूला तपासलें आणि ते गंभीर मुद्रा करून बाहेर पडले. ज्यानें त्यांना बोलावून आणलें होतें त्याला अगदीं हलक्या स्वरांत ते म्हणाले,

" धोंडीबा, पोराला इस्पितळांत ने. घरीं त्याचा इलाज व्हायचा नाहीं. "

नंदूला इस्पितळांत न्यायचें हें कळल्याबरोबर गोपिकेला एकदम रडूंच कोसळलें. ती म्हणाली, " डॉक्टरसाहेब, तेवढं मात्र करूं नका. तुम्हींच काय करायचा तो इलाज करा. इस्पितळांत चिरफाड करतील, कां सुई टोंचतील, कां काय करतील ! नको नको. माझा एवढाच पोरगा आहे. तुम्हींच त्याला वांचवा. "

" बाई, घाबरूं नका. बिमारी वाढली आहे. तिथंच चांगला इलाज होईल. इथं घरीं कांहीं करतां यायचं नाहीं. "

डॉक्टरनीं धंदेवाईक सांत्वन केलें.

अखेर त्याला दवाखान्यांत नेला. तिथल्या डॉक्टरांनीं सांगितलें,

" याच्या पोटांतलें पाणी काढायला पाहिजे. "

पाणी काढून नंदूला परत वॉर्डांत आणून पोंचवलें तेव्हां तिसरा प्रहर झाला होता. नंदू अगदीं निपचित पडला होता. गोपिका त्याच्याकडे पाहात उभी होती.

संध्याकाळ झाली. रोग्यांना भेटणारे लोक येऊं लागले. इतका वेळ गुदमरून टाकणारी शांतता होती ती जाऊन वॉर्ड गजबजला. तिच्याही शेजारचे पाजारचे लोक नंदूला पाहायला आले.

तेवढा तास झरझरा गेला. घड्याळांत " टण् " वाजलं. नर्सनें घंटा वाजवली आणि भेटीला येणारे लोक परत जायला लागले. दहापंधरा मिनि-टांत पुन्हां स्तब्ध शांत झालें.

तिन्ही सांजा झाल्या. पश्चिमेकडे सोनें उधळलें होतें तें निवळून नाहींसें झालें.

होतां होतां दिशा काळवंडल्या. दिवे लागले. आठ साडेआठचा सुमार होता. नंदूच्या पोटांत पुन्हां पाणी सांचलें होतें.

थोड्या वेळानें डॉक्टर आले. त्यांनीं नंदूला पुन्हां बघितलें. त्याच्या तळपायावरून आपल्या जुडग्यांतली एक किल्ली फिरवली, गुडघ्यावर बोटानें ठकठक केलें. छाती-पाठीला नळी लावून तपासलं. आणि कसलेंसें इंजेक्शन देऊन ते जायला निघाले. तेव्हां गोपिकेला अगदीं धीर निघेना. ती डॉक्ट-रांच्या वाटेंत आडवी झाली. आणि पायांवर डोकें ठेवून नुसती रडूं लागली.

डॉक्टर म्हणाले, " ऊठ बाई, आमच्याकडून आम्ही सगळं करतों आहों. तितकंच आमच्या हातीं आहे. "

" होईल ना बरा तो ? मला तेवढाच आहे हो. पांच मुलं झालीं. त्यांतला हाच राहिला आहे. "

डॉक्टर बाजूला होऊन न बोलतां निघून गेले.

नंदू निश्चेष्ट पडला होता. गोपिका नंदूच्या खाटेवर ओणवली. तिनें डोळे भरून त्याच्याकडे पाहिलें. त्याचा श्वास अत्यंत क्षीण आणि अत्यंत कष्टानें चालला होता. "माझ्या राजा" म्हणून तिनें त्याच्या अंगावरून हात

फिरवला. त्यानें एक निमिषच डोळे उघडले, आणि मिटले. तिचा हात त्याच्या निर्जीव जावळावरून फिरत होता. एकाएकीं तो आंचके देऊन हातपाय झाडूं लागला. तिला बघवेना. एक टाहो फोडून ती खालीं हबकली आणि खाटेवर डोकें टेंकून हुंदकूं लागली. तें ऐकतांच नर्स लगबगीनें आली. तिच्या मागोमाग इतर नोकर आले.

तोंपर्यंत नंदूचे, आंचके, श्वास, धडपड, सर्व थांबलें होतें. त्यांनीं सर्कन् खाटेभोंवतीं पडदा केला.

नंदू गेल्याला आठदहा दिवस होऊन गेले. गोपिकेला आतां रडूं येत नव्हतें. तिचे डोळे रडून रडून रखरखीत झाले होते. कोणी मुलाची आठवण केली तरी ती अक्षर बोलत नसे. अहोरात्र नुसती पडून राही.

नंदू गेल्याचें पांडूला कळलें होतें. कांहीं दिवसापूर्वीं पारूहि त्याला सोडून परत आपल्या नवऱ्याकडे गेली होती. त्यानें विचार केला पुन्हां गोपिकेकडे जावें.

दुपारची वेळ होती. दारांतच उंबऱ्याकडे डोकें करून गोपिका लवंडली होती. कुणाची तरी चाहूल आली आणि सांवली पडली असा तिला भास झाला. पण ती तशीच पडून राहिली.

"गोपी—"

पांडूचा शब्द ऐकतांच ती उठून बसली.

"मी आलेंय्."

ती कांहीं बोलली नाहीं. तो पडवीच्या कडेला खांबाशीं बसून राहिला.

"मी ऐकलं." तो जरा वेळानें म्हणाला.

तरीहि ती गप्प होती.

" आपला नंदू—"

हें ऐकल्याबरोबर ती उठली.

"लवकरच आठवण झाली!" असें म्हणून तिनें भयाण भेदक हास्य केलें.

त्यानें तिच्याकडे पाहिलें नाहीं. जरा थांबून खालीं बघतच तो म्हणाला,

"झालं तें होऊन गेलं. आतां लावून बोलं नको—आतां मी—"

" इथं परत राह्यला आलायस् होय? राहा खुशाल. खोली मोकळी आहे."

आणि ती झटक्यानें बाहेर पडून चालूं लागली.

"अन् तूं कुठं चाललीस?" पांडूनें विचारलें.

तिनें उत्तर दिलें नाहीं.

" गोपे. गोपे, मागं ये."

तिनें मागें वळून देखील पाहिलें नाहीं. जणूं तिच्या वाटेंत आड कांहीं तरी येत होतें. तें तोडून, बाजूला सारून, मागें टाकून वाट काढावी तशी ती चालली होती. होतां होतां वळणावरच्या ओसाड घराच्या भिंताडा आड ती दिसेनाशी झाली.

## सज्जावरून : ९

आतांची ही जी गोष्ट आहे, ही कांहीं बंगालच्या भूक-वणव्यांतली ठिणगी नाहीं किंवा युद्धाच्या जगड्व्याळ चरकांतून उजाडलेली चिळकांडीही नाहीं.

आजची ही गोष्ट—" गोष्ट " कसली, एक प्रसंगच, हा आपल्या नित्य दृष्टीस पडणारा आणि, म्हणूनच बहुधा, सहज दृष्टीआड होणारा असा आहे.

ज्यावेळीं लष्करभरती नव्हती, लष्करी गरजाही नव्हत्या; महागाई नव्हती आणि टंचाईही नव्हती; कंट्रोल नव्हता आणि काळा बाजारही नव्हता त्या वेळची गोष्ट आहे हा.

त्या दिवशीं आमच्याकडे कांहींतरी श्राद्ध किंवा पक्ष असावा. जेवायला उशीर होणार हें उघडच होतें. भटजीच मुळीं ११॥—१२ पर्यंत आले नाहींत. त्यामुळें सगळींच अगदीं हवालदील झालीं होतीं. आणि लहान मुलें तर भुकेमुळें झालेली आंतड्यांची ओढाताण सहन न होऊन बसल्याजागींच लवंडलीं.

अखेर बारावर दोन वाजतां पुरुषांची जेवणें आटपलीं. भटजी आणि वडील मंडळी ओसरीवरच गप्पा मारीत बसली. मी वरतीं सज्जांत आरामखुर्चीवर, सिगारेट्चे झुरके मारीत पडून राहिलों.

आमच्या सज्जाच्या समोरच हवेलीवाल्यांच्या वाड्याची मागची—बगीच्याची बाजू येते. बगीचा कसला ! जिकडे तिकडे रान माजलेली

ओसाडीच होती आतां ती ! खुरटलेल्या फुलझाडांचे ताटवे करडई–कोराटीच्या दाटीनें गुदमरून गेले होते. आणि जिथें जाई जुईच्या वेली एकवेळ बहरल्या असतील तिथें खाजकुइरीची झाडें फोंफावलीं होतीं. आणि त्यांतून एक प्रचंड पिंपळ उघडा बोडका असा उठून उभा राहिला होता. त्याची एक मोठी फांदी ओणवून रस्त्यावर आली होती. तिच्या वेड्यावांकड्या सांवल्या पडल्या होत्या. शेंड्यावरचीं उरलींसुरलीं चारदोन जरठ पानें वाऱ्यावर सळसळत फडफडत, आणि मध्येंच मुरड खावून गप्प होत.

माझा डोळा लागला असावा. कारण 'धव्व्' असा आवाज ऐकून मी जागा झालों आणि सांवरून बसलों. आमचीच मोलकरीण उष्ट्या पत्रावळींचा गठ्ठा समोरच्या उकिरड्यावर टाकून परतत होती. तो आवाज ऐकल्याबरोबर पलीकडे पडलेलें फाटकें कुत्रें जागें झालें, आणि आंग मागें ताणून, कान फडफडवून पुढें सरसावलें. चौफेर पसरलेल्या कचऱ्यांत निष्फळ फुंकारे देत असलेलें गाढव पुढें आलें. आवाराच्या भिंतीच्या सांवलींत रवंथ करीत बसलेल्या गायीची समाधि भंग पावली, आणि ती पत्रावळीशीं येऊन त्या ओढून उपसून चाटूं लागली. दोन भिकाऱ्यांचीं मुलें उकिरड्याच्या दुसऱ्या बाजूला सिगारेटच्या पेट्या, कांचेचे तुकडे असें कांहीबाही गोळा करीत होतीं. तींही आपला तो उद्योग टाकून या बाजूला आलीं. आणि त्यांनीं द्रोणांतून उरलेलें, ओघळलेलें तूप आमटी वगैरे चाटायला, आणि मिळेल तें खायला, आरंभ केला. आधीं एक, आणि त्यामागून आणखी दोन चार असे कावळेही काव काव करीत येऊन या मंडळीच्या मध्यें उतरले, आणि चोंचींनीं खालवर करून कांहीं खावें, कांहीं उचलून पिंपळाच्या फांदीवर न्यावें, असें करूं लागले. गाय आपली अधून मधून या लोकांवर फुस्कारी आणि शिंग रोखी. पण हीं सगळीं एकमेकांच्या ओळखीचीं असावींत. कारण तीं तेवढ्यापुरतें—तिचा अदब राखण्यापुरतें–मागें घेतल्यासारखें करीत आणि आपलें काम पुन्हां चालू ठेवीत.

इतक्यांत एक भिकारीण धांवत धांवतच तिथें आली. एका स्तनाला चिकटलेलें मूल हातानें सावरलेलें, अंग अकालीं जरठ झालेलें, अंगावर कापड–वरतीं पिंपळावर जितपत पानें होती तितपतच. तिनें आपलें मूल खालीं ठेवलें आणि त्यांतल्यात्यांत आपल्या पदराचा जो भाग कमी फाटका होता त्यांत लगबगीनें भरतां येईल तें ती भरूं लागली.

"माय, म्यां आज लई तूप खाल्लं बघ." दोन मुलांपैकीं मुलगा म्हणाला.

"आन् म्यां खीर खाल्ली. ह्यो दुरोन बघ." मुलगी मोठ्या फुशारकीनें सांगू लागली

मुलानें त्याला सांपडलेलें एक जुनें वस्तऱ्याचें पातें आईला दाखवायला आणलें, आणि तिनें पदरांत घेतलेल्या वस्तूंतून हळूंच एक घांस घेऊन खाल्ला.

"ऱ्हाऊं द्या. सांजच्याला व्हईल. तिकडं जाऊन खा."

एवढें होतें आहे नाहीं तों दुसरी एक भिकारीण आणि तिची १०–१२ वर्षांची मुलगी तिथें आली. आणि एकदम पहिलीच्या अंगावर धांवून ओरडली.

"एऽ, व्हय येकीकडं. मोठी बसली गोळा करीत. जसा काय बापाचा माल."

"मग काय, तुझ्या बापाचा हाय व्हय ? व्हो तकडं."

एवढ्यांत नवीन आलेलीनें तिला धरून ओढलें. तेव्हां पहिली पदरांत भरलेलें सांवरून उभी राहिली आणि तिनें दुसरीच्या झिंज्या ओढल्या. त्यावर तिनें हिला हिसडा दिला. त्याबरोबर तिचें पदरांतलें सगळें अन्न सड्यासारखें मातीला मिळालें. मग त्यांची झोंबाझोंबी आणि शिवीगाळ सुरू झाली. आणि त्यांत त्यांच्या आईबापांचा नवऱ्या नातलगांचा उद्धार झाला.

मुलें क्षणभर कावरींबावरीं होऊन उभीं होतीं तीं परत उकिरड्याकडे वळलीं. गाय, गाढव, कुत्रा आणि कावळे माणसांना दबकून थोडावेळ थब-कलीं होतीं; त्यांचेंही काम परत चालू झालें.

मला काय वाटलं कुणास ठाऊक. मी आपल्या धाकट्या भावाला निरोप देऊन खालीं पाठविलें कीं, घरांत कांहीं अन्न उरलें असलें तर भिकारणींना द्या. त्यांना उष्ट्यांतून कांहीं मिळालें नाहीं. पांच एक मिनिटांत परत येऊन तो म्हणाला, " आजी म्हणते, दादाला म्हणावं आपलं कालि-जांतलं शहाणपण कालिजांतच असूं द्या. असं अन्न वांटायला लागलों तर साऱ्या गांवांतलं भिकार दारांत गोळा होईल. मस्त उष्टं मिळालं आहे त्यांना. "

हें ऐकून मला थोडेसें हंसूं आलें. कां कोण जाणें! मी कांहीं मोठा उदार होतों असें नव्हे. इतकेंच नव्हे तर, माझें मत, भिकाऱ्यांना पै-पैसा देखील देऊं नये असेंच होतें. अन् तसाच मी वागत असें; कारण आपण देतों म्हणून भिकार पोसतें आणि वाढतें हें माझें तत्त्व होतें. अर्थात मी पैसा दिला नाहीं म्हणून भिकाऱ्याला वाईट वाटलें आहे, किंवा भिकाऱ्यांची संख्या एकानें तरी कमी झाली आहे असें मला मुळींच दिसलें नाहीं. आणि सगळ्यांनीं भीक घालायचें बंद केलें तर भिकारी भीक मागायचें बंद करून कांहीं उद्योगाला लागतील कीं छोट्या मोठ्या चोऱ्या करूं लागतील, याचाही मी विचार केला नव्हता.

मला हंसूं आलें तें माझें स्वतःचें वागणें आणि मी खालीं पाठवलेला निरोप यांतल्या विसंगतीचें कीं, आजीनें माझें कॉलेजांतलें शहाणपण काढलें त्याचें, हें त्यावेळीं लक्षांत आलें नाहीं आणि आतांही येत नाहीं. कदाचित् दोन्ही कारणांनीं असेल. पण हंसूं आलें खरें.

हें सगळें व्हायला पांच-चारच मिनिटें गेलीं असतील. भिकारणी आतां पत्रावळींची ओढाताण करीत होत्या. त्यांच्यापुढें हार खाऊनच बहुधा गाय-गाढव कुत्रा आणि कावळे पुन्हां बाजूला झाले होते. एक भिकारीण पत्रावळींवर ओणवी होऊन दुसरीला कांहीं घेतां येऊं नये म्हणून झटत होती.

तेवढ्यांत मस्त आणि सळकट रेड्याच्या मागोमाग खडत कुरकुरत कसेटीची कचरागाडी आली आणि उकिरड्यासमोर उभी राहिली. आपले जातभाई उकिरड्यांत नाकें खुपसताहेत याची रेड्याला जाणीवही दिसली नाहीं. आणि आपलेही जातभाई उकिरड्यावर अन्नासाठीं ओढाताण करताहेत याची कचरागाडीच्या गाडीवानाला किंवा त्याच्या साथीदाराला जाणीव असलेली दिसली नाहीं. त्यांनीं सगळ्यांनाच उकिरड्यावरून हांकललें. कचरा उपसून गाडींत भरला. पेटी उभी करून ठेवली आणि रेड्याला च्यक्‌च्यक्‌ करून गाडी हांकलली.

"माय ह्ये बघ." मुलानें वस्तऱ्याचें पातें पुन्हां आईला दाखवलें. त्याला हातानें बाजूला सारून तिकडे न पाहतांच ती कडेवरच्या मुलाला सांवरून तशीच पुढें चालली.

गाय पुन्हां भिंतीपाशीं जाऊन रवंथ करीत बसली.

कुत्रें तुरुतुरु चालतें झालें.

गाढव रिकामाच उकिरडा फुंकीत राहिलें. कावळे उडून भिंतीवर जाऊन बसले. पिंपळाच्या ओक्या बोक्या वेड्यावांकड्या फांद्यांची सांवली रस्त्यावर पडली होती.

त्यांवरल्या उरल्यासुरल्या चारदोन जरठ पानांची सळसळ फडफड मधून मधून कानांवर येत होती.

## किरमिजी ओंठ : १०

आज दुपारीं चार वाजतां "कॉफी हाऊस" मध्यें भेटायला सुरेखानें माधवाला बोलावलें होतें.

तिला त्याचा राग आला होता. अगदीं सपाटून राग आला होता. जवळ जवळ गेला सबंध महिनाभर तिनें तो दाबण्याचा प्रयत्न चालवला होता. ऑफिसांत जेव्हां जेव्हां तिला त्याच्याशीं काम पडे तेव्हां तेव्हां संयम ठेवतांना तिला पराकाष्ठेचा त्रास होई. आतां तिला तो कोंडमारा असह्य होऊं लागला होता. तिच्या संयमाचें धरण फुटण्याच्या बेताला आलें होतें. आणि म्हणूनच आपल्या हातानें बांध फोडून आपल्या रागाचा सगळा धबधबा त्याच्यावर सोडायचाच असें तिनें ठरवलें होतें. आणि त्यासाठींच ती आज त्याला भेटणार होती.

तीन चार वर्षें एकत्र एका ऑफिसांत घालवल्यानंतर, बरोबर हॉटेलांत चहा-फराळ केल्यानंतर, मधून मधून सिनेमाला आणि फिरायला गेल्यानंतर देखील माधवानें असें करावें, म्हणजे सुमतीशीं लग्न करावें, हा निव्वळ हलकटपणा, विश्वासघात होता याबद्दल तिची अगदीं खात्री होती. बरें, त्यांतूनही सुमति तिच्यापेक्षां श्रीमंत असती, सुरेख असती, अधिक आकर्षक राहात असती तर गोष्ट निराळी होती. तसें कांहीं नसतांना, त्यानें तिचा सगळा नोंक झोंक झुगारून देऊन त्या "रखड्" मुलीशीं लग्न करावें! खरोखर ती ज्याला हीरो समजली तो गांवढळ निघाला अगदीं!

तिला आठवलें मग. मागेंही तो असाच कधीं कधीं अरसिकपणा दाखवायचा.

तिनें पहिल्यांदाच ओठांना रंग लावला होता, आणि नखांनाही. त्या दिवशीं रेस्टॉरंटमध्यें चहा घेतांना कुणीतरी म्हटलें,

"मिस्टर कुलकर्णी, आज सुरेखाकडे पाहिलं नाहीं तुम्ही!"

"अहो कॉम्प्लिमेंटस् द्या तिला." दुसरी.

"कां बुवा, आज विशेष काय आहे?"

"अहो तिच्या ओठांकडे पहा. नखांकडे पहा."

"इश्श्, असं ग काय करतां?" ती संकोचत म्हणाली होती.

"ओ, यस्, यस्. आहे खरं. आपल्या बुवा हें लक्षांत येत नाहीं." माधवानें उत्तर दिलें होतें.

माधवाची बेफिकीरी पाहून तिला जरा खट्टू वाटलें होतें. पण ती बेफिकिरी खरी नसावी, कारण पुरुष पुष्कळदां बेफिकिरीचें मुद्दामच सोंग करतात, असेंहि तिला वाटलें. मनुष्य इतका कसा अरसिक असेल! आणि तोहि माधवासारखा.

* * *

माधव त्यांच्या ग्रूपमधल्या सगळ्या मुलींचा हीरो होता. युद्ध सुरू झाल्यानंतर सरकारी खात्यांच्या शाखा भरमसाट विस्तारायला आणि वाढायला लागल्या तेव्हां सेक्रेटरिअटच्या सिव्हिल सप्लाय खात्यांत पहिल्यांदाच जीं तरुण मुलेंमुलीं भरलीं गेलीं त्यांतच सुरेखा होती. तिच्या ओळखीच्या इतरही मुली होत्या. त्यांचा एक ग्रूप झाला होता. माधव त्या मुलींपेक्षां पांचसहा वर्षांनीं मोठा होता. त्या सगळ्या मॅट्रिक-इंटरच्या आसपास शिक्षण

सोडून आलेल्या होत्या. माधव बी. कॉम्. होता. त्यामुळें त्याला थोडी वरची जागा मिळाली होती. आणि मुलींवर त्याचा रुबाबही होता. त्याचे केस, त्याची जिवणी, नाक, दांत, डोळे, भुंवया, कपाळ, उघड्या कॉलरींतून दिसणारा भरदार गळा, छाती–सगळें अगदीं तरुण मुलींवर छाप पाडील असें, हीरोला जसें असायला हवें तसें होतें. त्याचें वाचन आणि माहिती तर त्या मुलींच्या अगदीं आवांक्याबाहेर होती. शिवाय साताऱ्याकडे त्याचें घर आणि शेतीवाडी होती. त्याचा मोठा भाऊ साताऱ्याला कीं कोल्हापूरला वकील होता. आणि तो स्वतः कांहीं दिवस नोकरी करून पुरेसे पैसे जमल्या-वर आर्टिकल्स भरून R. A. होणार होता. तरल रोमान्स आणि अगदीं हातांत धरून ठेवतां येईल असा भक्कम रीअलिझम् यांचा त्याच्या ठिकाणीं अशा रीतीनें मोठा मनोहर मिलाफ झाला होता. त्यामुळें बहुतेक मुली त्याच्यावर लक्ष ठेवून होत्या; त्यांतून त्याचें बोलणें, चालणें, वागणें, इतकें मोकळें, सरळ आणि निःसंकोच असे कीं, प्रत्येकीलाच आपल्यावर त्याचें स्नेहपूर्ण लक्ष आहे असें वाटावें! आणि सुरेखाला तर तसें वाटून घेण्याला विशेषच कारण होतें. कारण तिची राहणीच नव्हती का तशी?

आणि सुमति? सुमतीही त्यांच्याच बरोबर त्यांच्याच ऑफिसांत होती. पण सुरेखासमोर सुमती म्हणजे फुलपांखरासमोर मृगाचा किडा! गवतांतून सरपटणारा तो प्रसन्न आणि उज्वल पण एकरंगी किडा कुणीकडे आणि सप्तरंगांचें इंद्रजाल अंतराळांत आंदोलीत जाणारें फुलपांखरूं कुठें! सुमती इंटर झालेली होती, पण घरच्या गरीबीमुळें तिला नोकरी धरावी लागली होती. आणि तरीहि आपली ती सकाळच्या कॉलेजांत जातच होती. म्हणूनच इतर मुलींनीं 'रखड्ड' असें नांव ठेवलें होतें तिचें. बी. ए. व्हायचा बेत होता म्हणे तिचा. कांठ–पदर सुद्धां न छापलेलें तिचें तें एकरंगी पातळ, मिळेल त्या कापडाचा कसातरी शिवलेला ब्लाउझ, पायांत साध्या वाहणा,

कानांत बारा महिने तेरा काळ एकच एक मोत्यांच्या कुडयांची जोडी, आणि तीहि बहुधा तिच्या आईचीच असावी. तिचें तें ओकं बोकं राहणं सुरेखाला मुळींच पसंत नसे.

आणि खरोखरच सुरेखाचें वागणें अगदीं याच्याविरुद्ध होतें. केसांच्या, कुंकवांच्या, इअररिंगच्या, ब्लाऊझेस्च्या, पातळाचा पदर आंवळून किंवा सैल, खांद्याच्यावरून किंवा खालून घेण्याच्या ज्या ज्या फॅशन्स् आल्या आणि गेल्या त्या सगळ्या सुरेखानें केल्या. त्यांत ती केव्हांही मागें राहिली नाही. अशा तिला डावलून माधवानें सुमतीला पत्करावें हें तिला अगदींच चमत्कारिक वाटत होतें. शिवाय तिनें माधवासाठीं काय केलें नव्हतें! तिच्या भोंवतीं घुटमळणारे आणि घोटाळणारे इतर तरुण नव्हते असें थोडेंच आहे! तिच्या बरोबर जायला यायला मिळावें म्हणून धडपडणारे, गाडीच्या गर्दींत मुद्दाम तिच्या मागोमाग चढणारे. आणि त्यावेळीं इतर असभ्य लोकांचा तिला धक्का लागूं नये म्हणून 'केवळ तिच्या संरक्षणासाठीं...' तिच्या भोंवतीं आपल्या सभ्य बाहूचा अडसर घालणारे, या सगळ्यांकडे पाठ फिरवून सुरेखानें माधवावर नजर रोखून ठेवली होती.

म्हणूनच त्याचें लग्न झाल्यापासून तिच्या मनांत निराशा, क्रोध, अपमान, तुच्छता यांचें संकुल युद्ध चाललें होतें. झालेलें लग्न मोडणें अर्थातच शक्य नव्हतें. पण त्यानें आपला कसा विश्वासघात केला हें मात्र त्याला केव्हांतरी सांगायचेंच असें तिनें ठाम ठरवलें होतें. आणि त्यासाठींच तिनें आज त्याला भेटायला बोलावलें होतें. आज ती मुद्दाम इतका आकर्षक पोषाख करणार होती कीं, निदानपक्षीं "सुमतीची निवड करण्यांत आपण चुकलों तर नाहींना!" एवढा तरी विचार त्याच्या मनांत आलाच पाहिजे.

* * *

आज चार वाजतांची भेटीची वेळ ठरली होती.

तिचें पत्र ज्यावेळीं त्याच्या हातीं पडलें असेल त्या सुमाराला ती आपल्या घराच्या पुढच्या खोलींत, खिडकीच्या गजाला टेकलेल्या लहानशा आरशासमोर तयारी करीत उभी होती. हमाम साबणाच्या विपुल फेसानें स्वच्छ धुतलेलें तोंड, मान आणि कान तिनें तिच्यासाठीं खास राखून ठेवलेल्या एकवेळ गुबगुबीत पण आतां विशविशीत झालेल्या टर्किश टॉवेलनें कोरडे केले, केसांच्या फुग्यांवरून हलका हात फिरवला. तोंडावर पावडरच्या फुलानें टचेस दिले आणि हलक्याच किंमतीचा रूज पण मॅक्स फॅक्टरच्या सूचनांनुसार आंतून बाहेर वर्तुळाकार बोटें फिरवीत–दोन्ही गालांवर चोळला, ओठांवरून किरमिजी रंगाची कांडी फिरवली, आणि शेवटीं बाटलींतून कुंकू घेऊन कपाळावर एक मोठा टिळा आणि त्याच्याखालीं एक टिकली लावली. हल्लीं तीच फॅशन होती कुंकवाची. मोराचें पास, इंग्लंडच्या राजाचा मुकुट, चंद्राची कोर, फुललेलें कमळ, उगवता (किंवा मावळता) सूर्य यांचे ठसे कपाळावर उठवण्याची फॅशन out of fashion झाली होती. त्या ठशांचे पत्रे सगळे रंगानें लडबडलेले, एका डबींत जवळच निर्माल्याची अवकळा घेऊन पडले होते. कुंकू लावून झाल्यावर तिनें दोनतीन इअर–रिंग्ज कानाला लावून पाहिल्या. एकाखालीं एक तीन छऱ्या अर्ध्या खांद्यापर्यंत येणाऱ्या होत्या, त्या तिला बऱ्या वाटल्या नाहींत. जपानी पंख्यासारख्या पसरलेल्या जाळीदार पत्र्याच्या तिला फॅलट वाटल्या. सुपारीच्या घोंसासारख्या खांद्यापर्यंत लटकणाऱ्या तिला कशाशाच वाटल्या. शेवटीं तिनें अगदीं अलिकडे घेतलेल्या–फणा उभारलेल्या नागिणीच्या डिझाइनच्या इअर–रिंग्ज पसंत केल्या. अलिकडच्या तरुण मुलींत, विशेषतः ऑफिसांत जाणाऱ्या तरुण मुलींत त्या फार पॉप्युलर होत्या. कारण नुकत्याच "बोल जिवलगा" बोलपटांत मिस् मदयंती एम्. ए. डी. टी. हिनें प्रेमविव्हल नायिकेच्या भूमिकेंत

त्या वापरल्या होत्या. आणि त्या भूमिकेला त्या अतिशय योग्य होत्या, असेंही एका विख्यात सिनेमा साप्ताहिकांत प्रसिद्ध झालें होतें. कारण नागीण हे तिचें प्रतीक आहे असें त्यांत म्हटलें होतें. अर्थात्, सुरेखा कांहीं प्रेम–विव्हल नायिका म्हणून आतां माधवाला भेटायला जात नव्हती. पण तें डिझाइन अगदीं नवीन होतें. म्हणून तेंच तिनें पसंत केलें.

सगळी तयारी झाली. निघण्यापूर्वीं तिनें पुन्हां एकदां फुगे नीट फुगवले. आणि कोपऱ्यांतले सॅण्डल्स घालायला ती सरसावली. तेवढ्यांत कांहीं आठवण होऊन तिनें आपल्या नखांकडे पाहिलें. कांहीं ठिकाणीं रंग उडाला होता. त्यावर तिनें पुन्हां ठिपके टेंकले आणि ती जायला निघाली.

हा तिचा जामानिमा चालला असतांना तिचे वडिल तिच्या मागच्या बाजूला पलंगाच्या उशाला टेंकून " कल्याण " मासिकाचा '' प्रणव '' विशेषांक वाचीत होते. मधून मधून ते डोळ्यांवर कातडें ओढून तिच्याकडे पाहातही होते. पण " तूं इतकी तयारी करून कुठें चालली आहेस ! " हें तिला विचारण्याची त्यांना हिंमत झाली नाहीं. कारण, त्यांच्या नऊ मुलांपैकीं सगळ्यांत वडील आणि कमावती होती ती. त्यांचें पेन्शन आणि लढाईमुळें पुन्हां धरलेल्या नोकरीचे मिळून जे एकशें पांच रुपये दरमहा घरांत येत त्या खेरीज ५० रुपये सुरेखा घरांत देत असे. तिच्या पगाराच्या नोटांची चिकट पट्टी त्यांच्या ओंठावर बसली होती.

तिच्या आईनेंच मांडीवरच्या मुलाला सावरीत विचारलें,

" कुठें निघालीं आहेस ? केव्हां येणार ? "

पण एव्हांना सुरेखा दारापर्यंत पोंचली होती.

" येईन संध्याकाळपर्यंत. " एवढेंच सांगत 'टक् टक्' सॅण्डल्स वाजवीत ती बाहेर पडली.

*   *   *

"कॉफी हॉऊस" च्या "फॅमिली रूम" च्या बाहेर 'टक् टक्' पावलं वाजलेलीं ऐकतांच माधव सांवरून बसला.

ती आंत येऊन आपल्या जागेवर बसल्यावर त्यानें घंटा वाजविली आणि तिला विचारलें,

"काय घेणार ?"

"कांहींही"

आंत आलेल्या वेटरला त्यानें ऑर्डर दिली आणि वेटर बाहेर जातांच तिच्याकडे वळून म्हणाला,

"बोला, काय काम होतं."

"तुम्हांला चिठ्ठी केव्हां मिळाली ?"

"मिळाली दोनच्या सुमाराला."

"मला तुमच्याशीं कांहीं बोलायचंय."

"मला वाटलंच तसं. म्हणूनच मी आलों."

"तुमचा दुसरा एखादा कार्यक्रम नव्हता ना ?"

"विशेष कांहीं नाहीं. कुठं तरी सिनेमाला जाणार होतों."

"मग तुमच्या बाईसाहेबांना राग आला असेल बराच ? तिला कळलं कां चिठ्ठी माझी होती तें ?"

"छे, राग–बीग कांहीं नाहीं आला. आम्ही पुढल्या रविवारीं जाऊं. चिठ्ठी तिनंच घेतली. आणि वाचून म्हणाली, 'तुम्ही जा तिनं एवढं बोलावलं आहे तर.'—पण तुम्ही मात्र रागावलेल्या दिसतां."

"उदारच पडली मोठी !"

"कां ? काय झालं ?"

"मला तुम्हांला एक प्रश्न विचारायचाय ?"

"विचारा."

" विचारा ? मी मघांपासून पाहतेय तुम्ही म । ' तुम्ही ' म्हणतांहा. आतां पर्यंतचं एकेरी बोलणं संपलं वाटतं ? आतां लग्न झालंय असंच ना ?"

यावर उत्तर देण्यासारखें कांहीं नसल्यामुळें माधव गप्पच राहिला.

" मी तुम्हांला विचारतें—"

" विचारा."

" मधें बोलूं नका "

" बरं."

" ' बरं, नाहीं. "

" बरं नाहीं. "

" तुम्हांला सुमतीशीं लग्न करून काय मिळालं ?"

" पहिली गोष्ट म्हणजे बायको मिळाली."

" थट्टा करूं नका "

" थट्टा नाहीं करीत मी "

" तिच्यामध्यें असं विशेष काय आहे ?"

" विशेष ? काय बुवा ! कांहीं सांगतां येत नाहीं विशेष कांहीं आहेसं "

" आपण तीन चार वर्षं बरोबर घालवलीं, एका ऑफिसांत. "

" होय. "

" बरोबर हिंडलों, फिरलों—"

" होय. "

" सिनेमाला गेलों अधून मधून. "

" खरं आहे "

" तुम्हांला कांहीं नाहीं वाटलं ? "

" कांहीं म्हणजे काय ? बरं वाटलं कीं ! "

" होय ना ? "

तो गप्प होता.

" मग तुम्हांला माझ्याशीं नसतं लग्न करतां आलं ? मी जरा स्पष्टच बोलतें अं. माफ करा. "

" अं ऽ ऽ पण तुम्ही कधीं कांहीं विषय काढला नाहीं तसा. "

" बायका आपण होऊन असला विषय काढीत नसतात. तुम्हांला माहीत असेलच. "

" तेंही बरोबर आहे. "

" सुमतीनं काढला होता हा विषय ? "

" कांहीं आठवत नाहीं. बोलली असेल. पण बहुधा बोलली नसेल. "

" म्हणजे तुम्हीच विषय काढलांत ना ? "

" तें तरी कुठं आठवतंय ? हें लग्नाचं बोलणं असंच असतं. कोणी केव्हां आधीं बोलणें काढलं तें लक्षांतच राहात नाहीं "

" माझ्याजवळ नाहीं कधीं काढलात तो ! "

" नाहीं काढला खरा "

" मग तुम्ही माझ्याबरोबर फिरायला कां येत होतां ?—जर तुम्हांला कांहीं वाटत नव्हतं तर ? "

" पण फिरायला जाणं म्हणजे सप्तपदी करणं तर नाहींना ? एरव्ही आपण फिरायला नाहीं कां जात ? "

" आणि सिनेमाला कां आलांत ? कुणीही मनुष्य प्रेम असल्याखेरीज एखाद्या मुलीबरोबर सिनेमाला जाणार नाहीं ! "

" तुमची कल्पना चुकीची आहे. एखादी मुलगी जायला तयार झाली तर कुणीही मनुष्य तिच्याबरोबर खुषीनं सिनेमाला जाईल ! त्यांत प्रेमाचा

कांहीं संबंध नाहीं. आणि तुमच्याबरोबर मी किंवा माझ्याबरोबर तुम्ही सिनमाला जाण्यांत गैर काय होतं ?"

"पण तुम्ही मला खोटी आशा लावून माझा विश्वासघात केलांत हें तरी तुम्हांला कबूल केलंच पाहिजे."

"मी सुमतीशीं लग्न केलं याचा तुम्हांला बराच आणि खराच राग आलेला दिसतोय. पण मी तुम्हांला आशा लावून तुमचा विश्वासघात केला हें तुमचं म्हणणं बरोबर नाहीं. आपण सिनेमाला गेलों असतांना मी कधीं तुमच्यावर प्रेम केलेलं आठवतं कां तुम्हांला ? आपण फिरायला गेलों असतांना प्रेमांत पडलेल्या माणसासारखा बोललों कां मी तुमच्याशीं ? साधारणतः दोन स्नेही एकमेकांशीं बोलतात तसंच आपण बोलत वागत होतों. आठवण करा."

"तुमच्याशीं बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं."

तो गप्पच राहिला. थोड्या वेळानें ती म्हणाली,

"सुमति माझ्यापेक्षां अधिक सुंदर आहे ?"

"सुमतीशीं मी लग्नच केलें आहे. तिच्या सौंदर्याचं मी काय वर्णन करूं ?"

"पण माझ्यापेक्षां ती सुंदर आहे असं म्हणूं शकाल कां तुम्ही ?"

"तिच्या रूपाबद्दल नाहीं. पण तुमच्या रूपाबद्दल सांगूं शकतों मी–"

ती त्याच्याकडे पाहात राहिली—

"सांगा, सांगा कीं—काय सांगायचंय तें."

"तसं तुमचं रूप कांहीं वाईट नाहीं—"

तिनें टेबलावर टेंकलेले कोपरे तिथल्या तिथेंच उगीचच चाळवले.

" तुमचं नाक थोडसं अपरं, आणि टोकाशीं किंचित उचललेलं आहे. पण तें मला आवडतं—"

ती जरा तोंड उचलून त्याच्याकडे पाहूं लागली.

" शिवाय त्यामुळें तुमचा वरचा ओंठ किंचित् उचलला जाऊन त्याला ओढलेल्या धनुष्यासारखा बांक आला आहे, तो सुंदर दिसतो—"

तिचें तोंड किंचित् उघडलें.

" तुमच्या खालच्या ओठावर संत्र्याच्या ताज्या फोडींत असतात तशा, बारीक रसरशीत पाकळ्या-पाकळ्या आहेत. आतां दिसत नाहींत त्या, कारण त्यावर किरमिजी रंगाचें सारवण आहे. कदाचित् या रंगाच्या खालीं अजूनही असतील. पण तुम्ही रंग लावूं लागलां त्यापूर्वीं होत्या खऱ्या. अन् त्यांकडे पहात रहावंसं वाटे—"

रंगाचा उल्लेख आला तशी तिच्या चेहऱ्यावर रागाची छटा दिसूं लागली.

"—तुमच्या हनुवटीचा आकारही डौलदार आहे. पण विशेष म्हणजे तुमचे टपोरे डोळे. ते अगदीं लक्ष्य वेधून घेणारे आहेत. त्याच्या भोंवताली लावलेल्या त्या काजळाच्या फराट्यांमुळें त्याला आतां एक भकासपणा आला आहे ही गोष्ट वेगळी. पण डोळे मूळचे सुरेख आहेत तुमचे—"

ती रागानें डोळे मोठे करून पाहूं लागली, आणि तिनें टेबलावरून कोपरें काढून घेतलीं.

"—तुमच्या भिंवयांना कमानदार वळण नाहीं आणि त्या रेखींवही पण नाहींत. पण त्या होत्या तशाच मला बऱ्या वाटत. त्यांत एक स्वाभाविकपणा होता. आतां तुम्ही कोरून त्या कमानदार रेखतां पेन्सिलीनं. त्यांत एक प्रकारचा कर्कश कृत्रिमपणा दिसतो मला—"

तिच्या भुंवया रागानें आंवळल्या गेल्या.

“ तुमची केसांची पहिली वळण अल्लड, खेळकर आणि खुलास दिसे. आतां हे निजामाच्या पगडीसारखे उंच फुगे काढतां—त्यानें—”

तिला पुढं ऐकवेना.

“Shut up” ती ओरडली, “ माझ्या रूपाची अशी तक्केवारी केलेली मला खपणार नाहीं.”

“ विषय तुम्हीं काढलांत. शिवाय तुमचं रूप जेवढं मी चांगलं म्हटलं तेवढं तुम्हांला आवडलंच. नाहीं कां? तुम्ही हें सगळं कुणासाठीं करतां?”

“ तुमच्यासाठीं खास नाहीं.”

“ तें आतां ठरलंच हो. पण ज्यांच्यासाठीं करतां त्यांच्यावर जर तुम्हांला जवळून पाहण्याचा प्रसंग येईल, तर तुम्हीं त्यांना पहिल्या रांगे-तल्या प्रेक्षकांना रंगभूमीवरचे पात्रीं दिसतात तशा दिसाल याचा विचार केलात कां कधीं?”

सुरेखा गप्प होती.

“ मधून मधून अशा बाईबरोबर फिरायला जायला, किंवा तिला घेऊन सिनेमाला जायला बरं वाटेल कदाचित्. पण तिच्याबरोबर संसार—”

“ बस्स करा. तुम्ही माझा अपमान करतांहा. तुमच्या तोंडून असलं बोलणं ऐकायला नव्हतें आलें मी इथं!”

“ अर्थातच नाहीं. पण माझा मात्र अपमान करायला आला होतां. असं ना?”

“ मला वाटलं होतं तुम्ही हीरो असाल. रसिक असाल. पण तुम्हीं अगदीं अरसिक आहांत.”

"तें असो! पण तुम्ही मात्र मॉडर्न हिरॉईनसारख्या दिसतांहा. अगदीं एखाद्या दिवाळी अंकावरल्या चित्रासारख्या-हे लामण दिवे कशाला घातले आहेत कानांत ?"

"लामण दिवे ? फणा उभारलेल्या नागिणीचें डिझाईन आहे हें."

"असं, असं, म्हणजे माझ्यावर फणा उगारून आला होतां त्याचं प्रतीक आहे हें."

"तें तुम्हांला समजायचं नाहीं. तुम्हांला टेस्ट नाहीं. You deserve the wife you have got. उगीच मी तुम्हांला इतकं हें समजलें. ती सुमतीच तुम्हांला योग्य आहे."

एवढें बोलून ती उठली. तिचा श्वास जोरानं चालला होता. ओंठ थरथरत होते. पापण्यांची फडफड होत होती. नाकाचा शेंडा लाल झाला होता. तिच्या मनाची अस्वस्थता कांठोकांठ आलेली दिसत होती. आणखी एक क्षण तसाच जाता तर तिला रडूं फुटलें असतें. तिच्याकडे पाहून माधव म्हणाला,

"तें जाऊं द्या. आतां आपण दुसरं कांहीं तरी बोलूं."

"मला एक अक्षर बोलायचं नाहीं तुमच्याशीं आतां."

"कांहीं घ्या तर."

"इतका वेळ बोलून घेतलंच कीं. तेवढं पुष्कळ झालं. Thanks."

असें म्हणतच तिनें टेबलावरची आपली बॅग आणि छत्री खसकन् ओढून घेतली आणि ती चालूं लागली.

"तुमच्या बॅगचा खटका सैल झालेला दिसतोय, ही तुमची लिप-स्टिक खालीं पडली होती."

पण त्याच्याकडे लक्ष न देतांच खटकन् बॅगचा खटका दाबून ती 'टक्टक्' करीत दाराबाहेर पडली.

"तूं इथेंच थांब जरा. मी तिकिट काढून आणतों." विंदाप्रसाद मुन्नीला म्हणाला.

"मी नाहीं एकटी उभी राहणार, मी तुमच्या बरोबर येतें."

"मग काय ह्या रांगेंत उभी राहणार माझ्याबरोबर ?" तिकिटाच्या खिडकीसमोरच्या रांगेकडे बोट दाखवीत त्यानें विचारलें.

"हो !" ती म्हणाली.

अखेर तिला आपल्यापुढें घेऊन तो तिकिटासाठीं रांगेंत उभा राहिला.

* * *

त्यांचें लग्न नुकतेंच झालें होतें. आणि दोनच दिवसांपूर्वी त्यानें तिला मुंबईला आणलें होतें. आज तो तिला मुंबई दाखवायला घेऊन चालला होता. तिला मुंबईंत कुठें नेऊं आणि काय दाखवूं असें त्याला झालें होतें.

दुपारचें जेवण-बिवण होऊन थोडीशी वामकुक्षी होतांच त्यानें तिला सांगितलें,

"आज आपण चौपाटीवर जायचं. पोषाख बिषाख छान झाला पाहिजे हं अगदीं. मुंबई आहे ही ! इथल्या बायकांचा पोषाख कसा अगदीं चापचोप असतो. आज पाहशील तूं. नवीन स्लीपर घेतले आहेत ते घाल आणि घड्याळ विसरूं नको." तो तिला एक ना दोन अनेक सूचना देत होता. जणूं सगळी मुंबई आज त्याची नवरी पाहणार होती.

ती अगदीं लग्नाच्या पोषाखांत सजून त्याच्याबरोबर बाहेर पडली. तिला कसें अगदीं अधर अधर वाटत होतें. मुंबई तिला नवीन होती आणि बिंदाप्रसादही नवीनच होता. आपल्या आईबापांना सोडून ती पहिल्यांदाच इतकी दूर आली होती. त्याच्या छोट्याशा घराची ती गृहिणी होती. स्वतंत्र होती. तिला मोकळें वाटत होतें, पण नवेपणामुळें ती बुजतहि होती.

*　　　*　　　*

तिकिट घेऊन तीं दोघें प्लॅटफॉर्मवर आलीं आणि दोन चार मिनिटांत त्यांची गाडीहि आली. चढणाऱ्या आणि उतरणाऱ्या माणसांची खेंचाखेंच सुरू झाली. तिला पुढें ढकलीत बिंदाप्रसाद डब्याकडे गेला. आपल्याला लोकांचा धक्का लागेल म्हणून ती अंग चोरून नुसतीच उभी राहिली.

"लवकर चढ, गाडी जाईल नाहींतर !" तो म्हणाला.

"पण हे लोक आहेत ना मधें."

"ते कधींच संपायचे नाहींत." असें म्हणून त्यानें तिला जवळ-जवळ वर ढकललेंच.

त्यानें पाहिलें, कुठेंहि जागा नव्हती. दारांत, बाकांच्यामध्यें, सगळीकडे खेंचाखेंच झाली होती. तिला ती गर्दी पाहून अगदीं गुदमरल्यासारखें झालें. चारी बाजूंनी लोक तिला चिकटत होते, त्यामुळें तर तिचा चंदनी रंगाचा कोरा बुट्टेदार शालू चुरगळला जात होता. पण त्यापेक्षां लोकांचें अंग आपल्या अंगाला लागतें त्याचें तिला कसेंतरी वाटत होतें. त्यांतल्या त्यांत अंग चोरून ती अगदीं बिंदाला चिकटून कशीतरी उभी राहिली.

तिच्या गांवीं तिला असली गर्दी जत्रेच्या वेळींच काय ती दिसायची आणि त्यावेळीं किती बायकामुलांच्या अंगावरचे दागिने चोरीला जायचे. मुलें मुली चुकायच्या. तरुण मुली पळवल्या जायच्या. एकदां लहानपणीं एका मेळ्यांत ती अशीच चुकली होती. तेव्हांपासून तिला गर्दीची भीतीच

बसली होती. आज तिच्या अंगावर दागिनेहि खूप होते. दोन्ही हातांत सोन्याचे उठावदार चुडे, पाटल्या, गोठ, डाव्या मनगटावर भारी रिस्ट-वॉच बोटांत चारचार आंगठ्या, पायांत तोरड्या आणि वाळे.

तिनें बिंदाला विचारलें,

"काय ही गर्दी ? इतकी गर्दी रोज असते ?"

"नाहीं, आजच आहे," त्यानें गंमतीनें उत्तर दिलें.

"आज काय आहे ?"

"तुला पाहण्यासाठीं" तो म्हणाला, "नवी नवरी पहिल्यांदाच मुंबईला आली आहे ना ?"

"चलो, तुम बडे वह हो." असें म्हणून मान तिरकी करून आपल्या काळ्या टपोऱ्या डोळ्यांनी तिनें त्याच्याकडे पाहिलें. तिनें डोक्यावरून घेतलेल्या पदरांतून उतरत्या सूर्याचे किरण आंत आले होते. त्यामुळें तिच्या गालांच्या सतेज गंदुमी रंगांत लाली मिसळली होती आणि गालांवरल्या लवेची एक प्रकाशमय बाह्यरेखा उठली होती–तो तिच्याकडे पहातच राहिला.

मुन्नी पुढें बोलूं लागली, "मुंबईत खूप गर्दी असते, आणि लोक वाईट असतात. उगीच धक्के देतात. मला आईनं सांगितलं आहे सगळं येतांना."

"माझ्यापेक्षां तुझ्या आईलाच जास्त माहिती दिसते मुंबईची !" तो म्हणाला.

इतक्यांत एका स्टेशनांत गाडी थांबली. मधल्या एका बाकावर एक जागा रिकामी झाली. तिकडे जाऊन त्यानें तिला तिथें बसायला सांगितलें.

तिन नुसती मॉनें मुरडली. तेवढ्या हावभावानेंच तिनें सुचवलें.

"तो तिथें आहे ना. त्याच्याजवळ कशी बसूं ?"

बिंदाला काय करावें कळेना. आपण बसावें तर मुन्नीला उभें राहावें लागणार. कोणीच बसलें नाहीं तर जागा जाणार. तेवढ्यांत बांकावरच्या दुसऱ्या एका इसमानें उठून जागा दिली. तेव्हां तो मध्यें आणि ती टोंकाशीं अशीं ती बसलीं.

बिंदा म्हणाला, "पाहिलंस. मुंबईची माणसं कशीं सभ्य असतात. त्यानं कशी तुला जागा करून दिली!"

पण तो मनुष्य उठून मधल्या वाटेंत उभा राहिला तो तिथून मुन्नीकडे नीट पाहतां यावें म्हणून. आणि एव्हांना डब्यांतल्या बऱ्याच नजरा मुन्नीकडे वळलेल्याच होत्या. पण त्याची मुन्नीला जाणीव नव्हती. आणि बिंदालाही नव्हती. कारण तोहि तिच्यामध्येंच गुंग होता.

तिचें तें पंधरा सोळाचें ताजें सतेज रूप, तिचा नवोढेचा शृंगार, इतका अपरूप होता कीं, चढणारे उतरणारे तिच्याकडे वळून वळून पहात. मधून जाणारा येणारांचा सहज धक्का लागे तर कित्येक मुद्दाम खेटत. प्रत्येक वेळेला तिला विजेचा धक्का बसल्यासारखें होई. एकदां एक मनुष्य फारच चिकटून उभा राहूं लागला तेव्हां ती आणखी आंत सरकली, आणि बिंदाला अगदीं बिलगून तिनें त्याचा दंड धरला.

ती म्हणाली, "कैसे बेशरम लोग है!"

तो तसला स्पर्श त्यालाहि अद्याप नवीनच होता. त्यानें आपला हात तिच्या पाठीकडून घालून तिला धरल्यासारखें केलें. त्याच्याकडे चोरून पाहून ती त्याला हळूंच म्हणाली,

"यह क्या? कोई देख लेगा तो?"

"आणि तूं माझा दंड धरला आहेस तो?" असें म्हणून त्यानें तिला हळूंच चिमटा घेतला. ती त्याकडे रागावून पाहूं लागली तेव्हां तो म्हणाला,

"तुझी लग्नाची मेंदी अजून कशी चमकते आहे. सुंदर रंग आला आहे हं. अगदीं पारिजाताच्या देठांसारखा ?"

"काय हें ! कांहीं वाटतंय कां ? लोकं काय म्हणत असतील !"

लोकं त्यांची गंमत पाहत होतीं. खरं म्हणजे तिच्याकडेच पाहत होतीं. त्यांच्या समोरच्या बांकावरचा एक अक्कडबाज मनुष्य तर सारखा तिच्याकडेच पाहात होता. अधाशी डोळ्यांचे द्रोण करून जणूं तिला पीत होता. पण तीं दोघं आपल्यांतच मशगुल होतीं.

थोड्या वेळानें स्टेशन जवळ येत चाललें. एक जागा रिकामी झाली. तिथें बसण्यासाठीं एक इसम धडपड करूं लागला तेव्हां तीं भानावर आलीं आणि जरा सांवरून बसलीं. पण स्टेशन आलें तें चर्नीरोडचेंच होतें. त्यामुळें त्यांनाहि उठून उतरावें लागलें.

*　　　*　　　*

चौपाटीवरहि तशीच गर्दी होती. मुन्नी म्हणाली, "गर्दीनं डोकं फिरूं लागलं अगदीं माझं, चला आपण घरीं जाऊं."

"जरा वेळ फिरून आपण कुठं तरी बसूं. पण मागं राहूं नको अशी. नाहींतर चुकशील कुठं तरी."

"मी काय लहान आहे का काय, चुकायला ?"

"नाहीं, पण लोक चुकवतीलना इथं. त्यापेक्षां हात धर पाहूं माझा ! ती बघ. तिनं कसा हात धरला आहे."

"खरंच. म्हणूनच पुरुषांचा हात धरून चालतात कां मुंबईच्या बायका ?"

"हं चल ये." असें म्हणून तो तिचा हात हात धरूं लागला. तो तिनं ओढून घेतला.

"कांहीं नको हात धरायला. मी नीट चालेन. यांना वाटत कसं नाहीं कांहीं असं हात धरून चालायला सगळ्यांसमोर ?"

या टोंकापासून त्या टोंकापर्यंत फेरी मारून झाल्यावर त्यानें तिला पूरीपकोडी खायला नेलें. पूरीवाल्यानें बिंदाला विचारलें,

'बाबूजी, कौन जिला ?"

"फैजाबाद."

"वा. हम भी फैजाबादकेही है. कौन डाकखाना ?"

मग त्यांच्या गप्पा सुरूं झाल्या. आपल्याच मुलखांतला पुरुष पाहिल्यावर, मुन्नीचा एवढा वेळचा मोहक मोकळेपणा, ऊन पडल्यावर दंव नाहींसें होतें, तसा एकदम कुठें नाहींसा झाला, आणि तिनें डोक्यावरला पदर पुढें ओढला.

पूरीवाल्यानें त्यांना मनापासून खायला दिलें.

जरा इकडे तिकडे फिरून तीं धक्क्यावर जाऊन बसलीं. सूर्य मावळायच्या बेताला आला होता. निळ्या-हिरव्या समुद्रावर सोनेरी कवडशांचा झगमगाट नाचत होता त्याकडे मुन्नी पाहात बसली. तिनें विचारलें,

"समुद्र किती मोठा असतो ?"

"खूप."

"गंगाजींपेक्षां मोठा !"

"अरे ! किती तरी मोठा !"

"म्हणजे खूपच मोठा असतो तर !"

"अर्थात् खूपच. आपण नारळ खाऊं." बिंदा म्हणाला, "तुला मलईचा पाहिजे कीं खोबऱ्याचा ?"

"नारळांत मलई कशी ?"

"पाहशील."

त्यांनीं मलईचे नारळ खाल्ले. तिनें आपला नारळ खूप जोर करून समुद्रांत फेकला. पण तो अगदींच जवळ पडला तेव्हां बिंदा हंसला.

ती म्हणाली, " तुमचा पाहूं किती दूर जातो तो."

पण त्याचाहि जवळच पडला. तेव्हां ती म्हणाली,

" आतां कशी झाली ! मला हंसलांत नाहीं कां ?"

पाहतां पाहतां आभाळाचा आणि समुद्राचा रंग बदलला. पूर्वींचा एकजात सोनेरी रंग होता तो जाऊन लाल-निळा शिसवी-सोनेरी, किरमिजी भस्मी अशा वेगवेगळ्या गडद आणि भडक, मंद आणि हलक्या रंगाच्या चित्र-विचित्र आकृतींची उघड झांप सुरू झाली आणि लाटाहि वाढत्या वगानें धक्क्याशीं टक्कर देऊं लागल्या.

" पहा कसे अजब रंग दिसताहेत आणि लाटा कशा दौडत येऊन उड्या मारताहेत. " ती म्हणाली.

ती पाहतच राहिली· पालत्या घातलेल्या घड्यासारखा सूर्य समुद्राला टेंकला आणि दिसेनासा झाला. त्याबरोबर रंगांची किमयाहि नाहींशी झाली.

" मोहिनी ! " बिंदानें हांक मारली.

तिनें खुश नजरेनें त्याच्याकडे पाहिलें.

" हां मोहिनी ! मोहिनीचंच रूप आहे तुझं. " तो म्हणाला. " चला आतां घरीं जाऊं. समुद्राच्या लाटा तासन् तास पाहात बसलीस तरी कंटाळा यायचा नाहीं. चल, अननस खायचंय. "

" खायचं काय सारखं ? पुढल्या खेपेसाठीं कांहीं राहूं द्या आतां. "

*　　　　*　　　　*

परततांना तर गाडींत अधिकच गर्दी होती.

त्यांना दाराशींच उभें राहावें लागलें. तिच्या पाठीमागून खांद्याकडून त्यानें तिला धरून ठेवलें होतें.

गाडी चालू झाल्यावर तो हळूच तिला म्हणाला.

" समुद्रावर उन्हांत तुझ्या माथ्यावरची बिंदिया खूपच चमकत होती. आणि तुझे—"

" हें काय ? ऐकेल कोणी तरी ! "

" या गाडीच्या धडधडाटांत कोण ऐकायला बसलाय् ? पण बघ, तूं मात्र माझ्या कमरेभोंवतीं हात घालूं नको हं. "

न कळत तिचा हात त्याच्या पाठीकडून सरसावला, आणि ती म्हणाली,

" कां ? "

" लोक पाहाताहेत ! "

" वा: ! गर्दी पाहा किती आहे. मला भीति वाटते. "

तिच्या खांद्याचा मऊ स्पर्श, तिच्या लुसलुशीत नाजूक हातांची कंबरेवरची पकड, तिच्या केसांचा आणि शालूला लागलेल्या अत्तराचा मंद सुगंध आणि तिचें अर्धस्फुट बोलणें यांमुळें त्याची आधींच चंचल झालेली वृत्ती उचंबळून आली.

" मोहिनी ! " त्यानें तिच्या कानाशीं म्हटलें.

" क्या ? "

" कुछ नहीं. आतां लवकरच घरीं जाऊं. " त्याची बोटें अलगदच तिच्या खांद्यावर दाबलीं गेलीं.

*　　　*　　　*

घरीं पोंचायला त्यांना साडेआठ वाजले. स्वयंपाक कांहीं करायचा नव्हता. दुपारचें ठेवलेलेंच जेवायचें आणि निजायचें.

मुन्नी कपडे बदलीत होती. तो तिच्या भोंवतीं उगीचच इकडून

तिकडे फिरत गुणगुणत होता, 'कहां गई रे मेरी माथेकी बिंदिया माथेकी बिंदिया.'

"मी कपडे बदलतें आहे. इथें कशाला मागंपुढं करतांहा उगीच?"

"अग, तूं कपडे बदलत आहेस म्हणूनच. अगदीं अनपढ आहेस. शिकलेल्या मुलीनं असा प्रश्न कधीं विचारला नसता."

"बरं, बरं, जा आपले कपडे बदला."

तो बाहेर गेला.

"आणि हें पहा,"

तो लगेच धांवतच पुन्हां आला. त्याचें गाणं चालूच होतं. 'कहां गई रे मेरी माथेकी बिंदिया.'

"मला कांहीं जेवायचं नाहीं," ती म्हणाली.

"मलाहि कांहीं खायचं नाहीं."

"वाः तुम्ही कांहींतरी खा. तुम्हांला काम फार पडतं ऑफिसांत."

"तुलाहि घरीं फार काम पडतं. तूं जेवणार असशील तरच मी जेवीन."

"मला कसलं काम आलंय्? दोन माणसांचं काम."

"खो गई रे मेरी माथे कि—"

"गाणं थांबवा आतां. कांहीं आवाज तर नाहीं. तुम्ही जेवा मी तिथं बसतें."

"अग, तुला दोन माणसांचं काम पडतं. मी तर एकाच माणसाचं काम करतों ऑफिसांत. तुला माझ्या दुप्पट खाल्लं पाहिजे. थाळी वेगळी घेऊं नको वाटलं तर."

"पुरे पुरे!"

"मिल गई रे मोरी माथेकी बिंदिया, माथे कि—"

" जा पाहूं तुम्ही. हात पाय धुवा, मी जेवायची तयारी करतें. "

*                    *                    *

जेवणें झाल्यावर तिनें दोघांचे बिछाने घातले आणि ती शिवणाचें साहित्य घेऊन दिव्याशीं बसली. बिंदा केव्हांच आपल्या बिछान्यावर जाऊन पडला होता. थोड्या वेळानें तो आळस देत म्हणाला,

" झोंप आली आहे बुवा खूप. दिवा घालव ना आतां. काय चाल-लंय् तुझं ? "

" तुमचंच काम चाललंय्. तुमच्या खमीसाला बटनं लावतें आहे. उद्यां घालायचा आहे ना ? "

" राहूं दे आतां. उद्यां दुसरा घालीन. नाहींतर घालणारच नाहीं. पण दिवा नको आतां. "

दिवा मालवून ती आपल्या बिछान्यावर गेली. जराशानें त्यानें तिला विचारलें.

" काय करतेस ? "

" प्रार्थना. "

" प्रार्थना ? कोणाची ? "

" कोणाची म्हणजे ? परमेश्वराची. "

" किती वेडी आहेस. "

" काय "

" अग, लग्नानंतर प्रार्थना आपल्या पतीची करायची असते. माहीत नाहीं ? "

" आज तुम्हांला काय झालंय् ? अंगांत बिंगांत आलंय् कीं काय ? "

" अंगांतच आलंय्. "

असें म्हणतच तिच्या बिछान्यावर जाऊन त्यानें तिच्या कानाच्या पाळीचें चुंबन घेतलें. आणि गालांवर हात फिरवीत तो म्हणाला,

" पाहूं तुझे आडूसारखे मखमली गाल लाल लागतात का हाताला ?"

" हें काय ? "

" काय ?"

" कुणी पाहील ना ? लाज वाटते. "

" आतां इथं कोण पाहणार आहे ? "

" खिडकी उघडी आहे ! "

" ह्या अशा रात्रीं लोकांना दुसऱ्यांच्या खिडक्यांतून डोकावण्याखेरीज उद्योग नाहीं वाटतं दुसरा ? "

" तुम्हाला वेड लागलंय्. "

" खरंच लागलंय. तुला नाहीं का लागलं ? "

" आतां मात्र लागेलसं वाटतंय. "

" होय ना ? "

असें म्हणून त्यानें आपले हात तिच्या भोंवतीं लपेटले.

## कांचेचें कवच : १२

तिला तशी पाठमोरी निजलेली पाहिली कीं त्याला Yelasquez च्या त्या व्हीनसच्या चित्राची आठवण होत असे. तिची पाठ, कंबर, आणि खालचा भाग यांचें वळण मोठें लवचिक, डौलदार आणि मन खेंचून घेणारें होतें. आज कृष्णपक्षांतल्या रात्रीच्या त्या झुरमुरीत प्रकाशांत तर तिच्या त्या पांढऱ्या पातळांतल्या बांकदार सौष्ठवाला पारिजातकाच्या पुष्पराशींची मृदुता आली होती. आज त्याची चित्तवृत्तीहि थोडीशी उल्हसित झाली होती. कारण तीं दोघेंहि एका सिनेमाला गेलीं होतीं, त्यांतली कांहीं दृश्यें पाहून त्याच्या वृत्तींत एक गोड अस्वस्थता आली होती.

तिच्या कॉटवर जाऊन तिला आपल्या मिठींत घ्यावें, असें त्याच्या मनांत आलें. शिवाय शरदृतूंतली ती हवाहि अशी होती की, कुणाला तरी अगदीं जवळ घ्यावेसें वाटावें. पण तो उठून तिच्याकडे गेला नाहीं. कारण बरेच वेळां त्याला असा अनुभव आला होता कीं, त्यानें मोठ्या उल्हासलेल्या मनाने तिच्याकडे जावें, तिला जवळ घ्यावें; पण तिनें अगदीं निश्चल, निर्विकार राहावें. त्यामुळें त्याचा उल्हास मावळून जाई, थरारलेले रोमांच तसेच गळून जात, मनाची उभारी खचून जाई, आणि तो मिठी सोडून परत आपल्या बिछान्यावर येई. पुन्हा कांहीं दिवस जीवनांचें गाडें नित्याच्या चाकोरींतून जाई. पुन्हा केव्हां तरी त्याचें मन उसळी घेई, आणि पुन्हा त्याला तोच अनुभव येई.

असें कां व्हावें हें त्याला कळेना. तो आशिक्षित नव्हता, अडाणी नव्हता; अशक्त नव्हता, अरेराव नव्हता; तिला नावड वाटावी असें त्याच्यांत

कांहीं नव्हतें. त्याने विशेष परिस्थितींत, विशेष ध्येयानें तिच्याशीं लग्न केलें होतें ती आवडली तर होतीच त्याला. पण तेवढ्यासाठींच नव्हतें लग्न केलें त्यानें.

तो जेव्हा त्या शाळेंत मास्तर म्हणून आला, तेव्हा ती इंग्रजी पांचवी किंवा सहावींत असेल. अतिशय हुशार आणि तरतरीत; खेळांत आणि कलाकौशल्यांत तरबेज. वर्गात नंबर नेहमी पहिला किंवा दुसरा. तिच्याकडे पाहिलें म्हणजे त्याला वाटावें, शिक्षण द्यायचें तर अशा मुलींना द्यावें, त्या त्याचें खरें चीज करतील. त्या समाजाला कांहीं तरी देऊन जीवन सार्थ करतील. अशा मुलीकडे त्याचे विशेष लक्ष जावें यांत नवल नव्हतें. त्याच्या उत्तेजनानें तिच्याहि अभ्यासाला आणि विचारांना वळण मिळत गेलें. आपण कांहीं तरी करावें, करूं शकूं, असें तिलाहि वाटूं लागलें. आणि तिच्या शाळेंतल्या नित्यक्रमांत एक नवाच उत्साह आला.

ती मॅट्रिकमध्यें असतांना तिचे वडील वारले. घरची स्थिति साधारण गरिबीचीच होती. त्यामुळें तिची शाळा तावडतोबच सुटायची. पण तिच्या आईनें नेट धरून तिचें तें वर्ष पार पाडलें कसें तरी.

परीक्षेंत तिला फारच चांगले मार्क मिळाले. रिझल्टनंतर ती त्याला भेटायला आली तेव्हा त्यानें तिला विचारलें,

"कुठल्या कॉलेजांत जाणार?"

"लग्नाच्या."

"वा:, म्हणजे?"

"मला यापुढं शिकणं शक्य नाहीं, सर. आईनं वर्ष पार पाडलं हेंच विशेष. माझं लग्न करायचा विचार ठरवला आहे तिनं."

"हें नाहीं व्हायचं. मी तुझ्या आईला येऊन भेटतों. तुझी इतकी बुद्धि लग्न करून अगदी वाया जाईल."

त्या रात्रीं त्यानें खूप विचार केला. मास्तरचा पगार तो काय असणार! पण पैशाच्या अभावीं एका हुशार मुलीचें शिक्षण खुंटावें हें त्याला बरें वाटेना. त्यानें आपल्या पगारांतून तिला मदत करायचें ठरविलें. दुसऱ्या दिवशीं जाऊन तो तिच्या आईला भेटला, आणि त्यानें तिला सर्व समजावून सांगितलं. बाई विचारी होती. मुलीनें पुढें शिकावें असें तिलाहि वाटत होतें. परंतु तिची व्यवहारबुद्धि तिला त्याचें म्हणणें कबूल करूं देईना.

ती म्हणाली, "मी बायको माणूस, माझं तें काम नव्हे एवढी मोठी वाढलेली मुलगी मी आपल्या अंगावर लग्नावांचून कशी ठेवूं? आणि तुम्ही तिच्यासाठीं पैशांची किंवा इतर कांहीं मदत देऊं लागलांत, तर लोक काय म्हणतील? हें असलं जोखीम मी अंगावर घेऊं नये तेंच बरं."

अडचण खरी होती. ती त्याच्याही लक्षांत आलेली होती. आणि त्यांतून मार्ग कसा काढायचा याचाहि त्यानें विचार केला होता. तो म्हणजे त्यानं सरलेशीं लग्न करावें. आणि तोच त्यानें सरलेच्या आईला सुचवला.

ती बराच वेळ कांहींच बोलली नाहीं.

"तुम्ही विचार करा" तो म्हणाला. "पण सरलेची संमति असेल तरच मी ही गोष्ट करीन. एरव्ही नाहीं."

सरला हुशार होती, पण शिक्षण किती घ्यायचें, किंवा शिकून पुढें काय करायचें, या संबंधी तिचे कांहीं निश्चित विचार नव्हते. तिचे वडील होते तोंपर्यंत यासंबंधीं विचार करण्याची तिला जरूरीहि वाटली नव्हती. कांहीं थोडीशी आकांक्षा तिच्या मनांत उत्पन्न झालीच असली तर ती त्याच्याचमुळें झाली होती. त्यामुळे तिची संमति मिळण्यास विशेष अडचण पडली नाहीं.

लग्न झालें तरी सरलेचें शिक्षण संपेपर्यंत संसार असा होऊं द्यायचा नाहीं असें त्यानें आपल्या मनाशीं ठरविलें होतें. आणि तसेंच त्यांचें चाललें

होतें. तो तिला तिच्या अभ्यासांत मदतहि करी. त्यामुळें दोन घरांत राहण्या ऐवजी तीं दोघें एका घरांत राहूं लागलीं, यापलिकडे त्यांच्या जीवनांत विशेष फरक पडला नाही.

अशीच दोनतीन वर्षे गेलीं. आणि मग पुढें या परिस्थितींत फरक पडायला सुरवात झाली.

सरलेच्या वयांत फरक पडला. तिच्या अंगाला आकार येत चालला. तिच्या पदन्यासाची लय बदलली, तिच्या हावभावांना निराळी मुरड येत चालली, तशी त्याच्या मनाची चलबिचल होऊं लागली. हिंवाळ्यांत सुप्त असलेला वृक्षामधला जीवन रस वसंताची चाहूल लागतांच जसा सळसळूं लागतो, आणि कोंबा-कोंबातून फुटूं पाहतो, तशी तिच्या यौवनाची चाहूल लागून त्याच्या रक्तांत सळसळ उठली; त्याच्या हालचालींतून ती व्यक्त होऊं लागली; त्याची तिच्याकडे पाहण्याची दृष्टि बदलली; आणि त्याच्या वागण्यांत वेगळ्याच कळा दिसूं लागल्या.

परंतु त्याच्या शब्दाला तिच्याकडून कधी पडसाद मिळाला नाहीं, त्याच्या जीवन लहरींना तिच्या जीवनलहरींनी कधीं भेट दिली नाहीं, त्याच्या रोमांचाचें तिच्या रोमांचांनीं कधीं स्वागत केलें नाहीं, त्याच्या मनोवृत्तींना तिच्या वृत्ती कधी संमुख झाल्या नाहींत.

त्याला कळेना, असें कां होतें. त्यानें पंख पसरून तिला आपल्याबरोबर भरारी मारण्यासाठीं ललकार द्यावी, आणि तिने आपले पंख दुमडून घ्यावे. असें कां ?

आणि तिलाहि कळेना कीं असें कां होतें. तिला माहिती होतें पुरुष असें वागतात तें. तिनें तसें ऐकलें होतें, आणि वाचलेंहि होतें. पण त्यानें आपल्याशीं तसें वागावें हें तिला चमत्कारिक वाटे.

ती कॉलेजांत गेली ती एका नव्याच सृष्टींत गेली. ती जशी जीवनाच्या एका नव्याच अवस्थेंत पाऊल टाकीत होती, तशींच बाकीचीं मुलें-मुलीहि टाकीत होतीं. शाळेच्यापेक्षां तें जग अगदींच वेगळ्या जातीचें होतें. नव्या नव्या रंगाचें वैभव मिरवणारीं नवी नवीं क्षितिजें तिथें हांक देत होतीं. विविध-आकार प्रकाराचीं विविध क्षेत्रें नव्या वयाच्या नव्या उन्मेषांचें स्वागत करण्यासाठीं चौफेर खुलीं पसरलीं होतीं. पंख पसरावेत आणि कुठेंहि उड्डाण करावें. ज्याचीं ध्येयें अद्याप ठरलीं नाहींत अशा : आज एका आणि उद्या दुसऱ्या, किंवा एकाच वेळीं परस्पर विसंगत आणि परस्परांत गुंतलेल्या ध्येयांचा पुरस्कार करणाऱ्या : अपरिपक्व पण जोमदार, कसदार, उत्साहानें रसरसणाऱ्या तरुणांच्या स्नेहांत कांहीं वेगळाच जीवंतपणा असतो, त्यांच्या स्वच्छंद ध्येयहीनतेंतदेखील एक आकर्षण असतें; गरुडाच्या अनिर्बंध भरारींत जी मनोवेधकता असते ती त्यांत असते, सतत कांहीं तरी शोधीत राहाणाऱ्याच्या वृत्तींतली पुरस्सरता असते; याची तिला कॉलेजच्या जीवनांत जाणीव झाली. पंख पसरून आज ह्या तर उद्या त्या क्षितिजाकडे झेप घ्यावी असें तिला वाटे. पण तसा प्रयत्न करतांच तिला आपल्या विवाहित स्थितीच्या जाणिवेचा काच बसे.

तो ध्येयवादी होता. आगरकरांचे निबंध, हरिभाऊंच्या कादंबऱ्या, कानिटकरांचें "स्त्रियांची परवशता," वैद्यांची "अवलोन्नति लेखमाला," पंडिता रमाबाईचें चरित्र आणि त्यांचीं पुस्तकें, कर्व्यांचें "आत्मवृत्त" हीं सगळीं वाचून त्याचें ठाम मत झालें होतें कीं, स्त्रियांना शिक्षण, स्वातंत्र्य आणि समता दिल्यावांचून आपल्या समाजाचा उद्धार होणार नाहीं. हीं त्याचीं मतें सरलेला ठाऊक होतीं. हींच पुस्तकें त्यानें तिलाहि वाचायला सांगतलीं होतीं. त्याचें आचरणहि त्याच्या तत्त्वांबरहुकूम होतें. तो तिला शिक्षण, स्वातंत्र्य आणि समता तिन्ही देत होता. कॉलेज-जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत

आणि कार्यांत भाग घ्यायला तिला तो प्रोत्साहन देत असे, आणि ती त्यांत भाग घेतहि असे. पण कितीहि झालें तरी दिलेलें स्वातंत्र्य तें. दोरी कितीहि लांब सोडलेली असली तरी ठाणबंद जनावर तें ठाणबंदच, हें तिला जाणवल्यावांचून राहात नसे.

त्यामुळेच हळूहळू तिला वाटूं लागलें की ध्येयवादानें प्रेरित होऊन का होईना पण आपल्याशीं लग्न करून त्यानें आपलें आयुष्य बांधून टाकलें. आणि ध्येयें पक्कीं होणें म्हणजे तरी डोळ्यांना ढापणें बसणेंच नाही का? त्यांत पुन्हा त्यानें तर आपल्या ध्येयांचीं ढापणें तिच्या डोळ्यांवर घातलीं होतीं. त्यामुळे जसजसे दिवस जात चालले तसतसें तिचें कॉलेजांतलें आणि घरचें जीवन दुरावत चाललें आणि ती दोन्ही जीवनांपासून दुरावत चालली.

नव्यानेंच परिस्फुट झालेल्या अमर्याद जीवनाच्या यक्षसृष्टींत स्वैरसंचार करूं शकणारी नवयौवना नाही, आणि संसारांत रंगलेली गृहलक्ष्मीहि नाही, अशी तिची विचित्र अवस्था झाली. आणि तिच्याभोवती एकटेपणाचें एक कवच तयार होऊं लागलें.

त्यामुळेंच जेव्हा जेव्हा तो तिच्याशीं संसारी माणसासारखा वागूं पाही, एखाद्या तरुण प्रियकरासारखा तिचें सान्निध्य मिळवण्याचा प्रयत्न करी, तेव्हा तिला कसेंसेंच वाटे. त्याच्या भूमिकेशीं तें तिला विसदृश वाटे. त्याच्या आणि तिच्या यापूर्वीच्या संबंधाशीं विसंगत भासे. त्याच्या स्पर्शानें तिचें अंग थरारून पुलकित होण्याऐवजीं अनिच्छेनें आकसून जाई. त्यानें जवळ घेतांच तिचे जीवनाचे झरे उफाळून येण्याऐवजी आटून सुकून जात. त्याच्या बाहूंचा विळखा पडतांच तिला आंतल्या आंत ओढल्यासारखें होई आणि ती स्वतःला त्याच्या मिठींतून सोडवून घेई.

आपल्याला असें कां होतें हें तिचें तिलाहि नीट कळत नसे. क्वचित् अंधुकपणें कळलें तर आपल्याला असें वाटणें चुकीचें आहे, त्यांत आपली

कर्तव्यच्युति आहे, त्याच्याशीं कृतघ्न होण्यासारखें आहे, पत्नीपदाच्या भूमिकेशीं प्रतारणा आहे, ह्याची तिला जाणीव होऊन ती अगदीं चिंबून शरमून जाई. पण त्यामुळें तिचा अधिकच गोंधळ होऊन तिला त्याच्याशीं कसें वागावें हें कळेनासें होई.

दिवस असेच चालले होते. एखाद्या दिवशीं त्यानें तिला जवळ घ्यावें, तिनें सोडवून घेण्याचा प्रयत्न करावा. मग त्यानें म्हणावें,

"तूं असं कां करतेस ? मी तुला आवडत नाहीं का ?"

"तसं नाहीं." तिनें उत्तर द्यावें.

"मग ?"

"कांहीं नाहीं."

"कांहीं कसं नाहीं ? जेव्हां जेव्हां मी जवळ येतो तेव्हा तेव्हा तूं असंच करतेस. तुझ्या मनांत कांहीं तरी अढी आहे."

"नाहीं."

"मग ?"

"कांही नाही. मला कांहीं कळत नाही."

आणि त्यानें दूर व्हावें. असाच आयुष्याचा गाडा चालत राही.

इतर स्त्रीचेंच काय पण पत्नीचें प्रेमसुद्धां मागून मिळत नाहीं हें त्याला माहित होतें. त्यासाठीं तिचें सतत अनुराधन करावें लागतें याची त्याला जाणीव होती. आणि तो तसाच वागत असे. तिच्या वृत्ती फुलाव्या, तिनें जीवनांत रस घ्यावा म्हणून तो सर्व प्रकारे प्रयत्न करी. त्याने नाटक–सिनेमाला, प्रवासाला–सहलीला नेलें म्हणजे ती त्याच्याबरोबर जाई. पण रबरासारखी पुन्हा आपली मूळ स्थितीवर येई. त्यांत तिचा उत्साह कधीं दिसायचा नाहीं. ती आपण होऊन कधी अमुक करूं किंवा अमुक पाहूं असें म्हणायची नाहीं.

म्हणूनच आज त्याच्या वृत्ती जरी उमलल्या होत्या, आणि तिचें तें पाठमोरें सौंदर्य मिठींत घेण्याची त्याला अनावर इच्छा झाली होती, तरी तो आपल्याच कॉटवर पडून राहिला.

तो तिच्याकडे कितीतरी वेळ तसाच बघत राहिला होता. मध्येंच ती कुशीवर वळून उताणी झाली. तिचा ऊर एकवार श्वासाने खालीवर झाला. तिनें आपला हात उशाखाली घेतला; आणि ती तशीच निजून राहिली.

आणखी कांही वेळ तो तसाच तिच्याकडे पाहात राहिला. नंतर एकदम उठून तिच्याजवळ गेला आणि तिच्या उघड्या पडलेल्या दंडाच्या आंतल्या भागावर ओठ टेकून त्यानें तिच्या अंगाभोवतीं हात लपेटला. त्याबरोबर ती दचकून म्हणाली,

" अं: ? "

" मी " तो म्हणाला !

" हं: किती भ्यालें मी. म्हटलं, कोण आहे. " असें म्हणून त्याच्याकडे पाठ फिरवून ती स्वस्थ पडून राहिली.

त्यानें तिला आपल्या सामोरें करून घेण्याचा प्रयत्न केला. पण ती वळली नाहीं. तो नेहमीसारखाच उठून जायचा. पण गेला नाही. त्याचा सगळा अवरुद्ध उद्वेग आणि असंतोष जणू त्याक्षणीं उसळून आला. तो म्हणाला,

" सरला, मला तुला कांही विचारायचं आहे. "

तिला कल्पना आली तो काय विचारणार त्याची. पण ती म्हणाली,

" सकाळीं ना. मला आता झोंप येतेय् "

"येऊं दे आली तर. उद्या सुटीच आहे. मला आताच उत्तर पाहिजे."

" काय ? "

"हें असं किती दिवस चालणार ? या जगण्याला कांही अर्थ आहे कां ?"

" मग मी काय करूं ? तुम्ही सांगा. "

" काय करूं ? म्हणजे काय ? "

ती कांहीं बोलली नाहीं.

" तूं असं कां करतेस ?

" कसं ? "

" तुला ठाऊक आहे. "

" मला कांहीं समजत नाहीं. "

थोड्या वेळानें त्यानें पुन्हां विचारलें,

" माझ्यांत कांहीं उणं का आहे ? "

ती गप्प राहिली.

" बोल की. "

" मला तसं वाटत नाहीं. "

" म्हणजे कसं ? "

" तुम्हांला वाटतं तसं. "

तें ऐकून त्याला जोराचा धक्का बसला. इतकें स्पष्ट उत्तर त्याला यापूर्वी तिनें कधी दिलें नव्हतें.

" मी तुझ्यापेक्षां थोडा मोठा आहे म्हणून ? कीं मी तुझा शिक्षक होतों म्हणून ? "

जरा वेळ गप्प राहून ती म्हणाली,

" तसं असेल. पण मला तसं वाटत नाही एवढं खरं. "

तो क्षणभर गप्प राहिला. आणि मग त्यानें तिला आणखी जवळ घेण्याचा प्रयत्न केला. पण तिनें आपलें अंग ओढून घेतलें.

तेव्हां मात्र त्याला अगदीं डंख मारल्यासारखें झालें.

" भरल्या पिकावर हींव पडावं तसं आपल्या संसाराचं होणार आहे. "

त्याचा स्वर अतिशय तीव्र आणि कटु होता. त्याचं बोलणं ऐकून तिलाहि वाटलें कीं, आपल्या मनांत कांहीं असलें तरी आपण तसें बोलायला नको होतं. ती म्हणाली,

"मी अगदीं वाईट आहें."

त्याच्या मनांत आलें, तिचें दुसऱ्या कुणावर प्रेम तर नसेल !

"तुला दुसरं कोणी विशेष आवडतं का ?" त्यानें चांचरत विचारलें.

"कांहींतरीच काय डोक्यांत घेतलं आहेत तुम्हीं ?"

"प्रश्नाचं उत्तर दे. हो कीं नाहीं ?"

"कशाचा कांहीं संबंध नाही अन् उत्तर कसलं देऊं ?"

त्याचं मन कांहीं तरी भयानक संशयानें घेरलें जात आहे हें तिला कळून चुकलें आणि हें असेंच चालत राहिलें तर त्याचे परिणाम कांहींतरी विलक्षण होतील हेंहि तिला जाणवलें. आपल्या आताच्या बोलण्यानें त्याचा गैरसमज वाढण्याचाच संभव आहे हें ओळखून ती पुढें बोलणार होती, पण तेवढ्यांत,

"अस्सं, ठीक आहे." असें म्हणून त्यानें तिला जवळजवळ ढकलल्यासारखेंच दूर केलें, आणि तो आपल्या कॉटवर जाऊन पडला.

त्याच्या मागोमाग सरला त्याच्या कॉटपाशीं गेली आणि म्हणाली,

"हें पाहा. तुम्हांला माझ्या बोलण्यामुळे भलतंच कांहीं तरी वाटलं असेल. मी—मला—"

"मला जें वाटायचं तेंच वाटलं. तूं जाऊन नीज सुखाव्यानं आणि मलाहि स्वस्थ निजूं दे."

ती परत आपल्या जागेवर गेली, पण तिला अतिशय अस्वस्थ वाटत होतें. आजपर्यंत असे प्रसंग येत पण ती इतकी अस्वस्थ कधीं झाली नव्हती. "भरल्या पिकावर हींव पडावं तसं आपल्या संसाराचं झालं आहे."

या त्याच्या वाक्यानें आणि नंतरच्या त्याच्या उद्गारांनी तिला आपल्या आयुष्याकडे मागे पाहायला लावलें.

इतके दिवस तिनें त्याला दूर ठेवलें आणि तो मुकाट्याने दूर राहिला. पण त्यामुळें त्याच्या भावनांना किती तिखट धार आली होती तें तिला आतां कळलें. इतके दिवस तिनें स्वतःच्या मनापुरतें पाहिलें होतें. पण त्या अवधींत त्याच्या मनाची कशी चाळण झाली होती तें तिच्या आज लक्ष्यांत आलें. आपण किती दुरावत चाललों होतों आणि त्याचे परिणाम किती भीषण होणें शक्य आहे, हें तिला आज दिसलें. आपल्या जीवनांत आपली आपल्या पलिकडची कांही भूमिका आहे याची तिला एकदम जाणीव झाली.

पण ती पार पाडण्यासाठीं काय करावें हें तिला कळेना. त्याला कोणत्याही रीतीनें वाईट वाटूं नये. दुःख होऊं नये असेंच वागण्याचा तिचा सतत प्रयत्न चालला होता. पण तिचें वागणें त्याच्या अपेक्षा पूर्ण करूं शकत नव्हतें, हें उघड दिसत होतें. विचारानें जाणवून दिलेली कांहींतरी करण्याची आवश्यकता आणि भावनांनीं निर्माण केलेली विवश अगतिकता ह्यांच्या कैचींत ती सांपडली होती. त्याच्या इच्छेला निर्जीवपणें वश होणें तिला शक्य होतें. पण तेवढ्यानें त्याचें समाधान होणें शक्य नव्हतें. आपल्या भोंवतालचें कवच फुटावें, फुटलें तर बरें होईल असें तिला वाटे, पण तें कसें फोडायचें, कसें फुटेल, याची तिला कल्पना येईना.

तिनें त्याच्या कॉटकडे पाहिलें. त्याची तगमग चालली होती. तो सारखा या कुशीवरून त्या कुशीवर वळत होता. आपल्या कॉटवरून उठून त्याच्याकडे जावें असें पुन्हां एकदां तिच्या मनांत आलें. पण तसें करण्याचा तिला धीर होईना.

त्याचें मन स्वस्थ नव्हतेंच. विचाराचें घातचक्र त्याला बेचैन करीत होतें. कोंडींत सांपडलेलें मन बाहेर पडण्याच्या प्रयत्नांत शिणलें होतें. बराच

वेळ तसाच गेल्यावर तो उठून खिडकींत जाऊन बसला. आणि तसांतच केव्हांतरी त्याचा डोळा लागला.

चिमण्यांचा किलबिलाट कानांवर पडून तो जागा झाला. पूर्वेला तांबडें फुटूं लागलें होतें. रात्रीच्या धूसरतेला उजळपणा येत चालला होता. चिमण्यांचे थवे या झाडावरून त्या झाडावर भिर्रकन जात येत होते. खिडकीच्या खालच्याच बाजूला एक कोंबडी कॅक्-कॅक् करीत कांहीं तरी टिपीत होती. तिच्याभोंवती तिची पांचसात पिलंहि चिवचिवत होतीं. अगदी लहान, मुठींत मावतील अशीं. त्यांचीं तीं पांढरीं भुरकीं इवलालीं पिसें, पिवळ्या चोंची आणि पिवळीं पावलें, अगदी फुलांसारखीं नाजुक दिसत होतीं.

इतक्यांत त्याच्या खांद्याला हलक्या हाताचा स्पर्श झाला. त्यानें वळून पाहिलें. सरला त्याच्या शेजारीं येऊन उभी राहिली होती.

ती म्हणाली, " हें काय? इथं काय बसलांत? आणि काय पाहतांहा एवढं?"

तो तिच्याकडे न पाहता म्हणाला "हीं कोंबडीचीं पिलं. काल नव्हतीं. आज कवच फोडून बाहेर आलीं. त्यांनासुद्धां आपल्या भोंवतालचं कवच फोडता आलं. पण माणसाला कांहीं आपल्या भोंवतालचं कवच फोडतां येत नाही. त्याला बाहेरचं जग दिसतं, काचेंतून दिसावं तसं स्पष्ट दिसतं, हवंसं वाटतं, पण तिथं हात पोंचवतां येत नाहीं. त्याला स्पर्श करतां येत नाही. हेंच बघत होतों."

एवढें बोलून त्यानें एक हलका निश्वास टाकला.

त्याच्या खांद्यावरचा हात काढून घेऊन ती आंत गेली.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५९१९

REFBK-0007149
REFBK-0007149